**नागपूर मुख्य कार्यालय**
**कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८**

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

**मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज**

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

✻ वर्ष ५४ ✻ अंक २११ ✻ ✻ नागपूर ✻ | शुक्रवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२४ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्राग्रलेख

## खरीखरी...

## बॉस आणि दास

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास हे वाढत्या महागाईने चिंताग्रस्त झालेले आहेत. रिझर्व बँकेचे गव्हर्नरच चिंताग्रस्त असतील. तर भारतातील सर्वात दुःखी मध्यमवर्गाने कुणाकडे पाहायचे? हा मोठा प्रश्न आहे. आपल्या देशातील श्रीमंत लोकांना महागाई कितीही वाढली. तरी ते त्यांना अजिबात माहीत नसते. त्यांना त्याची गरजही नसते. गरीब आणि तथाकथित गरीब यांच्यासाठी सरकारच्या तिजोरीतून एकापेक्षा एक रेवड्यांचे डबे बाहेर निघत असतात. तेव्हा बिचाऱ्या गरिबांनाही सुखाचे दिवस आले आहेत. असे आपण म्हटले पाहिजे. किंबहुना भारतात कोणे एकेकाळी गरीब मजूर होते. मग त्यांच्या पगार वाढीसाठी मुंबईसारख्या शहरात कॉम्रेड डांगे, जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारखी बडी बडी कामगार नेते मंडळी सरकार व भांडवलदारांशी जोरदार भांडत असत. त्यांची आंदोलने होत असत. दिवाळीच्या सुमारास मोठमोठ्या सभा गाजत असत. अनेक पुढा?यांची तोंडे वाजत असत आणि मग सरकार किंवा भांडवलदार तत्कालीन मजुरांना गोड गोड दूध पाजत असत. पण आता भारतातून गरीब जवळपास समाप्त झालेले असले, तरी अजूनही गरिबी संपलेली नाही. हे अत्यंत गोड सत्य आहे. गरिबांना दरमहा जेवणासाठी जे धान्य लागते. ते 80 कोटी गरीब लोकांपर्यंत सरकार द्वारा पोहोचवले जाते. मध्यमवर्गीयांना मात्र तोंड दाबून बुक्क्यांचा मार मिळत असतो. त्यांची नोकरी गेली तर त्यांना वाली कुणीच नसतो. हे आपण नेहमीच पाहतो. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांना महागाईची चिंता सतावत असली. तरी भारताच्या आर्थिक वृद्धीबाबत जे काही आकडे मिळतात. ते अगदीच निराशाजनक नाहीत, असे त्यांचे म्हणजेच शक्तिकांत दास यांचे म्हणणे आहे. रिझर्व्ह बँक महागाईला कमी करण्यासाठी वेगवान पावले उचलणार आहे, असेही त्यांचे म्हणणे आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीतही भारतीय अर्थव्यवस्था अंगदाच्या पायासारखी मजबूत आहे. असे दस्तुरखुद्द रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर दास म्हणतात. दास कोणाचेही दास नसल्यामुळे ते सत्य बोलू शकतात. वित्तीय स्थिरता किंवा आर्थिक स्थैर्य कायम ठेवण्यासाठी हे दास साहेब काहीतरी मोठी पावले उचलू शकतात, असेही त्यांचे म्हणणे आहे. त्यातच आशावाद म्हणजे 2024-25 सालासाठी जीडीपीच्या दरात 7.2% वाढ होईल, या अनुमानावर मात्र ते कायम आहेत. काही विद्वान लोकांचे म्हणणे असे आहे की, आपला वृद्धीचा दर 7% पेक्षा कमी राहू शकतो. त्यावर रिझर्व्ह बँक असे म्हणते की, आम्ही 70 पेक्षा अधिक बाबींवर नजर ठेवून असतो. त्यामध्ये रोजच्या वापरातील वस्तू नक्कीच आहेत. काही वस्तू महाग झालेल्या आहेत. मागील महिन्यात संपलेल्या सबसिडीच्या खर्चात थोडी वाढ झालेली आहे. त्यामुळे काहीतरी कारवाई करू. एकूणच रिझर्व बँकेचे गव्हर्नर म्हणतात की, आपण निश्चितपणे महागाई कमी करू शकतो. दास साहेब आपल्या शब्दाला सत्याचे स्वरूप येवो, अशी आमची मनापासून कामना आहे.

अब बहुत हो गई, महंगाई 'बॉस'
सस्ताई लाएंगे, आरबीआय के 'दास'


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


मविआकडून अजित पवारांची, तर भाजपकडून काँग्रेसची बदनामी

# जाहिरातींवरून तक्रारी!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
महाविकास आघाडीच्या एका जाहिरातीमधून उपमुख्यमंत्री अजित पवारांना लक्ष्य करत त्यांचे पात्र दाखवण्यात आले आहे. दुसरीकडे, भाजपाने त्यांच्या जाहिरातीत काँग्रेसला खोटारडे ठरविण्याचा प्रयत्न केला आहे . या जाहिरातीवरून आता महाविकास आघाडी आणि महायुतीकडून एकमेकांच्या विरोधात तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीविरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना पत्र लिहून जाहिरातीमधील मजूकर आणि अजित पवारांच्या पात्राचा उल्लेख करत तक्रार दाखल केली आहे.

या जाहिरातीच्या माध्यमातून अजित पवारांची प्रतिमा मलिन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न महाविकास आघाडीच्यावतीने केला जात असल्याचेही त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

बदनामीकारक मजकूर, खोटे वृत्त आणि वादग्रस्त आशयाची व्हिडिओ जाहिरात बनवून अजित पवारांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे सूरज चव्हाण यांनी तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीही पत्रातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या जाहिरातीमध्ये एका महिला भगिनीशी बोलताना अजित पवार हे महिन्याला तुम्हाला दीड हजार रुपये दिले ना असे सांगताना दिसून येतात. मात्र, ह्या दीड हजारांचा दादा तुमचा वादा फसवा असल्याचे ती महिला म्हणते. गुलाबी जॅकेट आणि ढोकळा खाताना अजित पवारांचे पात्र जाहिरातीमध्ये साकारण्यात आल्याचं दिसून येत आहे. महागाई वाढल्याने महाराष्ट्र त्रस्त असून तुम्ही तुमच्या सत्तेत मस्त असल्याचेही जाहिरातीमधील महिला अजित पवारांचे पात्र साकारलेल्या व्यक्तीला बोलताना दिसून येते.

सध्या, सोशल मीडियावर ही जाहिरात चांगलीच व्हायरल झाली आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली आहे. १५०० रुपयांत काही होत नाही, कारण महिन्याचा खर्च १५ हजारांवर गेलाय, खोटा दादा, फसवा वादा, असेही जाहिरातीमधून म्हटले आहे.

दुसरीकडे भाजपने एक खोटी जाहिरात दिल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. काँग्रेसने वेगवेगळ्या राज्यात खोट्या गॅरंटी दिल्या त्या पूर्ण केल्या नाहीत अशी जाहिरात केली आहे. काँग्रेसच्या शिष्टमंडळाने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याची भेट घेऊन भाजपा विरोधात लेखी तक्रार केली.

भाजपाकडून पसरवले जाणारे हे खोटे आम्ही निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. तसेच भाजपवर कारवाई करण्याची मागणी केल्याचे कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदींचा आजपासून

## महाराष्ट्रात झंझावात

### धुळे, नाशिकमध्ये आज प्रचार सभा



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ :**
राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सलग दोन दिवस महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. पहिल्या दोन दिवसात मोदींच्या चार प्रचारसभा होणार आहेत. मोदींच्या प्रचारसभांमुळे महायुतीच्या उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

नरेंद्र मोदी यांची दुपारी १२ वाजता धुळ्यात पहिली सभा होईल. त्यानंतर दुपारी २ वाजता नाशिकमध्ये दुसरी सभा होईल. ९ नोव्हेंबरला मोदींच्या अकोला आणि नांदेडमध्ये सभा होतील.

भाजपने १२ नोव्हेंबरला पंतप्रधान मोदींचा चिमूर, सोलापूर आणि पुण्यात रोड शो आयोजित केला आहे. तर १४ नोव्हेंबरला मोदींच्या छत्रपती संभाजीनगर, रायगड आणि मुंबईत प्रचारसभा होतील.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा शुक्रवारी पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून ते दिवसभरात चार प्रचारसभा घेणार आहेत. शहा यांची पहिली सभा सांगली जिल्ह्यातील शिराळा मतदारसंघात व नंतर कराड येथे होईल.

## काँग्रेस नेत्यांची फौज

काँग्रेसने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात नेत्यांची फौज उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह राहुल गांधी, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी तसेच शेजारील कर्नाटक आणि तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांच्या राज्यभरात सभा होतील.

या नेत्यांच्या प्रचारसभांचे नियोजन करण्यात आले असून काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी ठिकठिकाणी प्रचारसभा होतील. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत यासंदर्भात माहिती दिली. आज टिळक भवन येथे चेन्नीथला यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेण्यात आली.

## दहशतवाद्यांचे वय घटले

### गृहमंत्री शहा यांचा दावा

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी दोन दिवसीय दहशतवाद विरोधी परिषद-2024 चे उद्घाटन केले.

यावेळी ते म्हणाले की, मोदी सरकारने गेल्या 10 वर्षांत दहशतवादाविरोधात पावले उचलली असून त्यामुळे दहशतवादाशी लढण्यासाठी एक मजबूत परिसंस्था निर्माण झाली आहे. 2014 पासून दहशतवादी घटनांमध्ये 70% घट झाली आहे. म्हणजे दहशतवाद्यांचे वय घटले आहे. त्यांचे आयुष्य आता वर्षानुवर्षे कमी झाले आहे. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींचा दहशतवादाविरुद्ध झिरो टॉलरन्सचा नारा केवळ भारतानेच नव्हे तर संपूर्ण जगाने स्वीकारला आहे.



अमित शहा पुढे म्हणाले की, या परिषदेमुळे भारतातील सुरक्षा पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय वाढेल.

दिल्लीत सुरू असलेल्या राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) या परिषदेत गेल्या काही वर्षांत दहशतवादाविरोधातील कारवाईत आलेल्या अडचणींवर चर्चा होणार आहे. या परिषदेत राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, विशेष सुरक्षा संस्था, फॉरेन्सिक आणि तांत्रिक तज्ञ सहभागी होणार आहेत.

## किंग खानला धमकी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान याला जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. या प्रकरणी मुंबईतील वांद्रे पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या आधीही सलमान खानला लॉरेन्स गॅंगकडून अनेकदा धमक्या आल्या आहेत. हे प्रकरण ताजे असतानाच आता शाहरुख खानला देखील धमक्या आल्या आहेत. सध्या या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. एकीकडे सलमान खानला लॉरेन्स बिश्नोईक गॅंगकडून सातत्याने धमक्या दिल्या जात आहेत, तर दुसरीकडे आता शाहरुख खानलाही धमक्या आल्या आहेत. हा धमकीचा कॉल फैजान नावाच्या व्यक्तीने केला होता.

## प्रज्ञांना ठाकूरला कोर्टाचे वॉरंट



■ **वृत्तसंस्था, भोपाळ, दि. ७ :**
मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी एनआयए न्यायालयाने भोपाळच्या माजी खासदार प्रज्ञा ठाकूर यांच्याविरोधात 10 हजार रुपयांचे जामीनपात्र वॉरंट जारी केले असून त्यांना 13 नोव्हेंबरपर्यंत न्यायालयात हजर राहण्यास सांगितले आहे.

कोर्टाचे वॉरंट जारी झाल्यानंतर प्रज्ञा ठाकूर यांनी वर आपला एक फोटो शेअर करत काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे. त्या सद्धया दिल्लीतील रुग्णालयात दाखल आहेत.

## भोंगे उतरणार नाहीत आणि राजसत्ताही कधी येणार नाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हाती सत्ता दिली तर एकाही मशिदीवर भोंगा दिसणार नाही, असे वक्तव्य राज ठाकरे यांनी अमरावती येथे एका जाहीरसभेदरम्यान केले होते.

या वक्तव्यावर आता राजकीय प्रतिक्रिया येत आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) प्रमुख रामदास आठवले यांनी एएनआय वृत्तवाहिनीशी बोलताना राज ठाकरेंच्या विधानावर टीका केली. मशिदीवरील भोंगे कधीही हटणार नाहीत, अशी भूमिका मांडत असताना रामदास आठवले यांनी मनसेची सत्ता कधीही येणार नाही, असे सांगितले. मनसेचा एकच आमदार निवडून येतो, तोही स्वतःच्या जीवावर निवडून येतो, असेही आठवले म्हणाले.

आठवले एएनआयशी बोलताना म्हणाले की, राज ठाकरे वारंवार अशाप्रकारचे विधान करत असतात. आमचे सरकार आले तर मशिदीवरील भोंगे हटविणार असे ते म्हणतात. पण मशिदीवरील भोंगे हटणार नाहीत आणि राज ठाकरेंची सत्ताही कधी येऊ शकत नाही. कितीही वर्ष गेले तरी राज ठाकरेंची सत्ता येऊ शकत नाही. त्यांचा एकच आमदार निवडून येतो, तोही स्वतःच्या जीवावर. मग त्यांचे सरकार कसे येणार? आणि ते कसे भोंगे हटवू शकणार?

मी दहशतवादी असलेल्या मुसलमानांचा नेहमीच विरोध केला आहे. पण देशावर, भारताच्या संविधानांवर प्रेम करणारे आणि हिंदूंशी बंधुभाव राखून राहणाऱ्या मुसलमानांचा विरोध करणे ठीक नसल्याचे आठवले म्हणाले.

## फडणवीस यांचा झंझावाती प्रचार

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. ७ :**
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि आर्णी विधानसभा मतदारसंघातील भाजप उमेदवारांच्या बाजूने निवडणूक रॅलीला संबोधित केले.

या सभेत फडणवीस यांनी आपल्या सरकारने केलेल्या कामांची माहिती जनतेला दिली आणि राजू तोडसाम आणि किसन वानखेडे या दोन्ही उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहनही केले.

उमरखेड विधानसभा मतदारसंघात प्रचार करताना फडणवीस म्हणाले, विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने लोकप्रिय उमेदवार किसन वानखेडे यांचे आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहे. यावेळी त्यांनी महायुती सरकारच्या कामांचा पाढा वाचत महाविकास आघाडीवर सडकून टीका केली.



## खोतांच्या वक्तव्यावर अजित पवारांचा संताप

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ :**
राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्याने शरद पवार आणि अजित पवार यांच्यातील अंतर खूपच वाढले आहे. दोन्ही नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपही करत आहेत.



मात्र सदाभाऊ खोत यांनी केलेल्या वक्तव्यानंतर अजित पवार हे चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. 'विनाश काले विपरीत बुद्धी' म्हणत अजित पवारांनी खोतांना सुनावले आहे. इतकेच नाही तर आपण त्यांना फोन करुन असे वक्तव्य करणे चुकीचे असल्याचे देखील सांगितले असल्याचे अजित पवारांनी सांगितले.

सदाभाऊ खोत हे जत विधानसभा मतदारसंघात सभा घेत होते. इतर नेत्यांप्रमाणे तेही विरोधी पक्षांवर हल्लाबोल करत होते. मात्र त्यानंतर त्यांनी शरद पवारांवर निशाणा साधण्यास सुरुवात केली. पण नंतर त्याची जीभ घसरली. यावरून अजित पवार यांनी चांगलाच समाचार घेतला.

मुलांना मुलींसारखेच मोफत शिक्षण देणार, सागरी पुलाचे आश्वासन पूर्ण केल्याचा दावा

# उद्धव ठाकरे यांचा वचननामा जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने गुरुवारी विधानसभा निवडणुकीचा आपला वचननामा जाहीर केला.

मुलांना मुलींसारखेच मोफत शिक्षण देण्यासह कोळी बांधवांचा त्यांना हवा असणारा विकास, गृहनिर्माण धोरण ठरवणे, मुंबईसारखाच महाराष्ट्रातील इतर प्रमुख शहरांतील झोपडपट्टयांचा विकास, मुंबईतील पळवलेले वित्तीय केंद्र नव्याने धारावीत उभारू अशी विविध आश्वासने ठाकरे गटाने या वचननाम्याद्वारे दिली आहेत. विशेषतः मुंबईकरांना सागरी पुलाचे दिलेले वचन पूर्ण केल्याचा दावाही उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी विधानसभा निवडणुकीचा आपल्या पक्षाचा जाहीरनामा जाहीर केला. या



जाहिरनाम्याद्वारे उद्धव ठाकरे यांनी मुंबईसह महाराष्ट्राच्या सर्वांगिन विकासाचा शब्द देत कोळी बांधवांना त्यांना हवा असणारा विकास करण्याची ग्वाही दिली आहे. हा जाहिरनामा पॉकेट साईज अर्थात खिशात मावणारा आहे. त्यावर एक क्यूआर कोड असून, मतदारांना तो मोबाईलच्या स्क्रिनवर पाहता येणार आहे.




# रणभूमी

बारामती विधानसभा मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे पुतणे युगेंद्र यांच्यात लढत होत आहेत. पवार कुटुंबातील दोघांत लढत होण्याची ही तशी पहिलीच वेळ. साडेतीन दशके अजिंक्य राहिलेल्या अजितदादा यांच्यासमोर या वेळी त्यांच्या सख्ख्या पुतण्याचे आव्हान आहे. असे असले,तरी ही लढत मोठे काका विरुद्ध मोठे पुतणे अशीच असणार आहे.

## बारामतीत पवार विरुद्ध पवार

बारामती या 'हाय व्होल्टेज' मतदारसंघाने शरद पवार विरुद्ध अजित पवार ही थेट नसली, तरीही अप्रत्यक्ष लढाई लोकसभा निवडणुकीत पाहिली. या लढाईत संस्था, सरकार बरोबर नसताना सामान्यांच्या पाठिंब्यावर सुप्रिया सुळे यांना कौल देऊन बारामतीकरांनी ते शरद पवारांबरोबर आहेत, हे लोकसभेला दाखवून दिले आहे. कुटुंबातील आणि बाहेरची असा वाद त्या वेळी झाला; परंतु आता दोघेही एकाच कुटुंबातील आहेत. लोकसभा निवडणुकीच्या वेळीच ज्या पद्धतीने अजितदादा विरुद्ध सारे पवार असा संघर्ष बारामतीने पाहिला होता, त्यावरून अजितदादा यांच्याविरोधातच पवार कुटुंबातील सदस्यच रिंगणात असेल, हे स्पष्ट झाले होते. यापूर्वी शरद पवार यांच्यापासून दूर गेलेल्या अजित पवार यांना पुन्हा परत आणण्यात श्रीनिवास या त्यांच्या मोठ्या बंधूने महत्त्वाची भूमिका बजावली होती. आता त्याच श्रीनिवास यांचे चिरंजीव युगेंद्र यांना पवार यांनी उमेदवारी दिली आहे. युगेंद्र आणि रोहित या दोन भावांनी लोकसभा निवडणुकीच्या काळात खासदार सुळे यांच्यासाठी मतदारसंघ पिंजून काढला होता. त्या वेळेपासूनच युगेंद्र यांनी जनता दरबार भरवून लोकांचे प्रश्न समजावून घेतले. बारामतीचे अनेक प्रश्न अजित पवार यांनी मार्गी लावले. तरीही जनतेला तक्रारीसाठी आणखी एक व्यासपीठ मिळाले. अजित पवार यांचे स्वतःचे एक संघटन आहे. सुनेत्रा पवार या शिक्षण संस्था आणि महिलांच्या चळवळीच्या माध्यमातून सक्रिय आहेत. टेक्सटाईल उद्योगातून त्यांनी अनेक महिलांना रोजगार दिला आहे; परंतु तरीही त्यांना खा. सुळे यांच्यापेक्षा ४७ हजार मते कमी पडली. गेल्या वेळी अजितदादांनी गोपीचंद पडळकर यांचा एक लाख तीस हजारांनी पराभव केला होता; परंतु लोकसभेला हे मताधिक्य त्यांना टिकवता आले नाही. सत्ता आणि कामे असतानाही शरद पवार यांनी चाणक्यनीतीने लेकीला सुनेविरोधात विजयी केले.



युगेंद्र हे राष्ट्रवादीतल्या फुटीनंतर राजकारणात आले. फेब्रुवारी २०२४ या महिन्यांत युगेंद्र यांनी शरद पवार यांच्या कार्यालयाला भेट दिली होती. त्या वेळी माध्यमांशी बोलताना युगेंद्र पवार म्हणाले होते, की राजकारणात उतरायचे, की नाही ते मी अद्याप ठरवलेले नाही. मी शरद पवारांच्या नवीन ऑफिसबाबत ऐकले आणि त्यांना भेटायला आलो. शरद पवार हे आमचे कुटुंबप्रमुख आहेत. त्यामुळे मी त्यांना भेटून शुभेच्छा दिल्या असेही ते म्हणाले होते; मात्र ही भेट साधीसोपी नव्हती. त्याचवेळी विधानसभा लढवण्याची तयारी करायला युगेंद्र पवार यांना शरद पवारांनी सांगितले होते. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर शरद पवार यांनी पुन्हा नव्याने फुटलेल्या पक्षाची बांधणी केली. या निवडणुकीत सुळे यांच्या प्रचारासाठी युगेंद्र यांच्यासह त्यांचे बंधू आणि आईवडीलही उतरले होते. अजित पवार यांनी आपल्याच भावावर त्या वेळी टीका केली होती. अशा परिस्थितीत मग त्राग्याने अजित पवार यांच्यावर श्रीनिवास यांनी केलेली टीका राज्यभर गाजली होती. विधानसभेची उमेदवारी जाहीर होण्याअगोदर युगेंद्र म्हणाले, आम्ही लोकसभेला चांगली कामगिरी केली. तशीच चांगली कामगिरी विधानसभा निवडणुकीतही करणार आहोत. कारण आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांचा विचार पुढे न्यायचा आहे. शरद पवार जे उमेदवार जाहीर करतील, त्यांना मी पाठिंबा देईन.

**राज्य वार्तापत्र**

शरद पवार यांनी आपले मोठे बंधू आप्पासाहेब पवार यांच्या नातवाला राजकारणात आणून त्यांच्याकडे मोठी जबाबदारी दिली. त्याअगोदर पुतणे अजित पवार यांना त्यांनीच राजकारणात आणले. पक्षाची आणि राज्याची धुरा ही त्यांच्याकडेच होती. अजित पवार यांनी बारामतीत राज्याने आदर्श घ्यावा, अशी कामे केली. बसस्थानक, रस्ते आदी कामे त्यांनी केली; परंतु एमआयडीसी, शिक्षणसंस्था आणि इतर अनेक कामांचा पाया शरद पवार यांनी घातला होता, हे जुन्या जाणत्यांना माहीत आहे. अजित पवार यांनी लोकसभा निवडणूक गमावली; मात्र विधासनभेला गोष्ट वेगळी आहे. एवढी कामे करूनही मतदार साथ देत नसतील, तर मी उभाच राहत नाही, अशी भूमिका जेव्हा अजितदादांनी घेतली, तेव्हा त्यांच्या कार्यकर्त्यांत तीव्र प्रतिक्रिया उमटली. अजितदादांसाठी कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. अजितदादांची ही खेळी होती, हे लपून राहिलेले नाही. बारामती विधानसभा मतदारसंघात अजित पवार कायमच जिंकत आलेले आहेत. लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना तिकिट देऊन कुटुंबातच ती लढत झाली ती व्हायला नको होती असे स्पष्ट मत अजित पवारांनी जाहीर रित्या व्यक्त केले होते. आता पुन्हा कुटुंबातील व्यक्तीविरोधातच लढण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. आता युगेंद्र अशा अजित पवारांना टक्कर देतील ज्यांनी ही निवडणूक हरलेली नाही. आता यावेळी ते कसा सामना देतील हे पाहणे महत्त्वाचे आहे.

■■■

## सिंधुदुर्गात पुन्हा राणेविरुद्ध नाईक संघर्ष

राणे विरुद्ध नाईक या कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पारंपरिक संघर्षातील नवी लढाई यंदा कुडाळ विधानसभा मतदारसंघात होणार आहे. कुडाळमध्ये शिवसेनेकडून नारायण राणे यांचे ज्येष्ठ पुत्र नीलेश राणे निवडणूक लढवणार आहेत. त्यांच्यापुढे कुडाळचे शिवसेनेच्या ठाकरे गटाचे विद्यमान आमदार वैभव नाईक यांचे आव्हान आहे. गेल्या काही दशकांपासून नाईक आणि राणे यांच्यातील संघर्ष संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

कुडाळ विधानसभेच्या २०१९ मध्ये झालेल्या शिवसेनेचे उमेदवार वैभव नाईक निवडून आले. शिवसेनेत फुट पडल्यानंतर नाईक यांनी उद्धव ठाकरे यांची साथ दिली. या मतदारसंघावर एकनाथ शिंदे यांचा दावा होता. कुडाळची जागा भाजपाला मिळावी, हा प्रयत्न नारायण राणे यांनी केला. नीलेश राणे यांनी तशी तयारीही सुरू केली; परंतु राणे यांच्या तयारीनंतरही मुख्यमंत्री ही जागा सोडण्यास तयार नव्हते. त्यामुळे अखेर तोडगा म्हणून नीलेश यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्या विरोधात बंड करून २००५ मध्ये शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' केला होता. त्यानंतर राणे कुटुंबीयातील व्यक्तीने दोन दशकानंतर शिवसेनेत प्रवेश केला आहे. नीलेश हे नारायण राणे यांचे ज्येष्ठ चिरंजीव आहेत. ते २००९ मध्ये सर्वप्रथम काँग्रेसच्या तिकीटावर रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले होते. त्यानंतर २०१४ मधील लोकसभा निवडणुकीत त्यांचा

**राज्य वार्तापत्र**



शिवसेनेच्या विनायक राऊत यांनी पराभव केला. राणे यांनी २०१९ मधील लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्र स्वाभिमानी पक्षाकडून लढवली होती. त्या निवडणुकीतही ते राऊत यांच्याकडून पराभूत झाले. सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याशी झालेल्या वादानंतर नीलेश यांनी राजकारणातून संन्यास घेण्याची भाषा मध्यंतरी बोलून दाखवली होती; पण ते आता पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

श्रीधर नाईक हे १९८०-९० च्या दशकात सिंधुदुर्ग जिल्ह्यातले काँग्रेसचे नेते होते. त्याच काळात जिल्ह्यातील शिवसेना विस्ताराची जबाबदारी नारायण राणे यांच्यावर होती. २२ जून १९९० रोजी श्रीधर नाईक यांची हत्या झाली.

कोकणातील ती पहिलीच राजकीय हत्या होती. ही हत्या नारायण राणे यांनीच केली असल्याचा आरोप त्या वेळी नाईक कुटुंबीयांनी केला होता. या प्रकरणात त्यांच्यावर आरोपी म्हणून खटलाही दाखल झाला; पण न्यायालयात राणे यांची निर्दोष मुक्तता झाली. कुडाळचे आमदार वैभव नाईक यांचे श्रीधर नाईक हे काका होते. त्यामुळे त्यांच्यातील हा संघर्ष जुना आहे. नारायण राणे यांनी शिवसेनेतून काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर वैभव नाईक शिवसेनेत दाखल झाले. २००९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राणे यांनी वैभव नाईक यांचा पराभव केला. त्यानंतर २०१४ मधील विधानसभा निवडणुकीत नाईक यांनी या पराभवाची परतफेड केली. २०१४ मधील पराभवानंतर राणे कुटुंबातील कुणीही कुडाळची जागा लढलेली नाही. आता दहा वर्षांनी नीलेश धनुष्यबाणच्या चिन्हावर नाईक यांना आव्हान देणार आहेत. नीलेश वडिलांच्या पराभवाचा बदला घेणार, की वैभव नाईक विजयाची हॅटट्रिक करणार हे निवडणूक निकालानंतर स्पष्ट होईल. असे असले, तरी दोघांतील कलगीतुरा आताच रंगायला लागला आहे. नीलेश यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थिती शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. या पक्ष प्रवेश सोहळ्यासाठी खासदार नारायण राणे यांच्यासह महायुतीमधील अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. याचवेळी नारायण राणे यांनी आमदार वैभव नाईक यांच्यावर जोरदार टीका केली. त्यावर आ. नाईक यांनी राणे यांना प्रत्युत्तर दिले आहे.

दहा वर्षात येथील विद्यमान आमदार विधानसभेत काहीच बोलला नाही. सिंधुदूर्गच्या प्रकल्पाबाबत, महाराष्ट्राच्या समस्याबाबत, कोरोनाबाबत काहीच बोलला नाही. वैभव नाईक यांच्या नावातच कर्तृत्वशुन्य आहे, असे म्हणत राणे यांनी नाईक यांना डिवचले. त्यावर ज्यांना आपल्या मुलांच्या पुढे दुसरे काही दिसत नाही, ज्यांना अनेक कार्यकर्ते सोडून गेले, त्यांना माझे काम काय दिसणार आहे. माझ्या कर्तृत्वाने मी जनतेमध्ये ओळखला जातो. म्हणूनच मी दहा वर्ष आमदार आहे. असे वैभव यांनी ठणकावले. हा कलगीतुरा १८ तारखेच्या संध्याकाळपर्यंत तसाच राहणार आहे.

## वाशिम जिल्ह्यात सर्वंच मतदारसंघात बंड

लोकसभेच्या निवडणुकीत वाशीम जिल्ह्यात महाविकास आघाडीचाच विजय झाला. राजश्री पाटील यांना माहेरने नाकारले. भावना गवळी यांना उमेदवारी न देण्याचा निर्णय शिवसेनाच्या शिंदे गट आणि भाजपच्या अंगलट आला. या जिल्ह्यात विधानसभेचे तीन मतदारसंघ असून, त्यापैकी दोन ठिकाणांहून भाजपचे तर एका ठिकाणी काँग्रेसचा आमदार आहे. या वेळी निवडणुकीच्या रिंगणातील पक्षाची संख्या आणि इच्छुकही वाढल्याने जवळपास सर्वंच मतदारसंघात बंड झाले आहे.

वाशिम जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात निवडणूकीचे वातावरण तापायला सुरुवात झाली असून वाशिम जिल्ह्यात एकूण ३ मतदार संघ आहे. २०१९ मध्ये कारंजा व वाशिम मतदारसंघ भाजपकडे होते, रिसोड हा मतदारसंघ काँग्रेसकडे होता. कारंजा, मानोरा मतदार संघात राजेंद्र पाटणी यांनी भाजपचा गड राखत २०१९ मध्ये तिसऱ्या वेळी विजय मिळविला होता. त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादीचे स्व. प्रकाश डहाके यांच्या निधनामुळे ही जागा अजित पवार यांच्या गटाच्या सई डहाके यांना मिळणार असल्याचे लक्षात आस्याने राजेंद्र पुत्र ज्ञायक यांनी राष राट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे भाजप आणि अजितदादा गटाला मोठा धक्का बसला आहे. वाशिम मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघात मागील तीन वेळा निवडुन येणारे आमदार लखन मलिक यांची उमेदवारी कापण्यात आली आहे. काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात कमळ फुलवण्याचे श्रेय त्यांना जाते; परंतु त्यांचीच उमेदवारी कापल्याने त्यांना रडू कोसळले. आमदार मलिक यांचे २०१९ चे प्रतिस्पर्धी डॉ. सिद्धार्थ देवळे यांनी या वेळी शिवबंधन बांधून मशाल हाती घेतली आहे. रिसोड मालेगाव मतदारसंघात या वेळी अमित झनक यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचे प्रतिस्पर्धी माजी मंत्री तथा खासदार अनंतराव देशमुख यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत २०१९ मध्ये अपक्ष निवडणूक लढविली होती. यात झनक यांचा खूप कमी मताने विजय झाला होता. देशमुख यांनी या वेळी भाजपमध्ये प्रवेश केला असून काटे की टक्कर होणार आहे.

वाशिम विधानसभा मतदार संघात भाजपने भाकरी फिरवली असून सलग तीन वेळा आमदार राहिलेल्या लखन मलिक यांना बाजूला सारण्यात आले आहे. मलिक यांना बाजूला करत त्यांच्या जागेवर श्याम खोडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मलिक यांची भाकरी भाजपने का फिरवली याचे कारण अद्याप कळू शकले नाही; मात्र आता भाजपला कमालीची कसरत करावी लागणार आहे. वाशिम विधानसभा मतदारसंघ हा १९९० पूर्वी काँग्रेसचा गड मानला जायचा; मात्र १९९० च्या विधानसभा निवडणुकीत मलिक यांनी काँग्रेसच्या गडाला खिंडार पाडून इथे भाजपचे कमळ फुलवले, तेव्हापासून २००४ चा एक अपवाद वगळता इथे सातत्याने भाजपचा उमेदवार निवडून आला आहे. १९९५ नंतर भाजपने सातत्याने इथे नवीन चेहऱ्याला संधी दिली. १९९९ च्या निवडणुकीत मलिक यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली; मात्र त्यांना उमेदवारी मिळाली नाही. तेव्हा ते पक्षासोबत राहिले आणि भाजपचा विजय खेचून आणला. २००४ मध्ये त्यांनी पुन्हा पक्षाकडे उमेदवारी मागितली; परंतु पक्षाने त्यांचा विचार केला नाही आणि मोतीराम तुपसांडे यांना उमेदवारी दिली; मात्र त्या वेळी त्यांनी पक्षाशी बंडखोरी करत पतंग चिन्हावर अपक्ष निवडणूक लढली होती. मलिक यांच्या मेहतर समाज आणि त्यांच्या समर्थकांच्या भरोशावर त्यांनी २३ हजार ६४१ मते मिळवली. भाजपच्या उमेदवाराचा पराभव करण्यासाठी ते कारणीभूत ठरले होते. त्या वेळी काँग्रेसचे सुरेश इंगळे हे विजयी झाले होते. मलिक हे मेहतर समाजाचे नेते असून समाजातील पहिले आमदार आहेत. मेहतर समाज राज्यातील प्रत्येक मतदार संघात विखुरलेला आहे. भाजप त्यांना उमेदवारी देत नसल्याने राज्यातील मेहतर समाज भाजपवर नाराज होत गेला. भाजपला त्याचा फटका बसू लागला. त्यामुळे मेहतर समाजाचे मतदार भाजपकडे वळवण्यासाठी भाजपने पुन्हा २००९ मध्ये मलिक यांना उमेदवारी दिली आणि त्यांनी विजय खेचून आणला. या मतदार संघात मेहतर समाजाचा उमेदवार निवडून येतो हे लक्षात आल्यावर भाजपने २००९ पासून २०१९ पर्यंत त्यांना उमेदवारी दिली आणि ते सलग तीन वेळा निवडून आले. मनमिळावू स्वभावाचे आमदार म्हणून त्यांची मतदारसंघात ओळख निर्माण झाली आहे; मात्र मतदार संघातील समस्या विधानसभेत पाहिजे त्याप्रमाणात न मांडणे तसेच भाजपच्या अनेक सर्वेत मलिक पिछाडीवर होते, असे सांगितले जाते. त्यामुळे त्यांची उमेदवारी कापून त्यांच्या जागेवर उमेदवार बदलण्याचा निर्णय भाजपने घेतला असल्याचे बोलले जात आहे. वाशिम मतदारसंघात भाजपकडून निवडणूक लढण्यासाठी दिग्गज इच्छुक उमेदवार रांगेत उभे होते; मात्र यामध्ये मेहतर समाजातील श्याम खोडे हे एकमेव असल्याने भाजपने त्यांना उमेदवारी दिली असल्याचे राजकीय जाणकार सांगतात.



भाजपने मेहतर समाजातीलच खोडे यांना उमेदवारी देऊन भाकरी जरी फिरवली असली, तरी ही भाकर करपणार नाही, यासाठी भाजप कार्यकर्त्यांना प्रचंड मेहनत करावी लागणार आहे. खोडे हे मतदार संघातील मंगरुळपीर शहरातील रहिवाशी असून भाजपचे शहराध्यक्ष होते. आता भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश सचिव आणि बाबा बागेश्वरधाम भक्त परिवाराचे वाशिम जिल्हा संयोजक आहेत. त्यांचे वडील मंगरुळपीर नगरपालिकेचे अध्यक्ष होते. दुसरीकडे विधानसभा निवडणूक जाहीर होण्याआधी आणि त्यानंतरही शरद पवार यांनी भाजप आणि महायुतीला मोठे धक्के दिले आहे. विदर्भात भाजपला मोठा धक्का बसला आहे. वाशिम जिल्ह्यातील कारंजा विधानसभा मतदारसंघातील दिवंगत राजेंद्र पाटणी यांचे पुत्र ज्ञायक पाटणी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला. ऐन निवडणुकीत हा मोठा धक्का मानला जात आहे. ज्ञायक हे आता तुतारीच्या चिन्हावर कारंजा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचा मुद्दा तीनही मतदारसंघामध्ये कळीचा ठरू शकतो. शेतमालाला मिळत नसलेला भाव व पीकविमा रक्कम मिळण्यास दिरंगाई हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. वाशिम पाटबंधारे मंडळ कार्यालय शेगाव स्थानांतरण केल्याचा प्रश्न कळीचा ठरू शकतो. जिल्ह्यात सिंचनासाठी मोठे प्रकल्प नाहीत. सिंचनाचा भार हा लघु प्रकल्पांवर आहे. जिल्हा होऊनही अद्याप शासकीय कार्यालय, रिक्त असलेल्या जागा मुद्यावर चर्चा होऊ शकते.

**राज्य वार्तापत्र**

■■■

# दोन महिन्यांपासून वीज तारांची जोडणी न केल्यामुळे पंपाचा वीजपुरवठा बंदच

■ महासागर प्रतिनिधी
संग्रामपूर, दि. ७ :



कधी नव्हे यंदा परतीच्या पावसाने हजेरी लावून काढणीवर आलेल्या खरीप पिकाचे अतोनात नुकसान केले आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च सुध्दा निघाला नाही. खरिपाचे नुकसान भरुन काढण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बीची तयारी सुरू केली आहे. परंतु दोन महिन्यांपासून चोरीस गेलेल्या वीज तारांची अद्याप जोडणी न केल्याने शेती पंपाचा वीजपुरवठा बंद आहे. त्यामुळे रब्बीची पेरणी कशी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

मागील दोन महिन्यांपूर्वी तालुक्यातील कोद्री शिवारात शेतातील वीज तारांची चोरी झाली होती. वायरमनने वीज तार चोरीची तक्रार पोलिसांत केली आहे. या तक्रारीवरुन तामगाव पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. परंतु अद्यापही वीज तार चोरी करणारा आरोपी पोलिसांना सापडलेला नाही. दोन महिन्यांपासून महावितरणने सुद्धा याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. दोन महिन्यांपूर्वी वीज तारा चोरी गेल्याने शेतकऱ्यांचे खरीप पिकाचे नुकसान झाले. परंतु अद्यापही महावितरणकडून तार जोडणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे रब्बी पिकाचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. कोद्री शिवारातील खांबावरील चोरी गेलेल्या ॲल्युमिनियमच्या तारांच्या जागेवर नव्याने तार बसून शेतकऱ्यांच्या शेतातील वीज पुरवठा पूर्ववत सुरू करून देण्याची मागणी येथील शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे महावितरण कंपनीकडे केली आहे. परंतु दोन महिने उलटूनही शेतातील वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला नाही. त्यातच आता रब्बी पेरणीच्या हंगामाला सुरूवात होणार आहे.

रब्बी पिकाला पाण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे वीज कंपनीने लवकर वीज तारांची जोडणी करून वीज पुरवठा सुरू करावा. अशी मागणी शेतकरी करत आहेत.

वीज तारांच्या चोरीमुळे वीज कंपनीचे नुकसान : वीज तार चोरीस गेल्याने विद्युत खांब खाली पडून वीज कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनाही कृषी पंप जोडणीपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान होत आहे. तालुक्यातील विविध शेत शिवारात वीज तार चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. चोरीस गेलेल्या वीज तारांचा व चोराचा मागील दोन महिन्यांपासून शोध न लागल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील शेतीउपयोगी साहित्य चोरीस जाण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. पोलिसांनी विद्युत साहित्य चोरट्यांना अटक करण्याची गरज आहे. वरिष्ठ कार्यालयाकडे आवश्यक साहित्याची मागणी करण्यात आली असून पहिल्या टप्प्याचे काही साहित्य उपलब्ध झाले आहे. पूर्ण साहित्य उपलब्ध होताच एजन्सीकडून बंद असलेला कृषी पंपाचा विद्युत पुरवठा लवकर सुरळीत करण्यात येईल. तशा सूचना शाखा अभियंता व संबंधित एजन्सीला देण्यात आल्या आहेत.

# अंढेऱ्यात टायर फुटल्यामुळे चालकाने रस्त्यातच वाळूचा टिपर केला खाली

■ महासागर प्रतिनिधी
अंढेरा, दि. ७ :



मागील काही दिवसांपासून खडकपूर्णा नदीपात्रातून अवैधरीत्या वाळूचा उपसा करून त्याची सर्रास वाहतूक करण्यात येत आहे. दरम्यान, ५ नोव्हेंबर रोजी वाळूचे एक टिपर भरधाव जात होते. काही अंतरावर जात नाही तोच टिपरचे मागील टायर फुटले. त्यामुळे चालकाला रस्त्यातच टिपरमधील वाळू खाली करावी लागली. या बाबतची माहिती मिळताच तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांनी महसूल अधिकाऱ्यांना वाळूसह टिपर जप्त करण्याचे आदेश दिले. ही घटना अंढेरा ते मेरा बुद्रुक दरम्यान घडली.

वाळूने भरलेला टिपर अंढेऱ्याकडून मेरा बुद्रुककडे जात असताना काही अंतरावरच टिपरचे मागील टायर फुटले. त्यामुळे कारवाईच्या भिती पोटी चालकाने रस्त्यातच टिपर मधील वाळू खाली करून टिपर रस्त्याच्या बाजूला नेवून उभे केले. या घटनेची माहिती तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांना देण्यात आली. त्यावर त्यांनी महसूल कर्मचाऱ्यांना जप्तीचे आदेश दिले. वास्तविक पाहता मागील काही दिवसांपासून खडकपूर्णा नदी पात्रातून वाळूचा लिलाव थांबविण्यात आला आहे. परंतु बांधकामासाठी वाळूची आवश्यकता असल्याने काही वाळू माफिया नदी पात्रातुन अवैधरीत्या वाळूचे उत्खनन करून त्याची दिवसाढवळ्या वाहतूक करत आहेत. हीच वाळू बांधकाम करणाऱ्यांना अव्वाच्या सव्वा भावाने विक्री करत आहेत. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

## बंजारा समाज बांधवांच्या वतीने पोहरादेवी येथे कार्यक्रमाचे आयोजन

**पोहरादेवी:** बंजारा गुरुगादीचे पिठाधीश बाबूसिंग महाराज यांना राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्य म्हणून संधी देण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल गोर बंजारा समाजाच्या वतीने तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

राज्याचे राज्यपाल यांनी गत महिन्याच्या पंधरा तारखेला सामाजिक सेवेत योगदान देणाऱ्या राज्यातील ७ नागरिकांची विधानपरिषद सदस्य म्हणून नेमणूक केली. यात बाबूसिंग महाराज यांचा देखील समावेश आहे. बाबूसिंग महाराज हे बंजारा गोरपिठाची गुरु परंपरा चालवीत असून दिवंगत संत डॉ. रामराव महाराज यांच्या पश्चात उत्तराधिकारी म्हणून त्यांची निवड महाराज परिवारातून करण्यात आली आहे.

यामुळे देशभरात पसरलेल्या गोरबंजारा समाजामध्ये आदराचे स्थान विधान परिषद सदस्य बाबुसिंग महाराज यांना आहे. पोहरादेवी येथील दानशूर बामनलाल महाराज देवस्थान येथे महाराज परिवारातील सदस्यांच्या उपस्थितीत बंजारा समाज बांधवांच्या वतीने राज्याचे राज्यपाल यांच्याकडून विधानपरिषद सदस्य म्हणून केलेल्या नेमणुकीनिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला.

# प्रत्येकाने आई वडिलांची सेवा निःस्वार्थ केली पाहिजे : कोलते

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ७ :



प्रत्येकाने आई वडिलांची निस्वार्थ सेवा केली पाहिजे. असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. रमाकांत कोलते यांनी केले. ते नलिनी वेरुळकर यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ५ नोव्हेंबरला आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. आपल्या मुलांना चांगले संस्कार देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. यासाठी आई वडिलांनी सुद्धा आपले आदर्श जीवन व्यथित करुन चांगले संस्कार देणे गरजेचे आहे असे विचार व्यक्त केले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री राजाभाऊ ठाकरे, प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे, उपशिक्षणाधिकारी प्रदीप गोडे, सत्कार मूर्ती नलिनी वेरूळकर, प्रा. घनश्याम दरणे, वासुदेव महाराज, डॉ. सतपाल सोहळे, शिक्षक नेते मधूकर काठोळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी नलिनी वेरूळकर यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिवणार्थ या स्वलिखित ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. रमाकांत कोलते यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. प्रशांत गावंडे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की शिक्षणातून विचार परिवर्तन होईल असे नाही.

परिसरातून, समाजातून काही चांगल्या गोष्टी आपण आत्मसात करू शकतो. कुटुंबामध्ये सुसंवाद साधण्यासाठी आईचे महत्त्वाचे स्थान आहे. सुसंवाद ठेवण्याचे महान कार्य आई करते. असे महत्व पुर्ण विचार त्यांनी व्यक्त केले.

उपशिक्षणाधिकारी प्रदीप गोडे यांनी कुटुंबाला एकत्र आणण्याचे काम आई करते. असे ते म्हणाले यावेळी माजी मंत्री राजाभाऊ ठाकरे, डॉ. सतपाल सोहळे यांनी समयोचीत विचार व्यक्त केले. नलिनी वेरूळकर यांनी ग्रंथाला नेहमी शरण गेले पाहिजे. ग्रंथ हे संत आहे. संत हे जगताना दुसऱ्याचा विचार करतो. माणसाने कधी ही कोणाचा द्वेष करु नये. असे मार्मिक विचार त्यांनीं व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आयोजन महेंद्र वेरूळकर यांनी कौटुंबिक व सामाजिक जाणिवेतून केले होते. हा समजाभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करुन त्यांनी आदर्श निर्माण केला. याप्रसंगी विविध कर्मचारी, शिक्षक, अधिकारी व आप्तेष्ट उपस्थित होते. यामध्ये तेजेस तिवारी, महेश सोनेकर, संजय बिहाडे, ज्ञानेश्वर नाकाडे, पुंडलिक बुटले, मनिष लढी, मुकेश भोयर, शरद घारोड, पखाले, प्रदीप खंडाळकर,रत्नाकर वरगट, राजहंस मेंढे, सुनिता गुघाने, सचिन इंगोले, महेंद्र वेरूळकर मित्र परिवाराची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक विजय ठाकरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सचिन वेरूळकर यांनी मानले.

# पोलिस कर्मचाऱ्याचा बसखाली चिरडून मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी
तिवसा, दि. ७ :

तिवसा विधानसभा मतदार संघाचे भाजप उमेदवार राजेश वानखडे यांच्या प्रचारार्थ भाजप नेते व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची मोझरी येथे बुधवारी ६ नोव्हेंबरला सभा आयोजित केली होती. या सभेच्या बंदोबस्तासाठी चांदूर बाजार पोलिस स्टेशन येथील पोकाँ संदीप देविदास चौधरी (४०, रा. परतवाडा) कर्तव्यावर गेले असता, एसटी बसने दिलेल्या धडकेत त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. परतवाडा शहरातील कांडली येथील सरस्वती नगर येथे संदीप चौधरी कुटुंबासह राहतात. दरम्यान बुधवारी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची गुरुकुंज मोझरी येथे प्रचार सभा होती. त्याच्या बंदोबस्तासाठी संदीप चौधरी यांची ड्युटी लावली होती. सभा आटोपल्यानंतर संदीप चौधरी हे बंदोबस्तावरून त्यांच्या दुचाकीने (एमएच २७/ डीडी ०९८४) परत जात होते. त्याच वेळी अमरावती वरून नागपूरकडे जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसची (एमएच ४०/ सीएम ५८५१) त्यांना धडक बसली. त्यात त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. मृतदेह शवविच्छेदनासाठी तिवसा उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. पुढील कारवाई तिवसा पोलिस करीत आहेत. मृत संदीप चौधरी यांच्या पश्चात आईवडील, पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.

## एलसीबीने २ धारदार तलवारी केल्या जप्त

**पुसद** : संभाजी नगरात राहणाऱ्या एका तरुणाकडे धारदार तलवार असल्याची माहिती एलसीबी पथकाला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे एलसीबी पथकाने दि. ५ नोव्हेंबरला संध्याकाळी ६.३० वाजताच्या दरम्यान संभाजी नगरात राहणाऱ्या युवकाच्या घरी धाड टाकली. त्या धाडीमध्ये दोन धारदार तलवारी जप्त केल्या आहे. त्याच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यामध्ये विविध कलमान्वये गुन्हे दाखल झाले आहेत.

शेषराव उत्तम लोंढे (वय २८) वर्ष रा. संभाजीनगर असे कारवाई झालेल्या युवकाचे नाव आहे. त्याच्या विरोधात पोलिस कॉन्स्टेबल सुनील पंडागळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून दि. ५ नोव्हेंबर रोजी रात्री ११.२६ वाजता विविध कलमान्वये गुन्हे दाखल झाले आहे. या प्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, शेषराव लोंढे यांच्याकडे तलवार असलेल्याची खात्रीलायक माहिती मिळतच एलसीबी पथकातील सहायक पोलिस निरीक्षक गजानन गजभारे, पोलिस उपनिरीक्षक शरद लोहकरे, हेड कॉन्स्टेबल सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, पोलिस कॉन्स्टेबल मोहम्मद ताज यांनी धाड टाकली.

# ४७६६ कुटुंबांना मतदान करण्याची विनंती : मतदार जागृती उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी
शेगाव, दि. ७ :

शेगाव ग. भि. मुरारका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे गावनिहाय तयार केलेल्या गटाने शेगाव तालुक्यातील २३ ग्रामपंचायत आणि गटग्रामपंचायतील एकूण १०२२ कुटुंबापर्यंत जावून मतदार जागृती केली. शेगाव शहरातील विद्यार्थ्यांचे प्रभागनिहाय गट तयार केले. त्या विद्यार्थ्यांनी आपापल्या प्रभागातील ४७६ कुटुंबापर्यंत जाऊन




मतदान करण्याची विनंती केली. अशाप्रकारे शहरी व ग्रामीण भागातील एकूण १४९८ कुटुंबातील मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधताना उपलब्ध करून दिलेल्या प्रपत्रात माहिती गोळा केली. निवडणूक आयोग आणि तहसील कार्यालय शेगाव यांच्या निर्देशानुसार ग. भि. मुरारका महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागांतर्गत निवडणूक साक्षरता क्लबने विधानसभा निवडणूक २०२४ करिता २३ ते २६ ऑक्टोबर दरम्यान मतदार जागृती अभियान राबवले. बी. ए. च्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून मतदार जागृती उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेसह इतर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे घेतलेला सहभाग अभिमानास्पद आहे. हा उपक्रम नवमतदारांमध्ये उत्साह वाढवणारा ठरला. शेगाव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सतीशकुमार मुरारका, सचिव कांतीलाल व्यास, संचालक रवीकुमार मुरारका यांनी या राष्ट्रीय उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घेतलेला सहभाग उल्लेखनीय व कौतुकास्पद असल्याच्या प्रतिक्रिया दिल्या. मतदानाबाबत जागृती करताना मुरारका महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी. निवडणूक अधिकाऱ्यांनी घेतली उपक्रमाची दखल आचारसंहितेचे पालन करून मतदार जागृती उपक्रम राबवण्याच्या सूचना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विनोद इंगळे यांनी विद्यार्थ्यांना दिल्यात. नोडल अधिकारी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विनोद गायकवाड यांनी या उपक्रमाचे नियोजन केले. डॉ. अनिल बनकर, बीएलओ नागसेन जवंजाळ यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी दिलेली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडल्याने त्याची दखल निवडणूक अधिकाऱ्यांनी घेतली.


**Format C-1**

*(for candidate to publish in Newspaper, TV)*

**Declaration about Criminal Cases**

As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation and others V/s. Union of India and Another's)
Name and address of Candidate: **PURUSHOTTAM NAGORAO HAJARE,**
R/O. VINOBA BHAVE NAGAR NAGPUR-440035
**Name of Political Party :- INDEPENDENT**
**Name of Election :- MAHARASHTRA STATE ASSEMBLY ELECTION, 2024**
**Name of Constituency: - 54, EAST ASSEMBLY CONSTITUENCY, NAGPUR**
I, **PURUSHOTTAM NAGORAO HAJARE** a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|
| 1 | 18TH C.J.J.D. AND JP/PC COURT, NAGPUR | R.C.C CASE FIR NO. 302619/2014 REGISTRATION DATE-28/08/2014 NEXT DATE- 06/01/2025 | SECTION 147, 148, 149 506- B, 504, 427 (IPC) . |
| 2 | 11TH J.C.J.J.D. & JMFC, PUNE | R.C.C CASE FIR NO. 302180/2014 REGISTRATION DATE-14/07/2014 NEXT DATE- 06/01/2025 | SECTION 147, 148, 324, 149 506- B, 504, 427 (IPC) . |
| 3 | 18TH C.J.J.D. AND JP/PC COURT, NAGPUR | R.C.C CASE FIR NO. 301604/2014 REGISTRATION DATE-14/07/2014 NEXT DATE- 06/01/2025 | SECTION 143, 387, 363,427, 506- B, (IPC) . |

**(B) DETAILS OF CRIMINAL CASES WHERE CONVICTED**

| Sl. No. | Name of Court & date of order | Case No. and quantum of punishment imposed | Maximum punishment awarded |
|---|---|---|---|
| 1. | NOT APPLICABLE / NIL | NOT APPLICABLE / NIL | NOT APPLICABLE / NIL |

PLACE : NAGPUR
DATE : 07/11/2024

SD/-
PURUSHOTTAM NAGORAO HAJARE


# सणासुदीच्या काळात एसटीच्या खिळखिळ्या बसची डोकेदुखी

■ महासागर प्रतिनिधी,
पुसद, दि. ७ :

पुसद आगारातील मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या एसटी बसेस या खिळखिळ्या झाल्या आहेत. ऐन दिवाळीच्या नंतर ये-जा करणाऱ्या प्रवाशांसाठी एसटी बसेस डोकेदुखी ठरत आहे. नादुरुस्त बस लांब पल्ल्याचा प्रवास करीत आहे. दिवाळीच्या सणानंतर आगारात प्रवाशांची अलोट गर्दी असून सध्या उत्पन्नात भर पडत आहे. खेळ खेळ व नादुरुस्त बसेस मुळे प्रवासी वर्ग खासगी बसकडे वळत आहे.

नुकत्याच दिवाळीचा सण साजरा करण्यात आला. दिवाळीनंतर येजा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक राहते. यामुळे आगारात प्रवाशांची संख्या वाढली आहे. अशातच पुसद आगाराची बस क्रमांक एमएच -४०- एन- ८९६० परभणी वरून पुसद आगारात दि. ६ नोव्हेंबर रोजी येत असतानाच सावरगाव बंगला ते सांडवा गावाच्या मधोमध सकाळी १०.२० वाजताच्या दरम्यान बस बंद पडली होती. याबाबत वाहन चालकाला विचारले असता त्यांनी इंजिनमध्ये बिघाड झाल्याचे सांगितले. मात्र प्रवाशाची गरज होऊ नये, यासाठी चालक व वाहकाने महामंडळाच्या हिंगोलीकडून येणाऱ्या पयार्यी बसची व्यवस्था करून त्यांना पुसदला रवाना करण्यात आले होते. एसटीच्या विविध योजना व वाढती महागाईचा विपरीत परिणाम एसटी महामंडळावर होत आहे. वर्षभरापासून खासगी बस सेवा तसेच राज्य परिवहन महामंडळामध्ये उत्पन्नाच्या बाबतीत स्पर्धा सुरू असल्याचे वास्तव समोर आले आहे.

त्या अनुषंगाने प्रवाशांसाठी विविध प्रकारच्या योजना एसटी महामंडळाच्या वतीने सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये महिलांना अर्धे तिकीट, हिरकणी कक्ष, विद्यार्थ्यांना पास सेवा, ज्येष्ठांना विनामूल्य बस प्रवास योजना, मुलींसाठी अहिल्याबाई होळकर मोफत पास योजना, मोफत विमा योजना आदी प्रकारच्या योजना राबवण्यात आल्या आहेत. प्रवाशांसाठी लाभदायक असलेल्या योजना एसटी महामंडळाने राबवल्या, तरी प्रवासादरम्यान आवश्यक त्या सुविधा प्रवाशांना मिळत नाही.

विविध कर्मचाऱ्यांचा अभाव, विविध योजनांचा भार, एसटी बसची झालेली दुरवस्था व महामंडळाला होत असलेला तोटा आदी सर्व कारणांमुळे एसटी महामंडळाचा प्रवास खडतर झाला आहे. हा मार्ग सुकर करण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेण्याची गरज आहे परंतू एसटी महामंडळाच्या बसची तुटलेल्या खिडक्या, फाटक्या सीट व पावसाळ्याच्या दिवसात फाटलेल्या गळक्या छतामधून टपकणारे पावसाचे पाणी ही दुरवस्था पाहता प्रवाशांच्या सेवेसाठी ऐवजी प्रवाशांची कंबरडे मोडण्यासाठी, प्रवाशांची हाडे खिळखिळी करण्यासाठी असे म्हणण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे.


**मध्य रेल्वे**

**ई-निविदा सूचना**

ई-निविदा सूचना क्रमांक: NGP-ELECT-TRD-2024-25-05R3 दिनांक 23.10.2024 कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील आरआरए क्लॅम्पवरील आरयू संपर्क वायरचे विभाजन टाळण्यासाठी ओएचई ॲंकरिंग व्यवस्थेत बदल. कामाची अंदाजे किंमत: रु. ३,२७,१६,१६४.५८/- बयाणा रक्कम ठेव: रु. ३,१३,६००.००/- निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: २०-११-२०२४ रोजी १५.०० वाजता संकेतस्थळाचा पत्ता: या ई-निविदेबद्दल आणि ई-निविदेत ऑनलाइन सहभागासाठी संबंधित तपशील रेल्वेच्या www.ireps.gov.in वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी),
ANJ/38/355 नागपूर

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

# कर्करोगाचे निदान करा, हयगय नको!



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

जागतिक कर्करोग दिन हा ४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून ओळखला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पाळला जातो. तसेच जागतिक समुदायाला शिक्षण सुधारण्यासाठी आणि कर्करोगाविरूद्धच्या लढ्यात वैयक्तिक, सामूहिक आणि सरकारी कृती प्रज्वलित करतो. जागतिक कर्करोग दिन २००८ मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या मार्गदर्शनाने साजरा केला जातो. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे हे आहे. तसेच कर्करोगापासून बचाव करता येण्याजोग्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संकल्पना आहे असे मानले जाते.

---

जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहिती विरोधात जनजागृती करतो, जागरूकता वाढवतो आणि हानी कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने बाधित झालेल्यांना पाठिंबा देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. यापैकीची एक चळवळ म्हणजे No Hair Selfie असून, यात लोकांनी स्वतःचे डोके मुंडन करून किंवा तशी आभासी प्रतिमा निर्माण करून ती सोशल मीडियावर प्रगट करण्याची जागतिक चळवळ आहे. याद्वारे कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी एक प्रकारे मानसिक पाठिंबा दर्शविण्याची ही एक कृती आहे. अशा प्रकारचे जगभरात शेकडो कार्यक्रम घेतले जातात. जागतिक कर्करोग दिनाची स्थापना ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली.

जागतिक कर्करोग दिनाचा परिचय हा पॅरिस चार्टरचा एक महत्त्वाचा घटक आहे, जो कर्करोग संशोधन, प्रतिबंध, रूग्णांची काळजी, जागरूकता आणि जगभरात एकत्रीकरणाचाही प्रयत्न करतो. संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रुग्ण सेवा सुधारण्यासाठी पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद तयार करण्यात आली होती. त्यामध्ये जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, ज्यावर तत्कालीन युनेस्कोचे संचालक, कोचिरो मत्सुरा आणि तत्कालीन फ्रान्सचे अध्यक्ष जॅक शिराक ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिसमध्ये या समिटमध्ये स्वाक्षरी केली होती.

सोप्या भाषेत सांगायचे तर, कर्करोग हा जगातील प्रमुख मारकांपैकी एक आहे. केवळ या वर्षी, जवळजवळ 9.6 दशलक्ष लोक कर्करोगाने मरतील आणि त्यावर नियंत्रण न ठेवता, 2030 पर्यंत दरवर्षी मृत्यूची संख्या 13.2 दशलक्षपर्यंत वाढेल. प्रतिबंध, शोध आणि उपचार कार्यक्रमांसाठी वाढीव सरकारी मदत आणि निधीमुळे यापैकी बरेच मृत्यू टाळले जाऊ शकतात.

कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि या आजाराला तोंड देण्यासाठी व्यावहारिक धोरणे विकसित करण्यासाठी तातडीने पावले उचलली नाहीत तर लाखो लोक मरत राहतील. दुर्दैवाने, कॅन्सरमध्ये सर्वात जास्त वाढ कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होण्याचा अंदाज आहे, जे रोगाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावाचा सामना करण्यास सर्वात कमी सज्ज आहेत. या आजाराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि कर्करोगाचे ओझे कमी करण्यासाठी व्यावहारिक रणनीती विकसित करण्यासाठी तातडीने कृती करण्याची गरज आहे. जागतिक कर्करोग दिन हा शब्द पसरवण्याची आणि आंतरराष्ट्रीय मीडिया आणि जागतिक आरोग्य आणि विकास कार्यक्रमांमध्ये या रोगाबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करण्याची योग्य संधी आहे.

जागतिक कर्करोग दिन रन फॉर ए क्युअर आफ्रिकाची आठवण करून देतो की कर्करोग ही जागतिक आणीबाणी आहे आणि आपण प्रत्येकजण या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपली भूमिका कशी बजावतो. रन फॉर ए क्युअर आफ्रिकाहा वकिलांच्या मोठ्या समुदायाचा एक भाग कसा आहे, याची साक्ष देणे, आमच्या कायार्ला असेच देते.

कर्करोग अशी स्थिती आहे ज्यामध्ये शरीरातील काही पेशी अनियंत्रितपणे विकसित होतात आणि शरीराच्या इतर भागांमध्ये पसरतात. जागतिक स्तरावर, कर्करोग हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे, 2020 मध्ये एक कोटीपेक्षा जास्त मृत्यूचे कारण आहे. भारतात, 2022 मध्ये अंदाजित 19 ते 20 लाख प्रकरणे आढळून आली आहेत. तंबाखूचा वापर, दीर्घकाळ मद्यपान, अस्वस्थ अन्न सवयी, शारीरिक व्यायामाचा अभाव आणि वायू प्रदूषणाच्या संपर्कात येणे हे सर्व कर्करोगाच्या धोक्याचे घटक आहेत.

कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या राष्ट्रांना अनेक जुनाट आजारांमुळे होणाऱ्या कर्करोगाच्या जोखमीला तोंड देण्याचे अनोखे आव्हान आहे. या व्यतिरिक्त या राष्ट्रांनी शिक्षणाचा अभाव, विलंब निदान आणि स्वस्त उपचारांसाठी कमी प्रवेश यामुळे कर्करोगाचे खराब निदान दर्शविले होते. विकसनशील देशांमध्येही, कर्करोगाबाबत जागरूकता नसल्यामुळे निदानास विलंब होतो. 2020 मध्ये नोंदवलेला एक अभ्यास, भारतातील चार प्रमुख केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता, जेथे कर्करोगाचे बहुसंख्य रुग्ण त्यांच्या प्रगत अवस्थेत असतानाच प्रथमच उपचार घेतात. साक्षरता दर आणि कमी उत्पन्नाचा कर्करोग जागरूकतेवर खूप प्रभाव पडतो. भारतात, उच्च उत्पन्न आणि साक्षरता पातळी असलेले लोक इतरांपेक्षा कर्करोगाविषयी अधिक जागरूक होते.

निष्कर्षापर्यंत, भारतीय आणि जागतिक लोकसंख्येमध्ये कर्करोगाची तपासणी, प्रतिबंध आणि उपचारांबद्दल सामान्य जागरूकता कमी आहे, विशेषतः कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे ज्यामुळे कर्करोगाचा प्रादुर्भाव वाढतो आणि ती भरून काढण्याची तातडीची गरज आहे. योग्य शिक्षणासह कमतरता.

जागतिक कर्करोग दिन कर्करोग टाळण्यासाठी, तो लवकर शोधणे आणि उपचार करणे किती महत्त्वाचे आहे याकडे लक्ष वेधतो. कर्करोगाचे अनेक प्रकार टाळता येत नसले तरी, काही लोक निरोगी जीवनशैली जगत असले तरीही त्यांना कर्करोगाचे निदान केले जाईल. कर्करोगाचा धोका अनेक मार्गांनी कमी केला जाऊ शकतो.

यासह फळे आणि भाज्या जास्त आणि प्रक्रिया केलेले पदार्थ आणि लाल मांस कमी असलेले पौष्टिक आहार घेणे, नियमित व्यायाम आणि निरोगी वजन राखणे, तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरापासून दूर राहणे, किमान अल्कोहोल सेवन, अतिनील किरणांपासून सावधगिरी बाळगण्यामध्ये सनस्क्रीन वापरणे आणि संरक्षणात्मक कपडे घालणे समाविष्ट आहे. तसेच शिफारस केलेल्या कर्करोगाच्या तपासणीमध्ये नियमितपणे सहभागी होणे, पर्यावरणातील हानिकारक रसायनांचा संपर्क टाळणे, ह्युमन पॅपिलोमाव्हायरस विरुद्ध लसीकरण ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो.

या वर्षी जागतिक कर्करोग दिनाची थीम आहे केअर गॅप बंद करा, जी 2022 थीमची निरंतरता आहे आणि प्रत्येक वषार्साठी निर्दिष्ट उद्दिष्टांसह 3 वर्षांची मोहीम चालेल.

बहु-वर्षीय मोहिमेमध्ये अधिक एक्सपोजर आणि प्रतिबद्धता, तसेच जागतिक जागरूकता वाढवण्याच्या आणि प्रभाव पाडण्याच्या अधिक संधी मिळतील अशी अपेक्षा होती. एकत्रितपणे आम्ही सत्तेत असलेल्यांना आव्हान देतो. अंतिम वर्ष कर्करोगाच्या प्राधान्याबाबत उच्च अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेणे, असमानतेचा सामना करण्यासाठी सर्जनशील धोरणे विकसित करणे आणि न्याय्य आणि कर्करोगमुक्त जग निर्माण करण्यासाठी संसाधनांचे वाटप करण्यावर भर देतो.

●●●●●●●●●

# शहरे गुदमरली....

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे देशातील प्रमुख शहरांत रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे.

शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तिन्ही दिवशी दिल्लीसह देशातील प्रमुख शहरांच्या हवेचा निदेशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेली शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. शालेय शिक्षण विभागाने तर शालेय विद्यार्थ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली होती.

न्यायालयाने फटाके उडविण्यास परवानगी दिली मात्र वेळेचे बंधन घातले या सगळ्या आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करत मनसोक्त फटाकेबाजी केली. वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याचा व्हायचा तो परिणाम झालाच.

फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः दिल्ली, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले. जी शहरे कमी प्रदूषित शहर म्हणून गणली जात होती त्या शहरातही हवेचे प्रदूषण कमालीचे वाढल्याचे एका अहवालातून समोर आले आहे. मुंबई, पुण्याच्या तुलनेत ग्रामीण भागात कमी प्रदूषण असते मात्र यावेळी ग्रामीण भागातही प्रदूषण कमालीचे वाढले. ग्रामीण भागात पहिल्यांदाच इतके प्रदूषण दिसून आले. याला फटाकेच जबाबदार आहेत.

मुंबई, नवी मुंबई हेच शहरे नाही तर पुणे, नागपूर, औरंगाबाद यासारख्या शहरातही फटाक्यांच्या आतषबाजीने प्रदूषण वाढले आहे. केवळ राज्यातीलच नाही तर देशातीलही अनेक शहरात फटाक्यांमुळे प्रदूषण वाढले आहे. देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिल्ली शहरातील हवा या वर्षीही अती प्रदूषित श्रेणीत गणली गेली आहे. आपल्या राज्यासह देशात उत्सवाच्या नावाखाली लोकांनी मनमानी करत बेसुमार फटाक्यांची आतषबाजी केली त्यामुळेच दरवर्षीपेक्षा यावर्षी अधिक प्रमाणात फटाके उडवण्यात आले त्याच्याच परिणाम म्हणजे राज्यातील अनेक शहरे अतिप्रदुषित किंवा प्रदूषित श्रेणीत गणली गेली.

सर्वोच्च न्यायालयाने ही यावर नाराजी व्यक्त करत दिल्ली व केंद्र सरकारला फटकारले आहे. अर्थात हवा प्रदूषित होण्यास केवळ फटाके हेच एकमेव कारण आहे असे नाही तर वाढती वाहने हे ही एक महत्वाचे कारण यामागे आहे मात्र दिवाळीत प्रदूषणाची पातळी खूप वाढते हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही. गुरुवारी संध्याकाळी पुण्या - मुंबईच्या हवेची पातळी समाधानकारक या श्रेणीत होती ती अवघ्या चोवीस तासात वाईट या श्रेणीत पोहचली. याचाच अर्थ बेसुमार फटाकेबाजीने हवा प्रदूषित झाली.

हवा प्रदूषित झाल्याने शहरांचा जीव गुदमरला आणि नागरिकांचा श्वास कोंडला. दिवाळी नंतर अस्थमाच्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. या दूषित हवेचा सर्वाधिक फटका लहानमुले, गरोदर महिला, वृद्ध नागरिक व व्याधीग्रस्त रुग्णांना बसला शिवाय फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहिल्या. अनेक मुले फटाक्यांमुळे जखमी झाले तर काही ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागून दुर्घटना घडल्या त्यात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली.

हे सर्व टाळायचे असेल तर किमान पुढील वर्षांपासून तरी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करायला हवी. सरकारनेही फटाक्यांवर बंदी आणायला हवी आणि हो ही बंदी केवळ दिवाळी पुरतीच नको तर कायमस्वरूपी हवी कारण दिवाळी व्यतिरिक्त इतर वेळीही फटाके वाजवले जातात. दिवाळीत त्याचे प्रमाण अधिक असते इतकेच. त्यामुळेच दिवाळीत फटाक्यांचे दुष्परिणाम तीव्रतेने दिसून येतात.

---

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

●●●●●●●●●




**उत्तरार्ध**

**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

वाढती लोकसंख्या ही भारताच्या विकासातील मोठा अडथळा आहे. या वाढत्या लोकसंख्येला सोयी-सुविधा पुरविण्यासाठी शहरपातळीवर कोणकोणत्या योजना राबवायला हव्यात, याविषयीचे विश्लेषण करतानाच दुसऱ्या बाजूला वाढत्या लोकसंख्येमुळे शहराचे कसे बकालीकरण होत आहे, यावर टाकलेली ही एक नजर. ११ जुलै या जागतिक लोकसंख्येवरून...

शहरीकरण म्हणजे शहराच्या लोकसंख्येची व त्याच्या क्षेत्राची वाढ. वाढते औद्योगिकीकरण व खेड्यातून शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतर यांचासुद्धा शहरीकरणामध्ये समावेश होतो. सन २०११च्या जनगणनेनुसार ३०.१६ टक्के लोकसंख्या शहरामध्ये राहते. एका पाहणीनुसार २०३० पर्यंत जवळपास २५ कोटी अतिरिक्त लोकसंख्या शहरांमध्ये येणार आहे. असेही दिसून आले आहे, की शहरीकरण आणि विकास हे बरोबरीनेच चालतात. जी राज्ये झपाट्याने विकास करत आहेत त्यांचाच शहरीकरणाचा वेग अधिक आहे.

२०१२-१३ सालच्या पाहणीनुसार महाराष्ट्राच्या शहरीकरणाची टक्केवारी ४५.२ टक्के होती. ती सन २०३०पर्यंत ५८ टक्के होण्याची शक्यता आहे. भारतातील ३ मोठ्या मेट्रो शहरांची लोकसंख्या जगातील काही देश जसे कॅनडा, मलेशिया, सौदी अरेबिया, ऑस्ट्रेलिया यांच्यापेक्षा मोठी होईल. या सर्व वाढत्या लोकसंख्येचा आजच्या शहरांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होणार आहे. या सर्व परिणामांचा सूक्ष्मपणे विचार करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण शहरीकरण आणि त्याचा वेग यांना थोपवणे आता जवळपास दुरापास्त आहे आणि देशाच्या विकासाच्या दृष्टीने शहरीकरण आवश्यकसुद्धा आहे.

शहरीकरण म्हणजे लोकसंख्येचे ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर , ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या प्रमाणात होणारी घट आणि समाज या बदलाशी जुळवून घेण्याचे मार्ग. याचा अर्थ ग्रामीण भागाऐवजी शहरी भागातील लोकसंख्या वाढ असाही होऊ शकतो. ही मुख्यतः अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे शहरे आणि शहरे तयार होतात आणि अधिक लोक मध्यवर्ती भागात राहण्यास आणि काम करण्यास सुरवात करतात तेव्हा ते ठिकाण मोठे होतात.

शहरीकरणाला चांगली बाजूही आहे. देशाचा आर्थिक विकास हा शहरीकरणावरही अवलंबून असतो. सन २०३०पर्यंत भारताचे ७० टक्के स्थूल राष्ट्रीय उत्पन्न शहरातून येणार आहे. कारण देशाच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत औद्योगिकीकरण व सेवा क्षेत्रात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही हेच चित्र दिसते. विकसित देशातील शहरीकरणाची टक्केवारी ही नेहमीच जास्त असते. अमेरिकेमध्ये शहरीकरणाचे प्रमाण ८० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. शहरीकरणामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारतो. मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. त्याचबरोबर आजूबाजूच्या खेड्यांचा सुद्धा विकास होत असतो. परंतु विकासाबरोबरच शहरीकरणाची काळी बाजूसुद्धा ठळकपणे दिसून येते.

शहरीकरणामुळे शहरातील सोयीसुविधांवर मोठ्या प्रमाणावर ताण वाढतो व शहरी वातावरणाचा समतोल बिघडतो. काही शहरे वगळता सर्व शहरांमध्ये सध्याच्या लोकसंख्येला आवश्यक असलेला पाणी पुरवठा, मलनिःसारण व्यवस्था, वाहतूक व्यवस्था याची मोठ्या प्रमाणावर कमतरता भासते. त्या पुरवतानाच स्थानिक संस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळेच वाढीव लोकसंख्येमुळे त्या सोयीसुविधांवर आणखीनच प्रचंड ताण पडणार आहे.

या सर्व सुविधांची गरज सन २०३०पर्यंत कितीतरी पटीने वाढणार आहे. शहरांना भेडसावणारी मुख्य समस्या म्हणजे पाणीपुरवठा, ज्याची मागणी २.५ पटीने होणार आहे. आजच शहरातील जमा झालेल्या घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य जागा व व्यवस्था उपलब्ध नाही. सन २०३०पर्यंत घन कचऱ्यामध्ये ५ पट वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा प्रश्न अधिकच बिकट होणार आहे.

दुसरी समस्या म्हणजे रस्ते आणि वाहतूक. मोठ्या शहरातील वाहतूक व्यवस्था घाईगर्दीच्या वेळेमध्ये नेहमीच कोलमडते. उदारीकरणामुळे सर्वसामान्यांची क्रयशक्ती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे खाजगी वाहनांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. आजच गर्दीच्या वेळी रस्त्यांवर वाहनांची रांगच रांग लागते. पुढे तर खाजगी वाहनांची संख्या जवळपास दुपटीने वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येवर आतापासूनच विचार केला नाही तर भयानक परिस्थितीचा सामना करावा लागेल.

शहरातील बहुतांश लोकसंख्या ही लघू आणि मध्यम उत्पन्न गटातील असते. शहरातील गगनाला भिडणाऱ्या जमिनीच्या दराने तसेच बांधकामाच्या वाढीव खर्चामुळे त्यांना परवडणाऱ्या किमतींमध्ये घरं उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे त्यांना नाइलाजाने झोपडपट्टीचा आसरा घ्यावा लागतो. आज मुंबईतील ६० टक्के जनता झोपडपट्टीमध्ये राहते. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची आजची परिस्थिती पाहिली की कुणाही सुजाण नागरिकाची मान लाजेने खाली जाते.

सन २०३०मध्ये परवडणाऱ्या घरांची मागणी ३.८ कोटींवर जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे झोपडपट्ट्यांमध्ये वाढ होतच राहणार आहे. शहरीकरणाचा परिणाम पर्यावरणावरही मोठ्या प्रमाणावर होत असतो.

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**

●●●●●●●●●




# अनोख्या जीवन प्रवासाची गाथा सांगणारा 'जर्नी'

सचिन दाभाडे फिल्म प्रस्तुत 'जर्नी' चित्रपट येत्या २९ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर झळकले आहे.

आयुष्य, नाती आणि कुटुंबाशी असलेला संघर्ष असणाऱ्या या 'जर्नी'मध्ये शुभम मोरे, माही बुटाला, निखिल राठोड या बालकलाकारांची प्रमुख भूमिका असून याव्यतिरिक्त या चित्रपटात शंतनू मोघे, शर्वरी जेमेनीस, अंजली उजवणे, योगेश सोमण, ओमकार गोवर्धन, सुनील गोडबोले, मिलिंद दास्ताने, प्रशांत तपस्वी यांच्याही मुख्य व्यक्तिरेखा आहेत. चित्रपटाचे लेखन रवींद्र मठाधिकारी यांनी केले आहे. सचिन दाभाडे यांनी कथा, निर्माति, दिग्दर्शकाची धुरा सांभाळली असून भास्कर देवेंग्रेकर, तानाजी माने, संतोष राठोड, अनिकेत अरविंद बुटाला सहनिर्माति आहेत. आयुष्याचा किंवा पर्यटनाचा प्रवास असो प्रत्येक अनुभव काही ना काहीतरी शिकवून जातो. या प्रवासात चढउतार येत असतात तेव्हा अनेक गोष्टींचे महत्व समजते. ही 'जर्नी' त्यांना कोणत्या वळणावर घेऊन जाईल, लवकरच कळेल. ●●●

# निवडणुका आणि आश्वासने!

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

निवडणूक मग ती ग्रामपंचायतीची असो वा विधानसभेची, एकदा तारखेची घोषणा झाली कि समस्त प्रमुख पक्ष तयारीला लागतात. इच्छुक उमेदवार पक्षश्रेष्टींचे निवडणुका म्हणजे लोकशाहीच महोत्सव.

काहीजण याकडे युद्ध म्हणूनही पाहतात. प्रेमात आणि युद्धात साम, दाम, दंड, भेद सर्वकाही माफ असते त्याप्रमाणे निवडणुकांमध्ये या सर्व बाबींचा समस्त पक्षांकडून कमी अधिक प्रमाणात वापर केलाच जातो. अनेक इच्छुक उमेदवार बाशिंग बांधून तयार असताना कोणालाही न दुखावता त्यापैकी एकालाच पक्षाचे तिकीट देऊन इतरांना कसे सांभाळायचे यामध्ये पक्षश्रेष्टींच्या अनुभवाचा कस लागतो. एखादा नेता आपल्या पक्षाशी किंवा स्थानिक जनतेशी किती प्रमाणात प्रामाणिक आहे हे खरेतर निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यावरच कळते.

एरव्ही शेवटच्या श्वासापर्यंत पक्षाचे काम करण्याच्या बतावण्या करणारी नेतेमंडळी पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून एका रात्रीत पक्ष बदलायला मागेपुढे पाहत नाहीत. एखादा नेता परिसरात नावाजलेला असला कि त्याला गळाला लावण्यासाठी अन्य पक्षही फासे टाकून बसलेलेच असतात. यंदा ही रस्सीखेच पाहायला मिळाली. निवडणुकांच्या तोंडावर मतदारांना आकृष्ट करण्यासाठी समस्त पक्षांकडून त्यांचे जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. ज्यामध्ये आश्वासनांचा पाऊस पाडलेला असतो.

या आश्वासनांमध्ये विकासासोबत महागाई नियंत्रण, जातीय आरक्षण, शेतकऱ्यांना कर्जमाफी, तरुणांना रोजगार, महिला सबलीकरण यांसारख्या अनेकविध बाबींचा प्रामुख्याने समावेश केलेला असतो. पक्षांच्या जाहीर सभांतूनही आम्हीच कसा राज्याचा विकास घडवू शकतो, आम्हीच कसे जनतेचे तारणहार आहोत याच्या बतावण्या केल्या जातात. निवडणुका पार पडल्यानंतर सत्तेत आलेल्या पक्षाला या आश्वासनांचा सोयीस्कर विसर पडतो. निवडणूका जवळ आल्या कि पुन्हा विकास कामांना सुरुवात होते. वर्षानुवर्षे भारतात हेच सुरु आहे. नेत्यांच्या आश्वासनांना सामान्य जनता बळी पडते. निवडणूक आयोगाने गेल्या काही वर्षांत निवडणुकीनिमित्त केल्या जाणाऱ्या खर्चावर आणि पद्धतींवर बंधने आणल्यामुळे तसेच पूर्वीच्या तुलनेत आचारसंहिता अधिक कडक केल्याने निवडणूक प्रक्रियेमध्ये बऱ्यापैकी शिस्त आली आहे'; मात्र आश्वासने देण्यावर कोणतेही बंधन नसल्याने पक्षांचे फावते.

वास्तविकतः निवडणुकांच्या तोंडावर दिल्या जाणाऱ्या आश्वासनांवरसुद्धा बंधने असायला हवीत. राजकीय पक्ष देत असलेली आश्वासने कशी पूर्ण करणार, त्यासाठी आर्थिक नियोजन कसे असणार, किती कालावधीत त्यांची पूर्तता करणार, आश्वासनांपैकी किती बाबींची जनतेला खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे, एखाद्या समाजाला आरक्षण देण्याची आश्वासने तुम्ही देत आहात तर त्या समाजाला आरक्षणाची खरंच आवश्यकता आहे का? याविषयीचा सविस्तर लेखा जोखा प्रमुख पक्षांनी प्रशासनाकडे निवडणुकीपूर्वी प्रतिज्ञा पत्रासह सादर करणे बंधनकारक करावे.

या आश्वासनांच्या पूर्तीवर नियंत्रण ठेवणारे आणि त्यांना वेळोवेळी जाणीव करून देणारे स्वतंत्र मंडळ असावे. आश्वासनांची वेळेत पूर्ती न करणाऱ्यांना दंडित करण्याचे सुद्धा प्रावधान असावे. असे काही केल्याशिवाय जनतेला त्यांच्या बहुमोल मताचा मोबदला मिळणार नाही.

●●●●●

# कसे बर्न करणार फेस्टिव्ह फॅट ?




सण-उत्सवात आपण चिप्सची पाकिटे आणि घरी बनवलेला फराळ घेऊन टीव्ही बघत बसतो. थोडेसे खाल्ल्याने वजन वाढणार नाही असे आपल्याला वाटते. तर या छोट्या स्नॅक्समध्ये जास्त कॅलरीज असतात, ज्यामुळे आपले वजन वाढते.

**अशा प्रकारे फेस्टिव्ह फॅट कमी करा**

दिवाळीनंतर वाढलेले वजन कमी करण्यासाठी काही उपाय आहेत. वजन कमी करणे हे खूप अवघड काम असले तरी आज आम्ही तुम्हाला अशाच सोप्या पद्धतींबद्दल सांगणार आहोत ज्याचा अवलंब अनेक मोठे खेळाडू आणि सेलिब्रिटी करतात.

अधूनमधून उपवास करताना, तुम्ही 16 तास अन्न वगळू शकता आणि 8 तास खाऊ शकता. हा उपवास आठवड्यातून दोनच दिवस करावा लागतो. ही प्रक्रिया वजन कमी करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते. माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर, हॉलिवूड अभिनेता ह्यू जॅकमन आणि जॅकी चॅन यांसारखे अनेक लोक फिट राहण्यासाठी ही पद्धत अवलंबतात.

ग्रीन टीमध्ये अँटिऑक्सिडेंट असतात, जे चयापचय वाढवतात. विष आणि चरबी देखील कमी करते. सकाळी कोमट पाण्यात लिंबू पाणी, नारळ पाणी आणि जिरे पाणी पिऊन वजन कमी करू शकता.

जर तुम्ही सणासुदीच्या काळात वर्कआउट सोडला असेल तर तुम्ही ते आता पुन्हा सुरू करावे. योगाबरोबरच जॉगिंग, ब्रिस्क वॉक, सायकलिंग आणि पोहणे यासारखे कार्डिओ व्यायाम करून तुम्ही कॅलरी बर्न करू शकता.

फायबर आणि प्रथिने युक्त अन्न खाल्ल्याने लालसा कमी होते आणि तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटते. कोशिंबीर, ताजी फळे, हिरव्या भाज्या, मूग, हरभरा डाळ, टोफू यांचा आहारात समावेश करायला हवा.

पाणी शरीरातील चयापचय गतिमान करते आणि विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते. दररोज किमान 8-10 ग्लास पाणी प्या.

**यामुळे वाढू शकते वजन**



थंडीच्या दिवसात दिवस लहान असल्याने लोकांच्या जीवनशैलीत बदल होतात.

या दरम्यान सुट्ट्यांमध्ये वर्कआऊट बंद असल्यानेही वजन वाढू शकते.

तणावाच्या परिस्थितीत कार्टिसोल हार्मोन रिलीज होतो. तो वजन वाढण्यास कारणीभूत आहे.

कार्टिसोल हार्मोन मिठाई, खारट आणि चरबीयुक्त पदार्थ खाल्ल्याने क्रेविंग्स निर्माण करते.

झोपेच्या कमतरतेमुळे वजनही वाढते. उत्सवानंतर, किमान 7-8 तास झोप घ्या. या काळात तुमचे शरीर पुन्हा कार्यरत होते आणि चयापचय वाढवते. यामुळे चरबी बर्न करण्यास मदत होते.

सणाच्या आनंदाची जितकी काळजी आपण घेतो तितकीच काळजी दिवाळीच्या काळात किंवा नंतरही घेतली पाहिजे. निरोगी आणि तंदुरुस्त जीवनशैली हाच खरा सण आहे जो आपण दररोज साजरा करू शकतो. ■

## अशोकायन

### बळीचे चक्रव्युह

कशाची दिवाळी
अन कश्याचं काय?
बळीच्या पदरी
निराशाच हाय!

सोयाबीननं
दिला झटका
बाजार भावानंबी
दिला फटका ..!

हमी भाव
हाय कागदोपत्री
बळीची मात्र
होतेय फजिती ..!

तोंड मिळवणी करता
बळीचं निघालं दिवाळं
तरी शासन मात्र
हाय भौ नामानिराळं ..!



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# हिशोब जुळेना अन गॅस मिळेना; मोफत तीन गॅसची योजना फसली

## महिलांची ६ लाख तर गॅसधारकांची संख्या ५ लाख ३८ हजार

■ **महासागर प्रतिनिधी,**

**बुलढाणा, दि. ७ :** दिवाळीत घरचा फराळ महाग, भाऊबीजही गेली कठीण. जिल्ह्यात नियमित गॅस धारकांची संख्या पाच लाख ३८ हजार ५२०इतकी आहे. तर लाडक्या बहिणींची जवळपास सहा लाख ४० हजार इतकी नोंदणी आहेत. त्यामुळे हिशोब काही जुळत नाही. यात महिला व पुरुष गॅसधारक किती याची माहितीच पटलावर नसल्यामुळे शासनाची मोफत तीनगॅस योजना फसली असून लाडक्या बहिणींना यंदाच्या दिवाळीचा फराळ विकतच्या महागड्या गॅसवरच करावा लागला. अजूनही हा मोफत गॅस प्रशासकीय स्तरावर पेटलाच नसल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यात ४ लाख ५१ हजार ८१६ कार्डधारक आहेत. या कार्डवर अवलंबून असलेल्या लाभार्थींचीसंख्या लाखांपेक्षा अधिकआहे. तर मुख्यमंत्री अन्नपूर्णायोजनेच्या लाभार्थींची संख्या दोनलाख एक हजार५०१ इतकी आहे.इंडेन, एचपी व भारत गॅसच्या



माध्यमातून जिल्ह्यातील गॅसजोडणी धारकांना गॅस उपलब्ध करण्यात येतो. मात्र अजूनही गॅसपतीच्या नावावर, वडीलांच्या नावावर, आईच्या नावावर की आजी आजोबाच्या नावावर आहे,हे फक्त त्या घरच्या सदस्यांना माहिती आहे. परंतु, महिलांच्या नावावर किती गॅस जोडण्या आहेत याची माहिती गॅस वितरकांकडे नाही.

त्यामुळे अजून तरी गॅस विकतच मिळत असल्याने लाडक्या बहिणींना दिवाळीचे रुपये टाकताना गॅसचे ४०० रुपयेजमा न झाल्याने लाडक्याबहिणींवर फराळ करण्याचेहीओझे वाढले होते.

### महिलांच्या नावावर गॅस करण्यास प्राधान्य

वितरकांनी सांगितले की,त्यांच्याकडे महिला व पुरुष यांच्यानावावर किती गॅस जोडण्याआहेत, याची माहिती नाही. मात्रलाडकी बहीण योजने नंतर गॅसमहिलांच्या नावावर करुनदेण्यासाठी लोक येत आहेत. आम्हीसरळ-सरळ कागदपत्रे मागूननावावर करुन देतो. परंतु, पैसेखात्यात जमा होतील याची खात्रीदेऊ शकत नाही.

**निर्मल , एच.पी. गॅस वितरक**

### बहिणींसाठी फक्त उज्वला योजनेचे गॅस सुरु

जिल्हा पुरवठा अधिकारीयांच्याकडे गॅस बाबतची अधिकृतमाहिती गॅस वितरकांकडून मिळालीतरच संग्रही असते. शक्यतो गॅसकंपनीकडेच हा व्यवहार असतो.परंतु, उज्वला गॅस ही योजनेचे गॅसवितरण सुरु आहे. पण, लाडक्याबहिणींना गॅस देण्याबाबत किंवात्यांना गॅसची रक्कम देण्याबाबतमाहिती पुरवठा विभागाकडे नाही.

**-जी. टी. टेकाळे , जिल्हा पुरवठाअधिकारी.**

### बैठका झाल्या पण,निष्पन्न काहीच नाही

या योजनेबाबत महिलाबालकल्याण व पुरवठा विभागासहइतर विभागाच्या बैठका झाल्या.परंतु, त्या बैठकीतून काहीच निष्पन्नझाले नाही. कारण गॅस मोफतदिल्यास त्याचे सरळ पैसे वितरकांनामिळतील की महिलांच्या खात्यातजमा होतील. त्या बाबतचा निधीजिल्हा स्तरावर उपलब्ध होईल कीसरळ शासनाकडून जमा होईलयाबाबत बैठकीतून काहीच निष्पन्न झाले नाही.

# पाणी पेटण्याचे संकेत; नियोजन करण्यासाठी शेतकरी संवाद बैठका

## पाटबंधारे विभागाने कार्यकाळ संपलेल्या संस्थांची घेतली होती बैठक

■ **महासागर प्रतिनिधी,**

**अकोला, दि. ७ :** अकोला काटेपूर्णा सिंचन प्रकल्पांतर्गत रब्बी हंगामात पिकांना पाणी सोडण्याबाबत पाटबंधारे विभागाने कार्यकाळ संपलेल्या पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यामुळे शेतकऱ्यांनी बैठकीवर आक्षेप घेतल्याने वादात सापडली असतानाच आता शेतकरी संवाद बैठकांना प्रारंभ झाला आहे. आम्हाला विश्वासात घेऊन पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात यावे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे असून, आता थेट जिल्हाधिकाऱ्यांकडेच धाव घेणार आहेत. त्यामुळे पाण्याच्या नियोजनाचा मुद्दा पेटण्याचे संकेत प्राप्त झाले आहेत. काटेपूर्णा सिंचन प्रकल्पांतर्गत कौलखेड, दहिगाव, रामगाव, मजलापूर, दापुरा, गोंदापूर, नावखेड, बहिरखेड, शहापूर आदी परिसरातील शेतकऱ्यांना पिकांसाठी काटेपूर्णा सिंचन प्रकल्पातून पाण्याचा पुरवठा होतो. गत आठवड्यात कार्यकाळ संपुष्टात असलेल्या काही पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाच्या अभियंत्यांनी बैठक घेतली. मात्र प्रत्यक्ष आम्हीच त्या बैठकीत नव्हतो; आमच्याशी चर्चाच झाली नाही, असे लाभधारक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

त्यामुळे आता शेतकरी संवाद बैठकीचे आयोजन काटेपूर्णा सिंचन प्रकल्प बचाव समितीकडून करण्यात येत आहे. बुधवारी दहिगाव (गावंडे) येथे झालेल्या बैठकीला ॲड. संतोष गावंडे, मनोहरराव ठोकळ, मनोज गावंडे, विनायकराव गावंडे, भास्करराव गावंडे, विलास गावंडे आदी होते. असा आहे साठा : बैठकांमध्ये या मुद्द्यांवर चर्चा : पाण्यासाठी होत असलेल्या शेतकरी संवाद बैठकीत काही प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करून मागण्यांसाठी आग्रह धरण्यात येत आहे. पाणी वापर संस्थांचा कार्यकाळ ११ वर्षांपासून संपलेला आहे. त्यामुळे नव्याने नियुक्ती होण्यासाठी प्रक्रिया राबवण्यात यावी. मुळात काटेपूर्णा हा सिंचन प्रकल्प असून, यावरील बिगर सिंचनाचे आरक्षण दिवसेंदिवस वाढतच आहहे. त्यामुळे हे आरक्षण कमी करण्यात यावे.

काटेपूर्णा सिंचन प्रकल्प अबाधित राहावा, यासाठी प्रभावी उपाय योजना करण्यात याव्यात. यंदा खरीप हंगामातील पिकांचे उत्पादन प्रचंड घटले आहे. परिणामी रब्बी हंगामातील पिकांवरच अवलंबून रहावे लागणार असून, उन्हाळ्यात किमान चार आर्वतनांची गरज भासणार आहे. त्यामुळे नोव्हेंबर नंतरच पाणी हवे आहे. पाटबंधारे विभागाने आधी व नंतर नोव्हेंबर रोजी पाणी सोडण्याचे नियोजन



केल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे, शेतकऱ्यांना केव्हा पाणी हवे, हे निश्चित करण्यासाठी प्रत्यक्ष लाभधारक शेतकऱ्यांशी चर्चा करून नियोजन करण्यात यावे. रब्बी हंगामात काटेपूर्णा सिंचन प्रकल्पाअतंर्गत पाणी सोडण्याचे नियोजन आम्हाला विश्वासात घेऊन व्हावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यासाठी शेतकरी संवाद बैठकही पार पडत आहेत. मुळात काटेपूर्णा प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. मात्र शेतीसाठी पाणी देण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. सन २०१८-१४-मध्ये सिंचनासाठी ३५.२४. तर बिगर सिंचनासाठी ३४.४१. द.ल.घ.मी. पाण्याचे नियोजन करण्यात आले होते. आता यंदाही गत आठवड्यात महानगरातील पाण्यासाठी २४ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SMRITY SNEHA.** NOW MY NEW NAME IS **RATNIKA PRADEEPKUMAR SRIVASTAVA.**
**ADD :** PLOT NO 46 JAI DURGA LAYOUT SOMALWADA, NAGPUR 440015

MY OLD NAME WAS **MALEKABAI SHAMSUDDIN BOHRA.** NOW MY NEW NAME IS **MALIKA SHAMSHUDDHIN BERARWALA.**
**ADD :** H.NO 4689 NEAR BOHARA MASZID BINAKI MANGALWARI NAGPUR 440017

**प्रपत्र क-१**

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

उमेदवाराचे नाव व पत्ता:- **विनय पुरूषोत्तम भांगे, प्लॉट क्रमांक २५/आर, महानंदा भांगे विहार, त्रिमूर्ती नगर, राणाप्रताप नगर, नागपूर, महाराष्ट्र – ४४००२२**

राजकीय पक्षाचे नाव :- **वंचित बहुजन आघाडी**

निवडणुकीचे नाव: **महाराष्ट्र विधान सभा - सार्वत्रिक निवडणूक २०२४**

मतदारसंघाचे नाव :- **52- नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघ**

मी, **विनय पुरूषोत्तम भांगे** (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणूकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे :-

| अ. क्र. | (अ) प्रलंबित प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | **न्यायालयाचे नाव** | **प्रकरण क्रमांक व दिनांक** | **प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे ) आणि अपराधाचे अपराधांचे थोडक्यात वर्णन** |
| १ | **२७, दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ विभाग आणि न्यायिक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, नागपूर** | **पोलीस स्टेशन प्रताप नगर, नागपूर** १) एफआयआर क्र. ३७/ २०१६ दिनांक १२/८/२०१६ **(APL) No. ३१३५/ २०१६** | **१) ३५३, ३२३, ५०४, ५०६ भांदवि** थोडक्यात वर्णन - कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यावर आक्रमक झाल्याबाबत २१, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग आणि न्यायिक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, नागपूर येथे हजर होण्याचे आदेश |
| २ | **२१, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग आणि न्यायिक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, नागपूर** | **पोलीस स्टेशन प्रताप नगर, नागपूर** २) एफआयआर क्र. ५१/२०१९ दिनांक २३/२/२०१९ **(APL) No. १५८६/२०२१** | **२) ३४१, ४४७, ५०६, ३४ भांदवि** थोडक्यात वर्णन - कुणाला जबरदस्ती रोखून ठेवल्यामुळे / ट्रेसपासिंग २१, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग आणि न्यायिक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, नागपूर येथे हजर होण्याचे आदेश |
| ३ | **२१, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग आणि न्यायिक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, नागपूर** | **पोलीस स्टेशन प्रताप नगर, नागपूर** ३) एफआयआर क्र. ३४९/२०१८ दिनांक ६/१२/२०१८ **(APL) No. ९१०/२०१९** | **३) ३-२५ शस्त्र अधिनियम आर. डब्ल्यू. १३५\|१००(२)\|१७७ मुंबई पोलीस कायदा** थोडक्यात वर्णन - वाहनामध्ये शस्त्रे सापडल्याबद्दल २१, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग आणि न्यायिक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, नागपूर येथे हजर होण्याचे आदेश |
| ४ | **६, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग आणि न्यायिक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, नागपूर** | **पोलीस स्टेशन बजाज नगर, नागपूर** ४) एफआयआर क्र. २१५/२०१८ दिनांक ६/११/२०१८ **(APL) No. ९७/२०२०** | **४) ३५४ए(१)डी(२)३४१, ३२३, ५०४,५०६(ब) भादंवि आर. डब्ल्यू. ६६सी, ६७ माहिती तंत्रज्ञान कायदा** थोडक्यात वर्णन - पाठलाग व छळ करण्याबाबत ६, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग आणि न्यायिक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, नागपूर येथे हजर होण्याचे आदेश |
| ५ | **१६१, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, एमव्ही न्यायालय, नागपूर** | **पोलीस स्टेशन हुडकेश्वर, नागपूर** ५) एफआयआर क्र. ८४२/२०२३ दिनांक **(APL) No. २७५/२०२४** | **५) एस २९४, ४५२, ५०६(२) भादंवि** थोडक्यात वर्णन - विकृत भाषा वापरण्याबाबत आणि ट्रेसपासिंग १६१, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, एमव्ही न्यायालय, नागपूर येथे हजर होण्याचे आदेश |

| (ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिध्द ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ. क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | ( मुळ अर्जात काहीही नमूद नाही) |
| | **लागू नाही** | **लागू नाही** | **लागू नाही** |
| | **लागू नाही** | **लागू नाही** | **लागू नाही** |

**विनय पुरूषोत्तम भांगे**
**वंचित बहुजन आघाडी**
**५२- नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघ**

## परिशिष्ट- 43
## (प्रकरण 3, परिच्छेद 3.8)
## नमूना सी-1
## फौजदारी गुन्ह्यासंदर्भातील घोषणापत्र

**(मा. सर्वोच्च न्यायालयाने विनंती याचिका (दिवाणी) क्र.536/2011 पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन व इतर वि. युनियन ऑफ इंडिया व इतर या प्रकरणी दि. 25.09.2018 या न्यायनिर्णयानुसार)**

| | | |
|---|---|---|
| **उमेदवाराचे नाव व पत्ता** | - | **दुनेश्वर सुर्यभान पेठे, वय 55 वर्षे प्लॉट नं. 25, हीवरी ले आउट, नागपूर** |
| **राजकीय पक्षाचे नाव** | - | **नेशनलिस्ट कांग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)** |
| **निवडणुकीचे नाव** | - | **महाराष्ट्र विधानसभा 2024** |
| **मतदारसंघाचे नाव** | - | **54 पूर्व नागपूर** |

**मी दुनेश्वर सुर्यभान पेठे, उपरोक्त निवडणुकीचा उमेदवार जनतेच्या माहितीकरिता खालीलप्रमाणे माझेविरुद्ध असलेल्या फौजदारी प्रकरणासंदर्भात माहिती जाहीर करतो.**

| अनु. क्र. | प्रलंबीत फौजदारी प्रकरणे | | | सिद्धदोषी ठरविण्यात आलेल्या फौजदारी प्रकरणाचे विवरण | |
|---|---|---|---|---|---|
| | न्यायालया चे नाव | खटला क. खटल्याची स्थिती व | अंतर्गत असलेल्या संबंधीत अधिनियमांच्या संहितेची कलमे | न्यायालया चे नाव | ज्याकरिता सिद्धदोषी ठरविण्यात आलेल्या अपराधे संक्षिप्त विवरण |
| 1 | जे.एम. एफ.सी.-3 | 777/2023 (कोर्ट पेन्डिंग) | 147, 148, 143 भा.द.वि. | निरंक | निरंक |
| 2 | निरंक | 333/2024 (तपासावर) | 126/2, 132, 190, 191/2, 192, 221, 223 (ए), बी.एन.एस. | निरंक | निरंक |

**उमेदवाराची सही**

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

| | | |
|---|---|---|
| **Name and address of candidate** | : | **SAMEER DATTATRAY MEGHE 135, Pande Layout, Khamla, Nagpur.** |
| **Name of political party** | : | **Bharatiya Janata Party** |
| **Name of Election** | : | **Maharashtra Legislative Assembly-2024** |
| **Name of Constituency** | : | **50 Hingna** |

**I SAMEER DATTATRAY MEGHE,** a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal cases**

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Civil Judge Jr. DN J.M.F.C Court no. 1 Hingna Distt. Nagpur | SCC 1076/2021, 09.10.2021 | Recording statement. | IPC 188,270, 135 of MPA. For Conducting Rally |
| 2. | Civil Judge Jr. DN J.M.F.C Court no. 1 Hingna Distt. Nagpur | SCC 1185/2020, 15.09.2022 | Awaiting Summons | IPC 188,270, 135 of MPA, for Conducting Rally |
| 3. | 17-19th Jt C.J.J.D and J.M.F.C Nagpur | SCC 19644/2021, 20.11.2021 | Awaiting Summons | 188,269, 270 IPC RW 51B Disaster Management Act RW 3, 4 EDA, 135 of MPA, for conducting Rally |
| 4. | 3 Jt C.J.J.D and J.M.F.C Nagpur | SCC 40/2020, 10.01.2020 | Appearance | 135 of MPA, for Conducting Rally |
| 5. | 23-11 Jt C.J.J.D and J.M.F.C Nagpur | SCC 15418/2022, 01.08.2022 | Awaiting Summons | 188,269, 270 IPC RW 51B Disaster Management Act RW 3, EDA, 135 of MPA, For Conducting Rally |
| 6. | 13-9 C.J.J.D and J.M.F.C Nagpur | SCC 11110/2023, 21.07.2023 | Discussion | IPC 188, 269, 270, Section 135, 37(1)(3)of MPA, for Conducting Rally |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sr. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

Name & Signature of Candidate
**(SAMEER DATTATRAY MEGHE)**

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# अस्मिता

## रुचकर पालक कबाब

रसगंधा

वेगवेगळ्या प्रकारचे कबाब करता येतात. आज आपण पालक कबाब कसे करायचे ते पाहू.

साहित्य: पालकाची जुडी, चार मोठे बटाटे, पुदिना, कोथिंबीर, हिरव्या मिरच्या, एक वाटी भिजवलेली मुग डाळ, आलं-लसूण पेस्ट, धणे-जिरे पावडर, गरम मसाला, चवीपुरतं मीठ-साखर, सजावटीसाठी काजू इत्यादी.

कृती: सर्वप्रथम बटाटे उकडून किसून घ्या. पालकाची पेस्ट करुन घ्या. पुदिना, मिरच्या आणि कोथिंबीरदेखील मिक्सरमध्ये वाटून घ्या. भिजवलेली डाळ मिक्सरमध्ये बारीक करा. आता बारीक केलेलं हे सगळं साहित्य एकत्र करुन हलवून घ्या आणि त्यात मीठ, थोडी साखर, धणे-जिरे पावडर, गरम मसाला, आलं-लसूण पेस्ट, बटाटे मिसळा. मिश्रण एकजीव करुन त्याचे छोटे गोळे करा. आता त्याला कबाबचा आकार द्या. प्रत्येक कबाबवर एक काजू लावून थोड्या वेळासाठी फ्रीजमध्ये ठेवून द्या. सर्व्ह करण्यापूर्वी काही वेळ फ्रीजमधून काढा आणि गरम तेलात तळून घ्या.



## साजशृंगार नववधूचा...

काळजी घ्या

थंडीतील लग्नसोहळा हा परम आनंद देणारा सोहळा असतो. या आल्हाददायक वातावरणात साजरा होणारा हा समारंभ विशेष आकर्षक आणि सुखद ठरतो. पण या दिवसात नववधूला सौंदर्यासाधनेची विशेष काळजी घ्यावी लागते. थंडीचे त्वचेवर होणारे दुष्परिणाम दूर करण्यासाठी विशेष प्रयास घ्यावे लागतात. या दिवसात ओठ फुटू नयेत यासाठी ई जीवनसत्त्वयुक्त लिप बाम किंवा कोल्ड क्रीम लावायला हवं. ओठांवरची मृत त्वचा आठवड्यातून एकदा तरी दूर करावी. यासाठी दात घासण्याचा ब्रश गरम पाण्यात बुडवून ओठांवरून हळूवार फिरवा. त्यानंतर सनस्क्रीन असलेला लिप बाम लावा.

* लग्नाची तयारी करण्याच्या नादात जागरण होतं. यामुळे डोळ्यांवर प्रचंड ताण आल्याने डोळ्यांखाली काळी वर्तुळं यायला लागतात. डोळे सुजल्यासारखे वाटू लागतात. डोळ्यांचा खालचा भाग काळा पडू नये यासाठी केलेला मेकअप काढताना पाण्यात मिसळणाऱ्या मेकअप रिमूव्हरचा वापर करा. डोळ्यांच्या खालच्या भागात जीवनसत्त्वयुक्त क्रीम लावा. सूज घालवण्यासाठी डोळ्यांवर काकडी ठेवा.

* लग्नप्रसंगी घातले जाणारे फॅन्सी ब्लाऊज तसंच घागरा चोलीमुळे मान तसंच पाठीचा बराचसा भाग उघडा असतो. त्यामुळे पाठीचीही काळजी घ्यायला हवी. पाठ आणि मान काळी पडल्यास तुमच्या लूकचा विचका होऊ शकतो. मानेची त्वचा नाजूक आणि संवेदनशील असते. मान स्वच्छ करण्यासाठी एक दिवसाआड स्क्रबर लावा. दररोज मॉईश्चरायझर लावा. उन्हात बाहेर पडण्याआधी मानेला सनस्क्रीन लावायला विसरू नका.

* मृत त्वचा काढून टाकल्यानंतर त्वचा ताजीतवानी आणि टवटवीत दिसू लागते. त्यामुळे संपूर्ण अंगाला स्क्रबर लावा. बॉडी वॅक्सिंग करून घ्या आणि महिन्यातून एकदा स्पामध्ये जाऊन छान मसाज करून घ्या.

* पायांना नियमितपणे मॉईश्चरायझर लावा.

* लग्नाआधी एखादा दिवस पेडिक्युअर केल्याने पावलांचं सौंदर्य वाढत नाही. त्यामुळे सहा आठवडे आधीपासूनच पावलांची निगा राखायला सुरूवात करा.



पावलावरची मृत त्वचा काढून टाकण्यासाठी एखादा दगड घासा. आंघोळीच्या वेळी पावलं घासल्यास मृत त्वचा अगदी झटपट उतरू शकते. पावलांना मॉईश्चरायझर लावून, मोजे घालून झोपा.

* केस धुणं, ड्रायरनं वाळवणं, स्टायलिंगसाठी विविध उपकरणांचा वापर करणं यामुळे लग्नाच्या दिवशी तुमच्या केसांची अवस्था अत्यंत बिकट होऊ शकते. त्यामुळे केसांची आधीपासूनच काळजी घ्या. 'ब' जीवनसत्त्वयुक्त आहार घ्या. केसांच्या मुळांपाशी छान मसाज करा.

## पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी...

**कापणीनंतर राहिलेले रोपांचे खुंट काढून टाकण्यासाठी शेतात आगी लावणं हा एकमेव उपाय केला जातो. यामुळे पर्यावरणाचं बरंच नुकसान होत असल्याने हे प्रकार थांबवण्यासाठी सरकारने बरेच प्रयत्न केले. पण शेतकरी अजूनही शेतातला कचरा अशाचप्रकारे नष्ट करतात. उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर हे चित्र दिसतं. पर्यावरणाची ही हानी थांबवण्यासाठी एका महिलेने अनोखी संकल्पना लढवली.**

मानिनी

शेत म्हटलं की कचरा होणार. हा कचरा नष्ट करण्यासाठी शेतकरी चक्क आगी लावतात. रोपांचे खुंट, वाळलेलं गवत नष्ट करण्यासाठी पर्यावरणाची हानी करणारी ही कृती केली जाते. यामुळे आकाशात विषारी ढग तयार होतात. घातक वायू वातावरणात सोडले जातात. हे प्रकार थांबवण्यासाठी पर्यावरणवाद्यांसह सरकारही प्रयत्नशील आहे. पण त्यांच्या प्रयत्नांना म्हणावं तसं यश येत नाही. या कामी नवी दिल्लीतल्या तज्ज्ञांनी पुढाकार घेतला. गीता अरूणाचलम असं त्यांचं नाव. मशरूमची शेती पिकवून कचऱ्याची ही समस्या सोडवता येईल, असं त्यांचं म्हणणं होतं. हे अनोखं तंत्रज्ञान त्यांनी विकसित केलं. या कचऱ्याचा वापर करून मशरूमची शेती करता येईल, असं त्या सांगतात. सध्या जगभरात मशरूमना असलेली मागणी पाहता यातून शेतकऱ्यांना बरंच उत्पन्नही मिळू शकतं.

मशरूम हा अत्यंत महाग असा खाद्यघटक आहे. शेतातला कचरा जाळण्याऐवजी त्यापासून मशरूम पिकवण्यासाठी गीता यांनी काही पद्धती विकसित केल्या. गीता शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत होत्या.

'ऑयस्टर मशरूम' लोकांना फारसे माहीत नाहीत. पण त्यात भरपूर पोषणमूल्य असतं. हे मशरूम या उरलेल्या कचऱ्यावर अगदी सहज वाढतात. या प्रक्रियेद्वारे शेतातला कचरा नैसर्गिक पद्धतीने नष्ट होतो. 'बटण मशरूम' २५० रुपये किलो दराने मिळतात. तर ऑयस्टर मशरूमची किंमत साधारण ४०० ते ४५० रुपये किलोच्या घरात आहे. मशरूमच्या या प्रकाराबद्दल फारशी जागरूकता नसल्याने त्यांच्या किंमती प्रचंड असल्याचं अरूणाचलम सांगतात. ऑयस्टर मशरूम लागतातही खूप छान. त्यात भरपूर प्रथिनंही असतात.

गेल्या बारा वर्षांत त्यांनी अनेकांना मशरूमच्या शेतीचं प्रशिक्षण दिलं आहे. अगदी छोट्या जागेतही मशरूम उगवण्याचं तंत्र त्या शिकवतात. यामुळे अनेकांना रोजगारही उपलब्ध झाला आहे. गीता या निवृत्त मुख्याध्यापिका आहेत. २००७ मध्ये त्यांनी पर्यावरणासाठी काम करायला सुरूवात केली. 'टेस्ट फ्रॉम वेस्ट' हा प्रकल्प राबवला. त्यांच्या या प्रकल्पाला पर्यावरण मंत्रालयाची मान्यता मिळाली. छोट्या जागेत मशरूमची लागवड कशी करायची हे शिकवणारा हा छोटेखानी अभ्यासक्रम आहे.

१९८२ मध्ये भारतीय कृषी संशोधन संस्थानात काम करत असताना त्यांना मशरूम्सच्या गुणांबद्दल कळलं. पण आर्थिक आणि कौटुंबिक कारणांमुळे त्यांना पुढे अभ्यास करता आला नाही. पण निवृत्तीनंतर त्यांनी पुढाकार घेतला आणि मशरूमच्या शेतीचं प्रशिक्षण द्यायला सुरूवात केली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे पर्यावरणाचा बचाव होणार आहे.



## हेअर केअर

### केसांसाठी शुद्ध तूप

घनदाट, काळ्याभोर केसांसाठी शुद्ध तुपाचा वापर करा. कोंडा घालवण्यासाठी तूप गरम करून केसांच्या मुळांना लावा. तासाभराने कोमट पाण्याने केस धुवून टाका. केसांची चमक टिकवण्यासाठी तसंच मऊ होण्यासाठी तुपाने केसांना नियमित मसाज करा. महिन्यातून किमान तीन वेळा तुपाने नियमित मसाज केल्याने केस छान वाढतात. निस्तेज केसांनाही दररोज तुपाने मालिश केल्याने लाभ होतात.



## स्मार्ट टिप्स

### चमकवा तांब्याची भांडी

तांब्याच्या भांड्यात पाणी पिण्याचे खूप लाभ आहेत. तसंच इतर कारणांसाठीही ही भांडी वापरतात. पण ती लवकर काळी पडतात. तांब्याची भांडी लखलखीत करण्यासाठी चिंच वापरता येईल. भिजवलेल्या चिंचेच्या पाण्याने तांब्याची भांडी स्वच्छ होतात. लिंबाच्या फोडीनेही तांबं स्वच्छ होतं. मीठ आणि लिंबू यांचाही यासाठी वापर करता येईल. व्हाईट व्हिनेगर पाण्यात उकळून या पाण्याने तांब्याची भांडी धुतल्याने ती चमकू लागतात.



## हेल्दी लाईफ

### पाळीच्या समस्या सोडवणारी तुळस

तुळशीच्या औषधी गुणधर्मांबाबत आपण जाणतो. मासिक पाळीशी संबंधित समस्या तुळशीच्या नियमित सेवनाने दूर होऊ शकतात. यातल्या काही घटकांमुळे ताण कमी होतो. हार्मोन्सचं संतुलन राखलं जातं. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पाळी अनियमित असेल तर दहा ग्रॅम तुळशीच्या बिया पाण्यात उकळून ते पाणी पिण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. मात्र गरोदर महिला, मधुमेहींनी तुळशीचं सेवन करू नये. तसंच रक्त पातळ होणारी औषधं घेत असाल तर तुळशीला लांब ठेवा.



## दुपट्टा फॉर एव्हरी ऑकेजन

स्टाईल स्टेटमेंट

लग्नात सर्वांचं लक्ष वेधून घेणारी व्यक्ती म्हणजे नवरी मुलगी. तिचा पेहराव, दिसणं चर्चेचा विषय ठरतं. आयुष्यातल्या या अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी नवरीलाही छान दिसायचं असतं. वेगळेपण जपायचं असतं. स्वागत सोहळ्यात बऱ्याच मुली लेहंगा चोली परिधान करतात. या पेहरावाची शोभा वाढवतो तो दुपट्टा. युनिक आणि ट्रेंडी दुपट्टा लक्षवेधी ठरतो. बाजारात विविध रंगांचे, प्रकारचे, डिझाइन्सचे दुपट्टे मिळतात. विशेष म्हणजे ते इतर समारंभांनाही कॅरी करता येतात. दुपट्ट्यांच्या विविध प्रकारांविषयी...

* बॉर्डरवर मिरर वर्क केलेले दुपट्टे सुंदर दिसतात. विशेष म्हणजे ही फॅशन कधीच जुनी होत नाही. त्यामुळे असे दुपट्टे वेगवेगळ्या पारंपरिक पेहरावावरही घेता येतात.

* घुंगरू लावलेले दुपट्टेही उठून दिसतात. सध्या अशा दुपट्टयांचा ट्रेंड नसला तरी लग्नातल्या एखाद्या सोहळ्यासाठी हा दुपट्टा घेता येईल.

* साधेपणा जपणाऱ्या तरुणी टस्सल वर्कवाला दुपट्टा घेऊ शकतात. मेहंदी, संगीत अशा सोहळ्यांसाठी हा दुपट्टा बेस्ट आहे.

* दुपट्टे असो किंवा ब्लाउज, छानशी लटकन त्यांची शोभा वाढवते. लग्नातल्या सोहळ्यांसाठी नाजूक साजूक गोटा लटकनवाले दुपट्टे घ्या.

* गोटा पत्तीचं डिझाइनही हिट आहे. लग्नासारख्या शुभ प्रसंगी असे दुपट्टे खूप छान दिसतात.

* 'स्कॅलप्ड बॉर्डर' दुपट्टयांची खूप चलती आहे. लग्नातल्या पेहरावांमध्ये अशा दुपट्टयांना वेगळंच स्थान आहे. यात दुपट्टयाच्या बॉर्डरला वेगळ्या डिझाइनची झालर किंवा लेस लावली जाते. या प्रकाराला 'स्कॅलप्ड बॉर्डर' म्हणतात.

* हेवी फ्लोरल बॉर्डरवाला दुपट्टा नववधूची शान वाढवतो.

* यासोबतच 'लेस वर्क', 'मल्टी शेड', 'फ्रिंज', 'टिनी बुट्टी', 'स्टोन वर्क', 'दुपट्टा विथ बेल्ट' हे प्रकारही इन आहेत.



## मूल दत्तक घे

समुपदेशन



अनेक उपाय करुन थकल्यानंतर आणि लग्नाला दहा वर्षं उलटल्यानंतरही दिवस राहिले नाहीत तेव्हा आम्ही टेस्ट ट्युब बेबीचा निर्णय घेतला. यासाठी भरपूर वेळ आणि खूप पैसा खर्च केला. अन्य उपाय फसल्यानंतर या उपायाने तरी आम्हाला अपत्यजन्माचं सुख मिळेल अशी आशा होती. पण तीदेखील फोल ठरली. भ्रूण जपण्यासाठी माझं शरीर सिद्ध नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झालं. यावेळी पहिले पाच महिने अगदी सामान्य होते. पण त्यानंतर अचानक वेदना जाणवू लागल्या आणि गर्भपात झाला. आता या दु:खातून मी सावरली आहे पण पती या धक्क्यातच आहे. तो नैराश्याने पीडित आहे. कामातंही त्याचं लक्ष लागत नाही. तो कोणाशी बोलत नाही. सतत माझ्या काळजीत व्यग्र असतो. त्याला कसं सावरावं हाच प्रश्न आहे.

– तुझं दु:ख खूप मोठं आहे.

गर्भपाताने स्त्री खचून जाते. तिची जगण्याची उमेद संपू शकते. पण या आघातातून सावरलीस याबद्दल तुझं अभिनंदन. आता तू पतीला आधार द्यायला हवा. त्यासाठी समुपदेशन हा एक पर्याय आहेच पण सर्वात चांगला पर्याय म्हणजे मूल दत्तक घेणं. तुझ्या पतीला मुलांची खूप आवड असल्याचं दिसतंय. त्यामुळे त्याची ही भावनिक गरज भागायला हवी. सध्या मूल दत्तक घेताना बऱ्याच कायदेशीर अटींची पूर्तता करावी लागते. या प्रकियेत बराच वेळही जातो. आधीच तुमच्या संसाराला दहा वर्षं पूर्ण झाली आहेत. त्यामुळे आता वेळ दवडू नका. पैसा आणि शरीर या दोहोंची हानी करुन घेण्यापेक्षा एका जीवाचा सांभाळ करुन त्यांचं भविष्य सावरलं तर फार मोठं समाधान मिळेल आणि आवश्यक असणारा मानसिक आधारही मिळेल.

## मायक्रोकरंट फेशियलविषयी...

ब्युटी ट्रेंड्स



फॅशनप्रमाणेच सौंदर्याच्या क्षेत्रातही निरनिराळे ट्रेंड येतात. चेहऱ्याची काळजी घेणाऱ्या महिला नित्यनेमाने फेशियल करतात. फेशियलचे विविध प्रकार आहेत. त्यातच आता भर पडली आहे ती 'मायक्रोकरंट फेशियल'ची. 'मायक्रोकरंट फेशियल' हा सौंदर्य क्षेत्रातला सध्याचा हिट ट्रेंड आहे. यामुळे चेहरा उजळतो. सुरकुत्या आणि डाग कमी झाल्याने त्वचा नितळ आणि टवटवीत दिसू लागते.

फेशियलच्या या प्रकारामुळे चेहऱ्याच्या स्नायूंना उभारी मिळते. त्वचेचा पोत सुधारतो. इतर फेशियल्सच्या तुलनेत याचं वेगळेपण सांगायचं तर यात काही उपकरणं आणि केमिकलयुक्त प्रोडक्ट्सचा वापर होतो. असं असलं तरी ही वेदनारहित सौंदर्यसाधना आहे. त्यामुळे घाबरून जायचं काहीच कारण नाही.

'डर्मिटोलॉजिस्ट' म्हणजे त्वचा तज्ज्ञ ही सेवा पुरवतात. 'मायक्रोकरंट फेशियल' तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करणं योग्य ठरतं. या फेशियलची सुरूवात 'क्लिंजिंग' म्हणजे चेहऱ्याच्या स्वच्छतेने होते. यानंतर भिंग घेऊन डॉक्टर त्वचेची तपासणी करतात. मग वाफ घ्यावी लागते. वाफेमुळे त्वचा मुलायम होते आणि धूळ, घाणीमुळे बंद झालेली छिद्र उघडतात. उपकरणांच्या सहाय्याने मृत त्वचा काढल्यानंतर चेहऱ्याला मसाज केला जातो. यावेळी काही रसायनयुक्त क्रीम्स वापरली जातात. मग चेहऱ्यावर मास्क लावतात. तो वाळल्यावर काढून टाकतात. या प्रक्रियेचा शेवट चेहऱ्याला टोनर किंवा बर्फ लावून होतो.

यानंतर त्वचा उजळतेच शिवाय त्वचेचं शुद्धिकरण झाल्याने चेहऱ्याला होणाऱ्या रक्तप्रवाहात सुधारणा होते. कोणतंही फेशियल वयाच्या पंचविसाव्या वर्षानंतर करावं. 'मायक्रोकरंट'लाही हाच नियम लागू होतो. तसंच गरोदरपणात ही प्रक्रिया करू नये. या प्रक्रियेनंतर काही काळपर्यंत चेहऱ्याला 'एक्सफोलिएट' म्हणजे मृत त्वचा काढण्याची प्रक्रिया करू नये. तसंच मेक अपही टाळावा.

## समाजसेवेकडे वळा

स्कील डेव्हलपमेंट

विविध कारणांमुळे करीअरमधून ब्रेक घेतलेल्या बऱ्याच महिलांना स्वत:चं अस्तित्त्व जपायचं असतं. काहीतरी करून दाखवायची जिद्द असते. मात्र नेमकं काय करायचं हे न कळल्यामुळे त्यांना कुढत राहावं लागतं. अशा परिस्थितीत तुम्ही समाजसेवेचा मार्ग स्वीकारू शकता. लोकांना मदत करण्याची इच्छा आणि आवड असेल तर समाज सेवा करता येईल. याचेही अनेक पर्याय आहेत. त्याविषयी...

* समुपदेशनाच्या माध्यमातून तुम्ही लोकांच्या समस्या सोडवू शकता. 'मेंटॉर' म्हणजे मार्गदर्शकाची भूमिका बजावू शकता. 'शीरोज', 'जॉब्स फॉर हर डॉट कॉम' अशी व्यासपीठं करीअरमध्ये ब्रेक घेणाऱ्या महिलांना मार्गदर्शन करतात. तुमच्यातही ही कौशल्यं असतील तर त्याचा वापर करा. या साईट्सवर मार्गदर्शकाची भूमिका बजावता येईल.

* विविध कंपन्या सामाजिक उपक्रम राबवतात. सामाजिक प्रश्नावर जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. अशा कामांसाठी त्यांना स्वयंसेवकांची गरज असते. एखाद्या संस्थेच्या माध्यमातून अशी कामं करू शकता. अशा मोहिमा वीकेंडला असतात. यासाठी आरामात वेळ काढता येईल.



* शिकवायची आवड असेल तर वंचित घटकातल्या मुलांना शिकवण्याचं काम हाती घेता येईल. हे काम बऱ्याच संस्था करतात. त्यांच्यासोबतीने तुम्हीही या मुलांच्या प्रगतीला हातभार लावू शकता.

* समाजसेवेसाठी दिवसातले काही तास देणं शक्य नसेल तर अंध व अपंगांसाठी लेखनिक म्हणून काम करता येईल.


* आपल्या समाजाशी संबंधित उपक्रमांमध्ये सहभागी होता येईल. समाजाने सुरू केलेल्या चांगल्या कामाला हातभार लावा. काही तास वाचनालयाला देता येतील.

## उजळ त्वचेसाठी...

स्किन स्टोरी

वर्ण उजळावा या हेतूने अनेक प्रसाधने वापरली जात असली तरी काहींचे परिणाम निराशाजनक असतात हे आपण जाणतो. प्रसाधने आश्वासनांची परिपूर्ती करणारी नसल्याने पैसे वाया जातातच आणि मनस्तापही सोसावा लागतो. खरं तर प्रत्येकाचा वर्ण त्वचेतील विशिष्ट घटकांच्या आधारे बनत असतो. तो बदलवणं शक्य नाही. आहाराचं पथ्य पाळल्यासच या नैसर्गिक घटकांमध्ये बदल घडून त्वचेचा वर्ण उजळू शकतो. अगदी माफक प्रमाणात का होईना, सावळी त्वचा गौरवर्णी दिसू शकते. म्हणूनच वर्ण उजळवून देण्याचं आश्वासन देणाऱ्या प्रसाधनांच्या मागे न लागता वर्ण उजळवणाऱ्या काही घटकांचा समावेश आहारात करायला हवा.

पपई : या कामी पपईचं सेवन महत्त्वाची भूमिका बजावतं. पपईतील व्हिटॅमिन ए, ई, कॅल्शियम आणि अँटिऑक्सिडंट तत्त्वांमुळे आरोग्य सुधारतंच त्याचबरोबर त्वचेवरील डाग दूर होण्यासही मदत होते. यामुळे वर्णही उजळतो.



* ब्रोकोली : ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमिन सी आणि ई विपूल प्रमाणात असतं. याचा लाभ मिळाल्यानं त्वचेचा रंग उजळतो.

* गाजर : गाजरामधील व्हिटॅमिन ए, बी, सी आणि पॅक्टिन फायबरमुळे त्वचा आणि केसांचं आरोग्य सुधारतं. सुंदर त्वचा मिळवण्यासाठी दररोज गाजराचा ज्यूस घेणं हा उत्तम उपाय ठरतो.

* सोयाबीन : सोयाबीनपासून बनलेल्या प्रत्येक पदार्थामध्ये व्हिटॅमिन सी आणि जस्त यांची सर्वोत्तम मात्रा असते. हे घटक त्वचेवरील पुरळ, मुरुमं आणि रक्तदोष नाहिसा करतात. त्वचा चमकदार दिसण्यासाठी सोयाबीनचा वापर वाढवावा.

* किवी : दररोज किवीचं एक फळ खाल्ल्याने त्वचेचा वर्ण बदलायला लागतो. त्वचेवरील डाग, मुरमांच्या खुणा अथवा व्रण घालवण्यासाठी चेहऱ्यावर किवीचा गर चोळून लावल्याने फायदा होतो. यातील व्हिटॅमिन ए, बी १२, लोह आणि फायबरचीही करामत असते.

* बीट : बीटामध्ये उपयुक्त व्हिटॅमिन्सबरोबरीने सोडियम, पोटॅशियम, फॉस्फरस, क्लोरिन आणि आयोडिन यासारखे महत्त्वपूर्ण घटक असतात. म्हणूनच या कंदमुळाच्या सेवनाने त्वचेची छिद्रं खुली होतात, रक्तप्रवाह सुरळीत होतो आणि रंग उजळण्यास मदत होते. बीट रस घेणं आणि बीटचा फेसपॅक लावणं फायदेशीर ठरतं.




# अखेर काँग्रेसनेही घेतला कठोर निर्णय

# मुळक यांच्यासह सहा बंडखोर निलंबीत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

महाविकास आघाडीतील नेत्यांनी मनधरणी करण्याचा प्रयत्न केल्यानंतरही रामटेक, कसबा, शिवाजीनगर आणि पर्वती विधानसभा मतदारसंघात बंडखोरी करणाऱ्या काँग्रेसच्या उमेदवारांना काँग्रेसकडून नोटीस बजाविण्यात आली होती.

बंडाची तलवार म्यान करून महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांना पाठिंबा जाहीर करावा. तसे न केल्यास निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला होता. त्यानंतरही अर्ज माघार न घेतलेल्या आणि बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांना ६ वर्षांसाठी निलंबित करण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी दिली.

यात रामटेक विधानसभा मतदारसंघातून माजी मंत्री राजेंद्र मुळक, काटोलमधून काँग्रेसचे दिवंगत नेते श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र याज्ञवल्क्य जिचकार, पर्वती विधानसभा मतदारसंघातून आबा बागुल, सांगली विधानसभेसाठी काँग्रेसने पृथ्वीराज पाटील यांना उमेदवारी दिल्यानंतर नाराज झालेल्या जयश्री पाटील आणि कसबा विधानसभा मतदारसंघातून कमल व्यवहारे यांना ६ वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे.





शिवसेना ठाकरे गटाने पहिल्याच यादीत रामटेके जागेवर विशाल बरबटे यांना उमेदवारी दिली. या जागेवर काँग्रेसचे राजेंद्र मुळक यांनी बंडखोरी केली आहे. ते राज्याचे माजी ऊर्जा व वित्त राज्यमंत्री आहेत. पृथ्वीराज चव्हाण यांचे अत्यंत विश्वासू म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्यावरही काँग्रेसने निलंबनाची कारवाई केली आहे.

दरम्यान, बंडखोरी करणाऱ्यांवर काँग्रेस कारवाई का करीत नाही? आम्हाला मागणी का करावी लागते? असा प्रश्न उबाठाचे भाष्कर जाधव यांनी आजच उपस्थित केला होता. त्यानंतर काही वेळातच मुळक आणि अन्य बंडखोरांवर कारवाई केली गेली.

# हफ्ते घेणारे नव्हे तर देणारे सरकार



## मुख्यमंत्री शिंदेंचा विरोधकांना टोला

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ७ :

लाडकी बहीण योजनेला मविआने तीव्र विरोध केला. आम्ही जे बोललो, ते करून दाखवले. या योजनेचे पाच हप्ते दिले. ह्यमविआह्म सरकारप्रमाणे हफ्ते घेणारे नव्हे, तर महायुतीचे हफ्ते देणारे सरकार आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना लक्ष्य केले.

बाळापूर मतदारसंघातील वाडेगाव येथे महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, खासदार अनुप धोत्रे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी महायुती सरकारने राबवलेल्या योजनांची माहिती देत विरोधकांवर निशाणा साधला.

ते म्हणाले, महायुतीचा विकासाचा अजेंडा आहे. एकदा दिलेला शब्द मागे घेत नाही. दोन वर्षांपूर्वी राज्यात उठाव करून सर्वसामान्यांच्या मनातील सरकार आणून दाखवले. जनतेने युतीला निवडून दिले, मात्र त्यांनी मतदारांशी बेईमानी केली. सत्ता सोडण्याची हिम्मत आम्ही दाखवली. बाळासाहेबांचे विचार मोडले-तोडले जात होते. ह्यउबाठाह्मने काँग्रेसकडे गहाण टाकलेला पक्ष सोडवला. आता हा पक्ष कार्यकर्त्यांचा आहे.

महायुतीचे सरकार येताच, विकासाची गाडी वेगाने धावायला लागली. १२४ सिंचन प्रकल्पाला मंजुरी दिली. मविआ सरकारच्या काळात केवळ चार प्रकल्पांना मंजुरी मिळाली होती. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये आम्ही ३५० कोटी रुपये देऊन एक लाख लोकांचे जीव वाचवले. संपूर्ण देशाचा विचार केल्यास एकट्या महाराष्ट्रात ५२ टक्के विदेशी गुंतवणूक आणल्याचे शिंदे यावेळी म्हणाले.

# घरात बसून कारभार करायची ठाकरेंची सवय सुटली नाही

## बावनकुळेंची टीका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :



बाळासाहेबांच्या डोळ्यासमोर महाराष्ट्राचं हित होतं पण उद्धव ठाकरेंच्या समोर फक्त कुटुंब आहे. त्यांची घरात बसून कारभार करायची सवय सुटली नाही, असा टोला भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी लगावला आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडूनही वचननामा जाहीर करण्यात आला. त्यांच्या याच जाहीरनाम्यावरून भाजपकडून टीका करण्यात आली आहे. बावनकुळे ट्विटमध्ये म्हणाले की, अडीच वर्षे घरात बसून फेसबुक लाईव्ह करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्रीत बसून उबाठा गटाचा वचननामा प्रकाशित केला. अडीच वर्षे फक्त माझं कुटुंब माझी जबाबदारी म्हणत स्वतःच्या कुटुंबापुरतं राजकारण केलं. आताही घरात बसून कारभार करायची सवय सुटली नाही.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आतापर्यंत प्रत्येक वचननामा शिवसेना भवनात प्रकाशित केला. कारण त्यांच्या डोळ्यासमोर महाराष्ट्राचं हित होतं. पण सच्चा शिवसैनिकांना वाऱ्यावर सोडल्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या डोळ्यासमोर फक्त आणि फक्त कुटुंबचं असल्याची टीकाही त्यांनी केली.

# राज्यात तीन भाऊ, मिळून महाराष्ट्र खाऊ

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ७ :

महाविकास आघाडी सरकारचे काम सुरळीत सुरू असताना गद्दारी करून हे चांगले सरकार पाडण्यात आले. महायुतीने अडीच वर्षे काहीच केले नाही. जनाधार कमी होत चालल्याचे पाहून निवडणुकीच्या तोंडावर यांचे बहिणींसाठी प्रेम उफाळून आले आहे. राज्यात देवाभाऊ, दाढीभाऊ आणि जॅकेटभाऊ हे तीन भाऊ आहेत. त्यांच्यात भाऊबंदकी आहे. पण, तरीही ते एकत्र फिरताहेत. आपण तिघे भाऊ, मिळून महाराष्ट्र खाऊ, असेच त्यांचे वर्तन आहे, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दर्यापूर येथे बोलताना केली.

(उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार गजानन लवटे यांच्या प्रचारार्थ गुरूवारी दुपारी आयोजित सभेत ते बोलत होते. सभेला काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे,



आमदार यशोमती ठाकूर उपस्थित होते. उद्धव ठाकरे म्हणाले, देवाभाऊ, दाढीभाऊ आणि जॅकेटभाऊंनी महिलांसाठी योजना जाहीर केली, पण महिलांच्या सुरक्षेचे काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रात बेरोजगारी वाढली आहे. सुशिक्षित तरूणांच्या हाताला काम नाही. महाराष्ट्रातील अनेक मोठे प्रकल्प गुजरातला पळविण्यात आले, आता येथील तरूणांना गुजरातमध्ये न्यायचे आहे का, असा सवाल केले. उद्धव ठाकरे यांनी बडनेरा आणि वलगाव येथेही महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभांना संबोधित केले.

# भरारी पथकाने केली २० लाख रोकड जप्त

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ७ :

निवडणुकीच्या काळात शहरातील प्रमुख रस्त्यावर नाकाबंदी करण्यात आली. निवडणूक विभागाचे पथक आणि पोलिसांनी विविध ठिकाणी संयुक्त कारवाई करून चारचाकी व दुचाकी वाहनांमधून २० लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# ... तर देश पेटून उठेल – पटोलेंचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७:



कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात येऊन जातिनिहाय जनगणना आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणार असल्याचे जाहीर करत थेट भाजपला मोठे आव्हान निर्माण केले आहे. त्यानंतर भाजपने राहुल गांधी यांना नक्षल समर्थक असल्याचा आरोप देखील केला आहे. यावर कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपवर टीका केली आहे. राहुल गांधींचे तोंड बंद करण्यासाठी खोट्या केसेस दाखल केल्या जात असल्याची टीका पटोले यांनी केली आहे.

पटोले म्हणाले, राहुल गांधींनी जी भूमिका मांडली त्यामुळे भाजप घाबरली आहे. ते सर्वसामान्य जनतेचा आवाज देशभर पोहोचवत असल्याने त्यांना अडवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्यांचे तोंड बंद करण्यासाठी खोट्या केसे दाखल केल्या जात आहेत, असा आरोप नाना पटोले यांनी केला आहे. राहुल गांधींच्या केसाला जरी धक्का लावला तर आम्ही सरकार पाडल्याशिवाय राहणार नाही, राहुल गांधींच्या आक्रमक भूमिकेला भाजप घाबरली असल्याचे पटोले म्हणाले.

राहुल गांधींच्या मागे सीबीआय चौकशी लाऊन त्यांना महाराष्ट्रात प्रचार करता येणार नाही असे प्रयत्न केले जात आहेत. मात्र राहुल गांधी घाबरणारे नेते नाहीत, त्यांच्या केसाला जरी धक्का लागला तर हा देश पेटून उठेल, आम्ही सत्ता उलथून टाकू, असा इशारा पटोले यांनी दिला.

# नणंद असली तरी...



■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. ७:

लोकसभेला माजी मंत्री एकनाथ खडसेंनी जाहीर पाठिंबा देऊन माझा प्रचार केला. मात्र, विधानसभेला शरद पवार गटाच्या उमेदवार, माज्या नणंदबाई रोहिणी खडसेंचा मी प्रचार करणार नाही, असे केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी स्पष्ट केले आहे.

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आलेल्या रक्षा यांनी सांगितले की, एकनाथ खडसे राष्ट्रवादीत गेले. त्यांनी काय करावे हा त्यांचा निर्णय आहे. त्यांच्या प्रचाराच्या परतफेडीची आवश्यकता नाही. लोकसभेला फेक नॅरेटिव्हमुळे विरोधकांना यश आले. विधानसभेत तो चालणार नाही, असा दावाही रक्षा खडसे यांनी केला.


**मोफत प्रवेश नर्सिंग कोर्स**

महाराष्ट्र शासन मुंबई द्वारा मान्यताप्राप्त व
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई द्वारा संलग्नित



**A.N.M.**
• कालावधी : 2 वर्ष
• माध्यम : मराठी व इंग्रजी
•पात्रता : 12 वी पास (कला, वाणिज्य व विज्ञान)

एससी,एसटी,ओबीसी,एसबीसी,व्हीजेएनटी प्रवर्गातील विद्यार्थीनीना मोफत प्रवेश

**G.N.M.**
• कालावधी : 3 वर्ष
• माध्यम : मराठी व इंग्रजी
•पात्रता : 12 वी पास (कला, वाणिज्य व विज्ञान)

अकोला शहराबाहेरील पात्र विद्यार्थीनींना स्वाधार योजने अंतर्गत दरवर्षी रु. ४५ हजार शासनातर्फे मिळतील.

**महात्मा फुले नर्सिंग कॉलेज**
सिद्धिविनायक हॉस्पिटलच्या बाजूला, नवीन बस स्टँडच्या मागे, अकोला.
फोन : 0724-2415544 मो. 9422155168 / 9372163910









# निकालानंतर सत्तेची समीकरणे बदलणार?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७:

प्रत्येक पक्षाचे किती आमदार निवडून येतात त्यावर पुढील गणित अवलंबून आहे. कदाचित निवडणुकीच्या निकालानंतर काही समीकरणे बदलू शकतात, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे नेते दिलीप वळसे पाटील यांनी केले आहे.

दिलीप वळसे पाटील म्हणाले की, पुढे काही होईल याबाबत आताच सांगता येणार नाही. एकीकडे महाविकास आघाडी तर दुसरीकडे महायुती आहे. निकालानंतर बहुमत होत नसेल, तर सरकार स्थापनेसाठी काही ना काही करावे लागेल, असे ते म्हणाले.


महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई
(महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालयाच्या अंतर्गत)

**डॉक्टर होण्याची सुवर्णसंधी**

महाराष्ट्र शासनमान्य पॅरामेडिकल कोर्स सर्टिफिकेट व डिप्लोमा कोर्सेस

**योगा अ‍ॅन्ड नॅचरोपॅथी**

• पात्रता : १० वी उत्तीर्ण • कालावधी : १ वर्ष व २ वर्ष • माध्यम : इंग्रजी, मराठी, हिंदी

भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या जी.आर. नुसार नॅचरोपॅथीचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांना स्वतंत्र व्यवसाय करता येईल व आपल्या नावासमोर 'डॉक्टर' शब्दाचा उपयोग करता येईल.

1) Govt. of India G.R. No. 12011/3/80-ISM Dated 15-07-1981.
2) Govt. of India G.R. No. 14015/25/96-U & H (R) (Pt) Dated 25-11-2003.
3) Govt. of Maharashtra G.R. No. NCR-1077/6006/PH-7 Dated 1-12-1977.
4) Maharashtra Medical Pract. Act, Chapter VI, Rull No. 2, Column III of 1962.
5) The Recognisation of New System of Medicines Bill, 2005 (Govt. of India)

• अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये •

'योगा ॲण्ड नॅचरोपॅथी' हा अभ्यासक्रम पुर्ण केलेले विद्यार्थी –

१. आपल्या नावाआधी 'डॉक्टर' शब्दाचा वापर करू शकतात तसेच स्वतंत्र व्यवसाय करु शकतात.
२. 'आहारतज्ञ' (डायटीशीयन) तसेच 'सौंदर्यतज्ञ' (ब्युटी थेरपीस्ट) म्हणून स्वतंत्र व्यवसाय सुरु करु शकतात.
३. स्वतंत्रपणे योग व निसर्गोपचाराचे वर्ग सुरु करु शकतात, 'फिटनेस सेंटर' सुरु करु शकतात.
४. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात 'योग शिक्षणाचा' समावेश केला आहे. त्यामुळे विविध शाळा व महाविद्यालयात 'योग शिक्षक' म्हणून नोकरी मिळू शकते.
५. विविध खाजगी व शासकीय संस्थात 'योग तज्ञ' म्हणून नियुक्ती होऊ शकते.

•अभ्यासक्रमाची फी•
सर्टीफिकेट कोर्ससाठी : रू. १२,०००/ तर डिप्लोमा कोर्ससाठी : रू. २५,०००/-

**महात्मा फुले पॅरामेडिकल कॉलेज, अकोला**
सिद्धिविनायक हॉस्पिटलच्या बाजुला, नविन बस स्टँड मागे, अकोला
0724 - 2415544 / 9422155168 / 9372163910



महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई
(महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालयाच्या अंतर्गत)

डिप्लोमा कोर्स इन फिजीओथेरपी
डिप्लोमा कोर्स इन डायटीशियन अँड न्युट्रीशन सायन्स
डिप्लोमा कोर्स इन मेडीकल लॅब टेक्निशियन
डिप्लोमा कोर्स इन डायलीसीस टेक्निशियन
डिप्लोमा कोर्स इन पंचकर्म थेरपी
डिप्लोमा कोर्स इन नॅचरोपॅथी अँड योगीक सायन्स
कालावधी : २ वर्ष | पात्रता : १०वी पास | माध्यम : मराठी/इंग्रजी

योगा अँड नॅचरोथरेपी
ऑपरेशन थिएटर टेक्निशियन
रेडीओलॉजी टेक्निशियन
डायलीसीस टेक्निशियन
कालावधी : १ वर्ष | पात्रता : १० वी पास | माध्यम : मराठी/इंग्रजी

आय.सी.यु. टेक्निशियन
कालावधी : ६ महिने | पात्रता : १० वी पास | माध्यम : मराठी/इंग्रजी

हेल्थ अँड सॅनिटेशन ऑफीसर
कालावधी : ६ महिने | पात्रता : कोणत्याही शाखेची पदवी | माध्यम : मराठी/इंग्रजी

**महात्मा फुले पॅरामेडिकल कॉलेज, अकोला**
सिद्धिविनायक हॉस्पिटलच्या बाजूला, नवीन बस स्टँडच्या मागे, अकोला.
फोन : 0724-2415544 मो. : 9422155168 / 9422163910 / 9372163910



हार्दिक शुभेच्छा !
प्रेरणास्थान



शिरीष धोत्रे
सभापती
स्व. वसंतरावजी धोत्रे
ज्ञानेश्वर महल्ले
उपसभापती



कार्यकारी मंडळ

अभिमन्यु शंकरराव वक्टे
मुकेश श्रीराम मुरुमकार
राजेश अवचितराव बेले
सचिन भाऊराव वाकोडे
विकास नानाराव पागृत
रामेश्वर विश्वनाथ वाघमारे
दिनकर मधुकरराव नागे
सौं. शालुताई गजानन चतरकर
दिनकर ओंकारराव वाघ
सौं. माधुरी शाम परनाटे
भरत प्रभाकरराव काळमेघ
चंद्रशेखर रामभाऊ खेडकर
संजय बाबुराव गावंडे
चंदु छोटु चौधरी
वैभव हरिभाऊ माहोरे
राजीव ज्योतीप्रकाश शर्मा
सुनिल सुधाकरराव मालोकार
सचिव

बाजार समितीचे आवारात शेतकरी बंधुंनी आपला शेतमाल विक्रीस आणुन सेवेची संधी द्यावी
आपला शेतमाल यार्डवर विक्रीस आणतांना खालील बाबींची काळजी घ्या.!
शेतमाल स्वच्छ व चाळणी करुन आणावा.
शेतमालाची विक्री झाल्याबरोबर ठरलेल्या दरानुसार, सौंदापट्टी मागणी अडत्याकडे करा.
शेतमालाचे तोलाचे वेळी आपण किंवा आपले प्रतिनिधीस हजर ठेवा.
महाराष्ट्रातील कमी अडत दर असलेली बाजार समिती.
शेतकऱ्यांचा विश्वास हाच बाजार समितीचा श्वास आणि याच ध्येयाकरिता कटीबद्ध असलेली विदर्भातील अग्रेसर बाजार समिती

लोकनेते वसंतराव धोत्रे मार्केट यार्ड
कृषि उत्पन्न बाजार समिती, अकोला
Email : am_akola@msamb.com, Tel.0724-2433478

महासागर
नागपूर वृत्तसागर
शुक्रवार, दि. ८, नोव्हेंबर २०२४

# जातगणनेतूनच देशाचे वास्तव चित्र समोर येईल : शरद पवार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

तीन वर्षांपासून आम्ही जातगणना व्हावी अशी मागणी करीत आहोत. जातगणना झालीच पाहिजे. त्यातून देशाचे वास्तव चित्रण समोर येईल. ते आल्यानंतर आरक्षणाची मयार्दा ओलांडण्यासंबंधीचा निर्णय होवू शकेल. पण, प्रत्यक्ष जनगणना झाल्यानंतरच चित्र स्पष्ट होईल, असे परखड मत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी नागपूर येथे माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



बुधवारपासून महाविकास आघाडीच्या प्रचाराची सुरूवात झाली. राहुल गांधी, उद्धव ठाकरे यांनी प्रचार सभा सुरू केल्या आहेत. गुरूवारपासून मीही प्रचार मोहीम सुरू केली आहे, असे ते म्हणाले. महाराष्ट्राच्या जनतेला बदल पाहिजे आहे. परिवर्तन हवे आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही कामाला लागले आहो, असे पवार यांनी सांगितले. सदाभाऊ खोत तसेच योगी आदित्यनाथ यांच्या विषयीच्या प्रश्नावर बोलणे टाळले.

बुधवारी नागपुरात झालेल्या संविधान सन्मान संमेलनात बोलताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही राज्यघटना अधिक बळकट करण्यासाठी आरक्षणाची ५० टक्के मयार्देची भिंत पडणारच आहे. जातवार जनगणना मंजूर होणारच, अशी घोषणा केली. आरएसएस, भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे रोखून दाखवावेच, असे आव्हानही त्यांनी दिले. जातीगणनेमुळे सर्व चित्र स्पष्ट होईल. या देशात आमची काय भूमिका आहे, हे दलित, आदीवासी व मागासवर्गीयांना समजून जाईल. जातगणना विकासाची पद्धत आहे. काहीही करा, जातगणना होणार आहे असे राहुल गांधींनी ठणकावून सांगितले होते.

९०% लोक केंद्र सरकार तसेच खासगी क्षेत्रात उच्चपदावर दिसत नाही अशी टीका त्यांनी केली. जातगणना करणे, आरक्षणाची ५० टक्क्यांची मयार्दा ओलांडणे हे दोन उद्दिष्ट साध्य करायचे आहे असे ते म्हणाले.

# डॉ. वैशाली व्यवहारे इएसआयसी रुग्णालयाच्या अधीक्षक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयाच्या नव्या वैद्यकीय अधीक्षक म्हणून डॉ. वैशाली मकरंद व्यवहारे यांनी नुकतीच सूत्रे स्वीकारली. डॉ. मीना देशमुख या सेवानिवृत्त झाल्या. औरंगाबाद मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस झाल्यानंतर डॉ. वैशाली व्यवहारे यांनी डिप्लोमा इन चाईल्ड हेल्थ' अभ्यासक्रम पूर्ण केला. २४ वर्षांपासून त्या राज्य कामगार विमा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी (गट अ) म्हणून कार्यरत होत्या.



रुग्णहिताच्या दृष्टीने आवश्यक सोयी उपलब्ध करून रुग्णसेवेला बळकटी देण्याचा प्रयत्न राहील, असे डॉ. व्यवहारे म्हणाल्या. मुळात आधीच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. मीना देशमुख यांच्या काळात अनेक कामे झाली. २८ वर्षांच्या शासकीय सेवेपैकी विमा रुग्णालयात ९वर्षे त्या वैद्यकीय अधीक्षक होत्या. नागपुरातील मेडिकलच्या माजी विद्यार्थिनी असून बालरोग तज्ञ आहेत. जळगाव, नाशिक, नागपूर येथेही त्यांनी सेवा केली.

कर्मचाऱ्यांची कमतरता, साधने, उपकरणे व प्रलंबित बिले, औषधांचा तुटवडा, सुपर स्पेशालिटी सेवांची अनुपलब्धता होती.

नागपूर रुग्णालयाचे कामकाज सुरळीत करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. अनेक उपकरणे खरेदी करून रुग्णालय प्रशासनात बरेच बदल केले.

ओपीडीची संख्या १ हजारपेक्षा जास्त झाली. राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रमांतर्गत विमेधारकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियाही सुरू केल्या. त्यांच्या अथक परिश्रमामुळे अनेक कॅन्सर रूग्णांना नियमितपणे वेळेत उपचार प्राप्त मिळत आहेत. सामाजिक संस्थांकडून अनेक पुरस्कार मिळाले असून प्रशासकीय कामगिरीबद्दल तात्कालीन आरोग्यमंत्र्यांकडून सत्कार केला गेला आहे.

डॉ. व्यवहारे पुढे म्हणाल्या, राज्य लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) नुकतीच परीक्षा होऊन मुलाखती झाल्या आहेत. त्यामुळे रुग्णालयातील रिक्तपदे लवकरच भरली जातील. याचा फायदा रुग्णसेवेत होईल. असे असले तरी अनेक आव्हाने आहेत. मुख्य म्हणजे रक्तपेढी सुरू करायची आहे. आणखी एक रुग्णवाहिका घ्यायची आहे.

## घरफोडी करून रोकड चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

मैत्रिणीकडे वाढदिवसाच्या कार्यक्रमाला जाणे एका महिलेले चांगलेच महागात पडले. अज्ञात आरोपीने घरफोडी करून रोख 1 लाखांची रोकड चोरून नेली. ही घटना अजनी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी पूजा संजय निघोट (26) रा. सुंदरबन लेआऊट, नरेंद्रनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गत मंगळवारी पूजा यांच्या मैत्रिणीचा वाढदिवस होता. रात्री 8.45 वाजताच्या सुमारास त्या घराला कुलूप लावून कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मैत्रिणीच्या घरी गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात पर्समध्ये ठेवलेले रोख 1 लाख रुपये चोरी करून पसार झाला.

कार्यक्रम आटोपून रात्री 2 वाजताच्या सुमारास पूजा घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## दिवाळीनंतर नागपूर येथील प्रदुषणात वाढ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

दिवाळीत देशातील अनेक शहरांमधील हवेतील प्रदूषण धोक्याच्या पातळीवर पोहचले असताना, नागपूर शहरातील प्रदूषण मात्र मध्यम या क्रमवारीत होते. दिवाळीनंतर मात्र हवेतील प्रदूषणाच्या पातळीत वाढ होऊन ते वाईट या क्रमवारीत पोहोचले. नागपूरसह पुणे आणि मुंबईतील अतिसुक्ष्म धुलीकणांच्या (पीएम २.५) पातळी ५० टक्क्याहून अधिक वाढ दिसून आली.

देशभरातील अनेक शहरांमध्ये दिवाळीच्या दिवशी हवेतील प्रदूषणाचा एक महत्त्वाचा घटक असणाऱ्या अतिसुक्ष्म धुलीकणांच्या पातळीत प्रचंड वाढ दिसून आली. यात विदभार्तील अकोला, अमरावती या शहरांचा देखील समावेश होता. त्याचवेळी तुलनेने सर्वाधिक फटाके फोडल्या गेलेल्या नागपूर शहरात मात्र अतिसुक्ष्म धुलीकणांच्या पातळीत ही वाढ दिसून आली नाही. नागपूर शहर त्यावेळी प्रदुषणाच्या मध्यम या क्रमवारीत होते. दरम्यान, दिवाळीनंतर मात्र हेच हवेतील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या अभ्यासकांनीही आश्चर्य व्यक्त केले. नागपूर शहर हे देशाच्या हृदयस्थानी आहे आणि या शहरात अतिसुक्ष्म धुलीकणांच्या पातळीत ८० टक्क्यांहून अधिक वाढ दिसून आली. यात महाल आणि रामनगर या दोन केंद्रावर सर्वाधिक प्रदूषण आढळले. शहरातील अतिसुक्ष्म धुलीकणांची(पीएम २.५) पातळी दिवाळीनंतर ५३.५ टक्क्यांनी वाढली. तर सुक्ष्म धुलीकणांचे(पीएम १०) प्रमाण ४३.१ टक्क्यांनी वाढले. शहरातील महाल परिसरात अतिसुक्ष्म धुलीकणांच्या पातळीत दिवाळीपूर्वीपासूनच ८०.९ टक्क्यांनी लक्षणीय वाढ झाली आहे. तर सुक्ष्म धुलीकणांच्या पातळीत ७९.६ टक्क्यांनी वाढली आहे. रामनगर आणि अंबाझरी हा परिसर हवेतील प्रदूषणाबाबत गंभीरपणे प्रभावित झाले. मुंबईत ३० ऑक्टोबर ते एक नोव्हेंबर या कालावधीत पीएम २.५च्या पातळीमध्ये ५०.३ टक्के वाढ झालेली आढळून आली. पुणे शहरात पीएम २.५ च्या पातळीत १९.७ टक्क्यांनी वाढ झाली. तर नागपूर शहरातही पीएम २.५ च्या पातळीत ५० टक्क्याहून अधिक वाढ झाली.

## गुटखा-तंबाखू जप्त

**नागपूर:** गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गोपनिय माहितीवरून जरीपटका ठाण्यांतर्गत एका दुकानात धाड टाकली. झडतीमध्ये सरकारकडून प्रतिबंधित तंबाखू आणि गुटखासह 70 हजार रुपयांचा माल जप्त केला. पोलिसांनी दुकान मालक कन्हैया रामचंद्र जानीआनी (60) विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. गुन्हे शाखेचे पथक जरीपटका ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. दरम्यान जनता रुग्णालयाजवळील जानी ट्रेडर्समधून किराणा सामानाच्या आड प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

# शहरी नक्षलवाद्यांना इशारा देण्यासाठीच लाल पुस्तकाचा वापर : देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी दोन दिवसापूर्वी राहुल गांधींवर केलेला आरोप खरा ठरला आहे. नागपुरात एकूणच भारताच्या संविधनाबद्दल राहुल गांधींची अनास्था पाहायला मिळाली. लाल पुस्तक घेवून त्यांना संविधानाचा गौरव करायचा नाही. तर त्यांच्यासोबत असलेले शहरी नक्षलवादी आणि अराजकतावादी यांना एक प्रकारे इशारा देण्यासाठी तसेच त्यांची मदत घेण्यासाठी हे नाटक केले आहे. पण त्यांच्या या नाटकाला आता आंबेडकरी जनताही भूलणार नाही.



राहुल गांधी संविधानाचा रोज अपमान करीत आहे. त्यांनी आंबेडकर व संविधानाचा अपमान केला. त्यांच्या अवती भोवती अराजकता पसरवणारे लोक असल्याचा मोठा दावाही फडणवीस यांनी केला आहे.

भारत जोडो हा समूह तयार करण्यात आला आहे. या समूहामध्ये अनेक संघटना अतिशय डाव्या विचारांच्या आहेत. त्यांच्या कामाची पद्धत, ध्येय धोरणे ही अराजक पसरवणारी यंत्रणा आहे. एकीकडे राहुल गांधी एक पुस्तक आपल्याला दाखवतात. संविधानाचा सन्मानच केला पाहिजे. पण लाल संविधानच का? लाल पुस्तक दाखवून कोणाला इशारा देताय? असा सवाल फडणवीसांनी बुधवारी केला होता. संविधानाचा अर्थ असतो ऑर्डर. तुम्ही अराजक पसरवत आहात, असे देवेंद्र फडणवीस बुधवारी म्हणाले होते.

संविधान आणि भारत जोडो याच्या नावाखाली अराजकता पसरवणाऱ्यांना एकत्र करून समाजात द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न होतोय. अर्बन नक्षलवादाचा हा प्रयत्न आहे. अर्बन नक्षलवादाचा हाच अर्थ आहे की लोकांची मने कलुषित करायची.

जेणेकरून देशातील संस्था, यंत्रणा यावरून त्यांचा विश्वास उडेल. यामुळे देशाच्या एकतेला आणि एकात्मकतेला धोका निर्माण होईल, अशी टीकाही फडणवीसांनी केली होती.

# एसटी कर्मचाऱ्यांना मिळणार लवकरच दिवाळी भेट



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना यंदा दिवाळी भेट आणि अग्रिम रक्कम मिळणार नसल्याचे लोकसत्ताने पुढे आणले होते. त्यावर एसटीचे वरिष्ठ अधिकारी आणि महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेची गुरूवारी (७ नोव्हेंबर) बैठक झाली. त्यात महामंडळाने निवडणूक आयोगाने मंजूरी दिल्यास दिवाळी भेट देण्याचे मान्य केले. त्यामुळे पून्हा कर्मचाऱ्यांमध्ये दिवाळी भेटची आशा पल्लवीत झाली आहे.

मुंबईत झालेल्या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख आणि इतरही काही अधिकारी उपस्थित होते. तर मान्यताप्राप्त संघटनेकडून राज्य अध्यक्ष संदीप शिंदे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

संघटनेकडून बैठकीत दिवाळी भेट व उचलबाबत आक्रमक भुमिका घेतली गेली. संघटना म्हणाली, दिवाळी भेटीची मागणी आचारसंहितेपुर्वीची असून त्याला बोर्डाच्या बैठकीतही आधीच मंजूरी मिळाली आहे. त्यामुळे या दिवाळी भेट आणि उचलचा आचारसंहितेशी जोडणे चुकीचे आहे.

दरम्यान महामंडळाकडून संघटनेला तांत्रिक अडचणी समजावून सांगण्यात आले. त्यानंतर संघटनेच्या मागणीवरून एसटी महामंडळाने निवडणूक आयोगाला साकडे घालत त्यांनी दिवाळी भेट देण्याला मंजूरी दिल्यास या निधीचे वाटप करण्याचे मान्य केले. त्यापूर्वी संघटनेकडून यंदाच्या दिवाळीत कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी झाल्याने अनेकांना कर्ज काढावे लागल्याचे सांगितले.

किमान आताही ही आर्थिक मदत मिळाल्यास कर्मचारी कर्जमुक्त होणे शक्य असल्याचेही संघटनेने सांगितले. त्यामुळे महामंडळाकडून लवकरच राज्य निवडणूक आयोगाकडे एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेटीबाबतचा प्रस्ताव पाठवला जाणार आहे. त्याला आयोगाची मंजूरी मिळाल्यास हा निधी कर्मचाऱ्यांच्या खात्यात वळता केला जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणात काय होणार? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. या विषयावर महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी भ्रमनध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट मिळायलाच हवी. हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे. या विषयावर महामंडळ प्रशासासोबत गुरूवारी बैठक झाली. त्यात अधिकाऱ्यांनी भेट देण्याचे मान्य करत त्यासाठी निवडणूक आयोगाला परवानगी मागणार असल्याचे सांगितले. एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट व अग्रिम रक्कम द्यावी अशी मागणी महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीमध्ये सहभागी विविध कामगार संघटना आणि भाजप नेते गोपीचंद पडळकर यांच्या सेवा शक्ती संघर्ष एस. टी. कर्मचारी संघ, महाराष्ट्र यांनी केली होती.







**नागपूर :** दक्षिण नागपूर मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार दिनेश पांडव यांनी आज प्रचाराचा नारळ फोडला. मंदिरात जाऊन देवीच विधीवत पूजा करीत त्यांनी प्रचाराचा श्रीगणेशा केला. नंतर मतदार संघातील बराचसा भाग त्यांनी पदयात्रेद्वारे पिंजून काढला. यावेळी काँग्रेस आणि आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. त्यांच्या प्रचार रॅलीत एका युवकाने स्वतःला तीन रंगात रंगवुन घेत मतदारांचे लक्ष वेधले.

# मनपाच्या व्होटेथॉन स्पर्धेच्या टी-शर्टचे अनावरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

विधानसभा निवडणुकीमध्ये नागपूर शहरातील नागरिकांनी जास्तीत जास्त मतदान करावे याकरिता जनजागृतीसाठी नागपूर महानगरपालिका द्वारे विविध अभियान राबविण्यात येत आहेत. नागपूर शहरात मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता भारत निवडणूक आयोगाचे मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग अर्थात स्वीप कार्यक्रम अंतर्गत शहरात येत्या शनिवार 9 नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता, धंतोली स्थित यशवंत स्टेडियम येथे व्होटेथॉन मतदार जनजागृती दौडचे आयोजन करण्यात येत आहे.




या व्होटेथॉन स्पर्धेच्या टी-शर्टचे अनावरण नागपूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक महामुनी व मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप चे नोडल अधिकारी श्री अजय चारठाणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

गुरुवारी (ता:7) सिव्हिल लाईन्स स्थित जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित छोटेखानी समारंभात जिल्हा परिषदेचे डॉ. कुणाल बोडके, जिल्हा माहिती अधिकारी श्री विनोद रापतवार, मनपाचे जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, यांच्या सह अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी प्रशासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या रिल मेकिंग स्पर्धा, टॉगलाईन/स्लोगन स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, लघूपट अर्थात शॉर्ट फिल्म स्पर्धेच्या पोस्टर्सचे अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमापूर्वी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक महामुनी व मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप चे नोडल अधिकारी श्री. अजय चारठाणकर यांनी युवा पिढीला भुरळ घालणाऱ्या इन्स्टाग्राम, रिल्स, फेसबुक पेज, रेडिओ जॉकी, असे सोशल मीडियावर प्रभुत्व असलेल्या इन्फ्लुएंसर यांची बैठक घेतली.

आजची युवा पिढी ही रिल्स व इतर सोशल मीडियावरील संदेशांना तात्काळ प्रतिसाद देते. यातील सामाजिक आशय आणि संदेशाचा भाग लक्षात घेतला तर एका अथार्ने इन्फ्लुएंसर हे मतदानासाठी नागरिकांच्या मनात मतदानाची भावना निर्माण करण्यास मदत करतील अशी अपेक्षा आहेत. आपल्या देशाच्या लोकशाहीला सक्षम करणाऱ्या मतदान जनजागृती मोहिमेत आपले उत्तरदायीत्व लक्षात घेवून सोशल मीडिया इन्फ्लुएंसर यांनी पुढे आले पाहिजे अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. तसेच आपल्या माध्यमातून येत्या 20 नोव्हेंबर रोजी अधिकाधिक नागरिकांनी घराबाहेर पडत मतदान करावे असे आवाहन करण्यात यावे असे त्यांनी सांगितले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशांनुसार स्वीप अंतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारा मतदार जनजागृती करिता शनिवार, 9 नोव्हेंबर 2024 सकाळी ६ वाजता, धंतोली स्थित यशवंत स्टेडियम येथे व्होटेथॉन मतदार जनजागृती दौडचे आयोजन करण्यात येत आहे. याठिकाणी झुम्बा, डान्स, रनींग, फन वॉक, फॅन्सी ड्रेस आदी विविध माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती केली जाणार आहे.

व्होटेथॉन मध्ये भाग घेण्यासाठी सर्वप्रथम लिंक वर किंवा दिलेल्या दफकोडवर जाऊन नोंदणी करायची आहे. वशेष म्हणजे, व्होटेथॉन साठी नोंदणी करणाऱ्या प्रथम 5000 नागरिकांना टी-शर्ट मोफत दिली जाणार आहे. आजवर स्पर्धेसाठी 2900 स्पर्धेकांची नोंदणी झाली असून, अधिकाधिक संख्येत स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# रमेशचंद्र बंग यांच्या प्रचाराचा गणेश गड मंदिरावरुन शुभारंभ



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ७ :

हिंगणा विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार रमेशचंद्र गोपीकिशन बंग यांच्या प्रचाराचा नारळ श्री गणेश गड मंदिर हिंगणा येथे फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

हिंगण्याचे ग्रामदैवत असलेले भोसले कालीन ऐतिहासिक श्री गणेश गड मंदिर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीच्या सर्व मित्र पक्षांचे अधिकृत उमेदवार रमेशचंद्र गोपीकिशन बंग यांच्या प्रचाराचा नारळ हिंगणा विधानसभा क्षेत्रातील महाविकास आघाडीच्या शेकडो प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत फोडून राम कृष्ण हरी वाजवा तुतारी चा गजर करण्यात आला.

यावेळी महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा आदींच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करून संघर्ष करून रमेशचंद्र बंग यांना निवडून आणायचे असा संकल्प केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष राजूभाऊ राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष योगेश सातपुते, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा उपप्रमुख रवींद्र जोडांगळे, तालुकाप्रमुख विष्णू कोल्हे, माजी जिल्हा परिषद सदस्य रश्मी कोटगुले, उपसभापती पौर्णिमा दीक्षित, विठ्ठलराव कोहाड, आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे नारायण बागडे, देवेंद्र बागडे,प्रशांत गोतमारे, हरिभाऊ रसाळ,प्रदीप कोटगुले, लीलाधर दाभे,सुधाकर धमंधे,समाधान माने, शफी शेटे, गुणवंता चामाटे, दादाराव इटणकर, मुकेश ढोमणे, रोशन खाडे फ्रफुल काकडे, नारायण डाखळे,प्रशांत सोमकुवर, शेषराव उईके, सुनील बोंदाडे, मोहम्मद शेटे, विलास वाघ, लोकमान छपेरे, नारायण ढवळे, मीनाक्षी ढोले राजेंद्र गोतमारे, रामराव मोहल्ले, श्याम बाबू गोमासे, सुखदेव मेश्राम संदीप नेहारे, प्रदीप फलके, मामा हुलके, दिनेश ढेंगरे, मेघा भगत, विशाखा लोणारे, युवराज पुंड, मीनाताई मेश्राम, उषा प्रधान, अजय जनबंधू, निकेश खंगार, रज्जुबाई सोनोने, दीपावली कोहाड, युवराज काकडे, रवींद्र आदमने, जितू लांडे, आदींसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लीलाधर दाभे यांनी तर आभार विलास वाघ यांनी मानले.

# डॉ. अभिषेक ढोबळे यांना सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

डॉ. अभिषेक सुरेश ढोबळे सध्या भारतीय तंत्रज्ञान (काशी हिंदू विद्यापीठ) वाराणसी येथे बायोकेमिकल अभियांत्रिकीचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना "सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार २०२४" मिळाला. डॉ. ढोबळे यांनी २००८ ला केमिकल इंजिनिअरिंगमध्ये एलआयटीमधून बी.टेक. पूर्ण केले. अमेरिकेच्या फ्लोरिडा विद्यापीठातून एम.एस.पूर्ण केले. त्यांचे संशोधन द्वारे समर्थित, चंद्र मोहिमेसाठी बायो-डायजेस्टर डिझाइन करणे समाविष्ट होते, ज्याने जागतिक माध्यमांचे लक्ष वेधले. त्यानंतर त्यांनी अमेरिकेच्या इलिनॉय विद्यापीठातून पीएच.डी. पूर्ण केले. २०१६ ते २०१९ पर्यंत, डॉ. ढोबळे यांनी प्रकल्पात योगदान देत पोस्टडॉक्टोरल संशोधन केले आणि यूएस आर्मी सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल हेल्थ रिसर्च सोबत सहयोग केला. त्यानंतर जानेवारी २०२१ मध्ये बायोकेमिकल इंजिनिअरिंगचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून मध्ये



सामील होण्यापूर्वी त्यांनी इक्ळर पिलानी येथे २०१९ ते २०२१ पर्यंत रासायनिक अभियांत्रिकीचे सहायक प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ. ढोबळे हे मूळचे महाल, नागपूरचे असून ते भाजपचे दिवंगत नेते बळवंतराव ढोबळे यांचे नातू आहेत.

नागपूरात समाजाच्या हितासाठी सक्रियपणे कार्यरत आहेत. डॉ. ढोबळे हे बायो-डायजेस्टर डिझाइन, जैवइंधन, मायक्रोबायोम डायनॅमिक्स, सायटोमेट्रिक फिंगरप्रिंटिंग आणि मशीन लर्निंगमधील तज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांचे संशोधन अन्न-पाणी-ऊर्जा-आरोग्य सेवा संबधीत शाश्वत बायोप्रोसेसिंग दृष्टिकोनावर केंद्रित आहे.

आपल्या अध्यापनात डॉ. ढोबळे यांनी विद्यार्थ्यांना एक मजबूत शैक्षणिक पाया प्रदान करण्यासाठी मूलभूत सिद्धांताला नवीनतम संशोधनाची जोड दिली आहे. तो शैक्षणिक संकल्पनांना वास्तविक-जगातील समस्या-निराकरणाशी जोडणारे डायनॅमिक क्लासरूम वातावरण वाढवतो. डॉ. ढोबळे यांच्याकडे सेंटर फॉर इनोव्हेशन इन टीचिंग अँड लर्निंग, यूएसए कडून प्रगत अध्यापन प्रमाणपत्रे आहेत.

त्यांच्या अध्यापनातील उत्कृष्टतेला बेन अँड जॉर्जन जोन्स एक्सलन्स इन टीचिंग अवॉर्ड आणि क्ळएर मूल्यमापनांवर आधारित ह्यशिक्षकांना त्यांच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट मानल्या गेलेल्या या आंशिक यादीमध्ये समाविष्ट करून मान्यता दिली आहे. गोबरधनसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान निविष्ठा या आंतर-मंत्रालयीन कार्यगटासह राष्ट्रीय समित्यांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग आहे.

डॉ. ढोबळे त्यांच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अनुभवातून विशेषतः उदाहरणार्थ, ते गौ विज्ञान अनुसंधन केंद्र, देवलापार येथील सुनील मानसिंघका यांच्यासोबत भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या सहकार्याने देशी गायी आणि उत्पादनांचे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी वैज्ञानिक आधार देण्यावर काम करत आहेत. ते छक्ळ विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे नामांकित सदस्य देखील आहेत आणि शैक्षणिक आणि शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी अध्यक्ष माधव लाभे यांच्यासोबत काम करत आहेत.

# विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती विषयक रॅली

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ७ :

स्थानिक शहरातील गजबजलेल्या वस्तीमधे महाविद्यालयातील सहभागी बी.ए. ,बी.कॉम.चे विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती विषयक रॅली काढून सामुहिक घोषणा देत मतदानाचे महत्व लोकमनावर बिंबविले.

लोकशाहीच्या सशक्तिकरणासाठी मतदानाचा हक्क प्रत्येक मतदात्यांनी बजावलाच पाहिजे यासाठी पथसंचलनातून कळकळीने आवाहन केले. पथसंचलनाचे यशस्वी आयोजन व दिशानिर्देशन एन एस एस विभागप्रमुख डॉ प्रविण लामखेडे यांनी केले. शहरातील पं.स. शिक्षण विभाग, शहर पोलिस तसेच न.पं. प्रशासन यांनी विशेषत्वाने



पथसंचलनात सहभाग घेऊन विशेष सहकार्य केले.

युवकांच्या ध्यासातून व कृतीतून कल्याणकारी भविष्याची निर्मिती होते त्यांचे प्रयास व्यर्थ कधीच जात नसतात असे समारोप प्रसंगी विचार व्यक्त करतांना प्राचार्य श्री मांडेकर म्हणाले. राष्ट्र गीतानंतर प्रस्तुत आयोजनाची सांगता करण्यात आली.

# जनप्रभा शैक्षणिक संकुल येथे विद्यार्थी दिवस साजरा



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ७ :

दिनांक ७ नोव्हेंबर २०२४ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहा विभाग महाराष्ट्र शासन स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,(बार्टी) पुणे व समाज कल्याण, नागपूर यांच्या वतीने जनप्रभा शैक्षणिक संकुल, भोजापूर - रामटेक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ०७ नोव्हेंबर १९०० मध्ये प्रताप सिंग हायस्कूल सातारा येथे झालेला शाळा प्रवेश दिन हा दिवस 'विद्यार्थी दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. सर्वप्रथम डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य लहू झुरे यांनी केले.

यावेळी मंचावर प्राचार्य अंशुल जयस्वाल व रामटेक तालुक्याचे समतादूत राजेश राठोड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ.रामचंद्र जोशी होते. याप्रसंगी विद्यार्थी कसा असावा, विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवनीतून प्रेरणा घ्यावी याबाबत मार्गदर्शन समतादुत राजेश राठोड यांनी केले. विद्यार्थी दिवसानिमित्त धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक केतन गेडेकर, द्वितीय क्रमांक अंश आकरे व तृतीय क्रमांक आरोशी बसीने यांनी पटकावला.

मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी शिक्षक वृंद हिमांशी देशमुख, स्वीटी भोदे, श्रुती बघिले, तविनी येऊतकर, कल्याणी मारवाडी, मयुरी चौकसे, सुदर्शन भाटिया, मनीषा देशमुख, इम्रान खान व तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. धनंजय मोरे यांचे रोटरी क्लब तर्फे मार्गदर्शन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

रोटरी क्लब नागपूर पश्चिमतर्फे डॉ. धनंजय मोरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन दिनांक ९ नोव्हेंबर रोजी, इ.फअ मुंडले, प्लैटिनम ज्युबिली हॉल,येथे संध्याकाळी ६.३० वाजता करण्यात आले आहे. डॉ धनंजय मोरे, एमबीबीएस, एलएलबी,असून अमेरिकन कॉलेज ऑफ स्पोर्ट्स मेडिसिन, अमेरिकन कौन्सिल ऑन एक्सरसाईज, इंटरनॅशनल स्पोर्ट्स सायन्सेस असोसिएशन, अमेरिकन हार्ट असोसिएशन, लेस्टर युनिव्हर्सिटी (इंग्लंड), इंटरनॅशनल डायबेटिस फेडरेशन अशा प्रसिद्ध संस्थांकडून ते प्रमाणित आहेत.मुंबई युनिव्हर्सिटी व रायसोनी युनिव्हर्सिटी येथे फिटनेस व न्यूट्रीशन ह्या विषयांमधील कोर्सेस ते घेतात. महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, सेंटर फॉर पोलीस रिसर्च येथे ते व्याख्याते म्हणून कार्यरत होते ते स्वतः राष्ट्रीय पातळीचे पॉवरलिफ्टर असून सायना नेहवाल आणि राज्यवर्धन राठोड ह्या ऑलिम्पिक पदक विजेत्यांचे ते सल्लागार होते.

उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, मणक्याचे विकार, सांधेदुखी अशा अनेक व्याधी आज घराघरात दिसून येतात. ह्या सर्वांचे मूळ आपल्या बदलत्या जीवनशैलीत सापडते. ही२३ उद्योगधंदा, व्यवसाय, नोकरी, शिक्षण, करिअर ह्या व्यापातून आपल्या शरीराकडे आणि आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे आणि आपण सर्वजण त्याची किंमत मोजत आहोत.रोजच्या आयुष्यात आपण काही बदल केले तर, ह्या व्याधी आपल्याला दूर ठेवता येतील, तसेच त्यांच्यावर नियंत्रण ठेवता येईल.याविषयी डॉ धनंजय मोरे आपल्या सर्वांना योग्य मार्गदर्शन करू शकतात.

आहारात कोणते बदल करावेत, वाढत्या वयानुसार शरीरात कोणते बदल होतात आणि ते कसे रोखावे, व्यायाम कोणता करावा इ गोष्टींवर यावेळी सखोल चर्चा केली जाईल. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा सर्वांनी करून घ्यावा आणि आरोग्यपूर्ण जीवनाचा आनंद घ्यावा.यासाठी कार्यक्रमाला हजर राहावे असे आवाहन आयोजकांनी केलेले आहे.

# रेल्वे मार्गावर सापडला मृतदेह

**नागपूर :** शहरातील जरीपटका पोलीस ठाण्यांतर्गत दिल्ली-नागपूर रेल्वे मार्गावर रेल्वेची धडक बसून मृत्यू झालेल्या व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. मृताचे वय ३० वर्षे असून, अद्याप ओळख पटलेली नाही. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी ७.५० च्या सुमारास रेल्वे कर्मचारी मनीष सुखदेव नागले (३५) यांचा मृतदेह पोल क्रमांक १०३९/०६ जवळ आढळून आला. यानंतर त्यांनी जरीपटका पोलीस ठाण्यात माहिती दिली. पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी त्या व्यक्तीला मेयो रुग्णालयात नेले, तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# सेवा कार्याच्या निःशुल्क प्रदर्शनीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

ग्रामायण प्रतिष्ठान सेवा संस्था व फ्रेंड्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने तात्या टोपे सभागृह, तात्या टोपेनगर, नागपूर येथे ९ व १० नोव्हेंबर रोजी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ग्रामायण प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल यांनी पत्रपरिषदेत सांगितले. यावेळी ग्रामायण प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. चंद्रकांत रागीट, सचिव संजय सराफ, मंजुषा रागीट, फ्रेंड्स को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटीचे अध्यक्ष सुभाष मंडलेकर, सचिव डॉ.सुरेश तेलंग, हेमंत अंबासेलकर, प्रशांत बुजोणे, राजेंद्र काळे, मिलिंद गिरीपुंजी आदी उपस्थित होते.

सेवा कायार्चे निःशुल्क प्रदर्शन दुपारी १२ ते रात्री ९ या वेळेत राहणार या प्रदर्शनीचे उद्घाटन ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता होईल. चांगल्या कामांना समाजाची साथ या संकल्पनेवर आधारित प्रदर्शनात महाराष्ट्रातील विविध भागातील ४० हून अधिक




संस्थांचा सहभाग राहणार आहे. या प्रदर्शनात विविध संस्थेला त्यांच्या कायार्ची माहिती देण्याची संधी देण्यात येत आहे.

तसेच संस्थेचे संचालक, सीएसआर, देणगीदार, समाजातील हितचिंतक आणि विविध विद्यार्थी सुध्दा प्रदर्शनीचा लाभ घेणार आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो. यंदाच्या प्रदर्शनीत एमएसडब्ल्यूच्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. या प्रदर्शनीच्या माध्यमातून सामाजिक कायार्ची जवळून ओळख होणार आहे. आपल्या आवडीच्या संस्थेसोबत काम करण्याची संधी असल्याने या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन ग्रामायण प्रतिष्ठानच्या वतीने आले आहे.

# खनगन कुटुंबांचे पारिवारिक स्नेहसंमेलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

आज एकल कुटुंब पद्धतीमुळे मुलांना आपले नातेवाईक माहिती नसतात. एकच मुलं ! ही आजची गरज आहे. आज काका, मामा, मावशी, आत्या, ही नाती नाहीशी होवू पाहत आहे. अशा पार्श्वभूमीवर नवीन पिढी, पारिवारिक स्नेहसंमेलन आयोजित करून नात्यानां पुनर्जिवित करू पाहते आहे. याचे एक उत्तम उदाहरण असे की,मानेवाडा येथे खनगन कुटुंबाने स्नेहसंमेलन मोठ्या थाटामाटात पार पडले.



खनगन यांचे नागपूर मध्ये विखूरलेले अनेक नातेवाईक आहे. या संमेलनात नागपूर तसेच इतर शहरातून खनगन कुटुंबातील ४० ते ४५ सदस्य एकत्र जमले होते. यामध्ये खनगन कुटुंब प्रमुख यांनी आपले विचार मांडून पुढील एकत्रीकरण खूप मोठ्या प्रमाणावर करावे असे सुचविले.

मुख्य म्हणजे पुढल्या संमेलनात युवा पिढी सहभागी व्हायला तयार झाली एवढे हे एकत्रीकरण हृदयंगम होतं. या संमेलनाचे आयोजन विलास वामनराव खनगन यांनी केले होते. त्यांनी सर्व खनगन कुटुंब एकत्र आणले.

हे एकत्रीकरण यशस्वी करण्याकरिता भावना खनगन, राजेश खनगन व ज्योती खनगन यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नागपूर डिव्हिजनल रेल्वे रुग्णालयात ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता कार्यक्रम




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

आरोग्य आणि लवकर ओळख यावर भर देत एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नागपूर येथील डिव्हिजनल रेल्वे रुग्णालयात ७ नोव्हेंबर २०२४ रोजी ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर श्री. मनीष अग्रवाल, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. जी. मञ्जुनाथ आणि वरिष्ठ डिव्हिजनल मेडिकल ऑफिसर डॉ. शुभांगी साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

ऑक्टोबर महिना हा जागतिक ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता महिना म्हणून ओळखला जातो, जो ब्रेस्ट कॅन्सरच्या लवकर ओळख, उपचार आणि रुग्णांच्या समर्थनासाठी समर्पित आहे. यावर्षीच्या थीम "कोणीही ब्रेस्ट कॅन्सरला एकटे सामोरे जाऊ नये" शी संबंधित असलेल्या या कार्यक्रमात समग्र रुग्ण-केंद्रित देखभालीच्या महत्त्वावर जोर देण्यात आला, ज्यामध्ये वैद्यकीय, मानसिक आणि सामाजिक समर्थन याबरोबरच ब्रेस्ट कॅन्सर उपचारात समानतेच्या बाबींचा विचार करण्यात आला.

आरएसटी रुग्णालय, नागपूर येथील गायनोकोलॉजिक ऑन्कोलॉजिस्ट डॉ. माधुरी गवांडे यांनी ब्रेस्ट कॅन्सरचे कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय यावर सखोल माहिती दिली. त्यांनी लवकर ओळखीसाठी स्व-मूल्यमापनाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला आणि स्व-जांच कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या संवादात्मक प्रश्नोत्तर सत्रामध्ये सहभागी व्यक्तींनी त्यांच्या शंका आणि चिंता व्यक्त केल्या.

प्रस्तुती नंतर, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. जी. मञ्जुनाथ यांनी सभा संबोधित केली आणि लवकर ओळख आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व सांगितले. वरिष्ठ डिव्हिजनल मेडिकल ऑफिसर डॉ. शुभांगी साखरे यांनी कार्यक्रमाच्या समारोपानंतर आभार मानले आणि या आरोग्य उपक्रमासाठी सर्वांचे सहकार्य कौतुक केले.

कार्यक्रमाच्या दरम्यान ४० रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांसाठी ब्रेस्ट स्क्रीनिंग देखील आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी समन्वय मंजुषा मटे, यांनी केले, आणि लॉजिस्टिक समर्थन मटे आणि संजय सावले, जूनियर यांनी प्रदान केले. केंद्रीय रेल्वेच्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य आणि कल्याणासाठी असलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, ज्यामुळे त्यांना महत्त्वाची माहिती, सुविधा मिळवून सुरक्षा सुनिश्चित केली जाऊ शकते.

## निधन

### चंपतराव तायडे



**नागपूर :** रामेश्वरी येथील रहिवासी चंपतराव तायडे याचं दुःखद निधन झाले. मुत्युसमयी त्याचं वय ८५ वर्ष होते. माजी रेल्वे टी टी ई या पदावरून निवृत्त झाले होते. गुरुवारी ७ नोव्हेंबर रोजी त्याचं अल्प आजाराने निधन झाले. शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर ला सकाळी ११ वा. मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार करण्यात येईल. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि दोन भाऊ असा बराच मोठा परिवार आहे.

# पर्यावरणपूरक शिवाई-ई बसचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

एसटी महामंडळाच्या पर्यावरणपूरक शिवाई-ई बसेसचा शुभारंभ मंगळवारी गणेशपेठ मध्यवर्ती बसस्थानक येथे करण्यात आला.याप्रसंगी महामंडळाचे नागपूर व अमरावती प्रदेशाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभणे, नागपूर विभागाचे विभाग नियंत्रक विनोद चवरे यांनी ई-बसला हिरवी झेंडी दाखविली.

याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात प्रादेशिक अधिकारी किशोर आदमने, विभागीय वाहतुक अधिकारी रंजु घोडमारे, विभागीय अभियंता (स्थापत्य) सतीश कटरे, आगार व्यवस्थापक अभय बोबडे, सहाय्यक




वाहतुक अधिक्षक स्वाती तांबे, राकेश रामटेके, निलेश विजय धुंडाते, वाहतुक निरिक्षक गणेश तलमले, अतुल निंबाळकर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागपूर ते चंद्रपूर करीता सुटणाऱ्या पहिल्या शिवाई-ई बस ही १२ मीटर लांबीची असून पहिल्याच दिवशी प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. नागपूर ते चंद्रपूर करीता ३६० रुपये प्रवास भाडे असून नव्या शिवाई कमी वेळेत चार्जिंग होण्यासाठी डबल गन चार्जिंगची सुविधा उपलब्ध आहे.

एसटी महामंडळाच्या नागपूर विभागाला नव्या २६ शिवाई ई-बसेस मिळाल्यानंतर विविध मार्गावर शिवाई ई-बसेसला हिरवी झेंडी दाखविल्या जात आहे. यातील १३ शिवाई ई-बसेस नागपूरसाठी, तर उर्वरित १३ ई-बसेस चंद्रपूरला पाठविण्यात आल्या असून त्या वेगवेगळ्या मार्गावर सुरु आल्याची माहिती नागपूर व अमरावती प्रदेशाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभणे यांनी दिली आहे.

नागपूर विभागाला ई-बसेस मिळाल्यानंतर एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढत आहे. १२ मीटर लांबीच्या शिवाई ई-बसेस मिळाल्यामुळे प्रवाशांची सोय झाली आहे. प्रवाशांना आरामदायी व सुविधाजनक प्रवास करता यावा, यासाठी एसटी महामंडळाने पुढाकार घेतला आहे.

महामंडळाने नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्रात ई-बसेसचा वापर वाढविला आहे. डिझेलवर चालणाऱ्या बसेसमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी आणि प्रवाशांना आरामदायी प्रवासाची सुविधा मिळावी यासाठी ई-बसेस सुरु केल्या आहे. १४ ऑगस्टपासून २६ ई-बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्यानंतर आता पर्यावरणपूरक ओलेक्ट्रा कंपनीच्या शिवाई ई-बसेस सुरु झाल्यामुळे प्रवाशांनी आनंद व्यक्त केला आहे.



नागपूर : शहरात उत्तर भारतीय आणि ईतर समाजाच्या वतीने छट पूजा उत्सव साजरा करण्यात आला. त्यानिमित्त शहरातील जलाशयांवर मोठी गर्दी उसळली होती.

# महालक्ष्मी योजना भगिनींना सोप्या पद्धतीने उपलब्ध करून दिली जाईल : विकास ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर लोकसेवेची पंचसुत्री योजना देण्यात येणर आहे. यातील पहिले आश्वासन महिलांसाठी महालक्ष्मी योजनेची घोषणा काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी केली आहे. प्रत्येक भगिनींना 3 हजार मानधन देण्याचा संकल्प करण्यात आले आहे. लोकसेवाभिमुख योजनेचा लाभ पश्चिम नागपुर विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक भगिनींना मिळावा याकरिता आता त्यांना घरूनच देण्यात येणार. यापूर्वी महायुतिच्या सरकारच्या फसव्या लाडली बहिण योजनेमुळे अनेक भगिनींना अर्ज भरण्यासाठी भटकंतीसह दलालांकडून आर्थिक शोषणाचा सामना करावा लागला. परंतु, आगामी निवडणुकीत पश्चिम नागपुर विधानसभा क्षेत्रातील महाविकास आघाडीचे लोकप्रिय उमेदवार विकास ठाकरे पुन्हा विजयी



झाल्यानंतर भगिनींना घरातूनच सर्व योजना पोहचविण्याचा काम केले जाणार. याशिवाय बेरोजगार तरुणांना दर महिन्याला 4 हजार रुपयांपर्यंत मदत सरकारकडून दिली जाणार आहे. भगिनींच्या अजासीबत तरुणांचेही अर्ज त्याच प्रमाणे भरले जाणार, अशी माहिती पश्चिम नागपुरचे विद्यमान आमदार, नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी दिली.

गुरुवारी महाविकास आघाडीचे लोकप्रिय उमेदवार विकास ठाकरेंच्या जन आशिर्वाद यात्रा दरम्यान नागरिकांना लोकसेवेची पंचसुत्रीचे माहिती देण्यात आली आणि पश्चिम नागपुरचे वचननामाचे वाटप करण्यात आले. प्रामुख्याने महालक्ष्मी योजना महाराष्ट्रात लागू करणार असल्याचा विश्वास भगिनींना देण्यात आले.

या योजनेंतर्गत महिलांना दर महिन्याला 3 हजार देण्यात येणार. तसेच याच योजनेतंर्गत महिला व मुलींसाठी मोफत बस प्रवास दिला जाणार आहे. प्रत्येक रहिवासीयांच्या कुटुंबाला सुरक्षा मिळावी यासाठी 25 लाखांपर्यंतचा विमा लाभ मिळावा याकरिता विशेष प्रतिनिंधीची नियुक्ती करून सर्व अर्ज भरण्यात येणार.

# दोन दिवस पूजा विशेष ट्रेन धावणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

रेल्वे प्रवाशांना विशेष गाड्यांमध्ये सहजरित्या आसनांची सुविधा मिळावी, यासाठी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाअंतर्गत पूजा विशेष गाड्या चालवण्यात आहेत. यात प्रामुख्याने सनतनगर-रायपूर-सनतनगर आणि बिलासपूर-हडपसर-बिलासपूर दरम्यान विशेष ट्रेन धावणार आहे.



रेल्वेतील गर्दी कमी करण्यासाठी भारतीय रेल्वेने यावर्षी ७७२४ विशेष गाड्या चालवल्या जात आहेत, तर गेल्या वर्षी ४५०० विशेष गाड्या चालवण्यात आल्या होत्या.सनतनगर ही ट्रेन रायपूरसाठी ०७०२३ क्रमांकाने ७ आणि १४ नोव्हेंबर रोजी सुटेल तर रायपूर ते सनतनगर ही क्रमांकाची गाडी ८ आणि १५ रोजी धावेल. या ट्रेनमध्ये २ जनरल, ११ स्लीपरसह एकूण २४ कोच राहणार आहे. विशेष गाडी क्रमांक ०८२९५/०८२९६ बिलासपूर-हडपसर- बिलासपूर ते हडपसर (पुणे) स्टेशन करीता एक फेरी चालवण्यात येत असून ही ट्रेन बिलासपूर ते हडपसरपर्यंत धावणार आहे. याशिवाय मध्यवर्ती रेल्वे स्थानकावर आता प्रवाशांना बसण्यासाठी मॅट केली आहे.

# गांजा विक्रेत्याच्या घरी धाड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

गस्तीदरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीवरून सक्करदरा पोलिसांनी एका गांजा विक्रेत्याच्या घरी धाड टाकली. दोन आरोपींना अटक करीत त्यांच्याकडून एक किलो 120 ग्रॅम गांजा जप्त केला.

विक्रम उर्फ टायगर योगेश इवनाते (28) आणि सूरज उर्फ शूटर सुनील धुर्वे (26) दोन्ही रा. सेवादलनगर, भांडे प्लॉट, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. दोन्ही आरोपींवर यापूवीर्ही गुन्हे दाखल झाले आहेत.

बुधवारी सायंकाळी 5.30 वाजताच्या सुमारास सक्करदरा पोलिसांचे एक पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. यादरम्यान टायगर हा घरून गांजाची विक्री करीत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंचासह त्याच्या घरी धाड टाकली.

टायगर आणि शूटर गांजाची विक्री करताना रंगेहात मिळाले. दोघांनाही अटक करून माल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपींवर एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# नागपूर येथे बळीराजा महोत्सव पहाट सुमधुर गीतांचा कार्यक्रम




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

नेहरूनगर गार्डन, नेहरूनगर येथे बळीराजा महोत्सव पहाट कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बळीराजा या विषयावर आधारित काही सुमधुर गीते सादर करण्यात आली. त्याचप्रमाणे सांस्कृतिक वैचारिक क्रांतिकारी देशभक्ती भावगीत सादर करण्यात आले.

गाण्याची सुरुवात काया मातीत मातीत या गीताने केली. तर शेवट गर्जा महाराष्ट्र माझा कार्यक्रमाचे मुख्य अतिथी डॉ. अभीविलास नखाते, संचालक - शिवतीर्थ सावनेर,जिल्हा - नागपूर. तसेच उमेश कोरमि, अध्यक्ष - ओबीसी युवा मंच , संध्या राजूरकर संपादिका - दैनिक बहुजन सौरभ,नागपूर, निर्मलाताई मानमोडे, माधुरी गायधनी, ज्ञानेश्वर रक्षक, गणपतराव नाखले, कोहोळे सर ही मंडळी प्रामुख्याने उपस्थित होते.

आयोजक सत्यशोधक महिला महासंघ, सत्यशोधक कला महासंघ, हुमानिटी फाउंडेशन, निर्मल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, दैनिक बहुजन सौरभ, अलंकार ज्वेलर्स, नेहरूनगर योगा वर्ग.

संकल्पना - वंदना वनकर, अध्यक्ष - सत्यशोधक महिला महासंघ, महाराष्ट्र प्रदेश यांची तर सहयोग - पूजा मानमोडे अध्यक्ष, निर्मल अर्बन को-ऑपरेटिव बँक, हुमानिटी फाउंडेशन, सत्यशोधक महिला महासंघ अध्यक्ष प्रवीणा बालपांडे, कार्यक्रमाच्या निमित्ताने गायक कमलेश हटवार,विनोद बोबडे, संगीता देशमुख, शितल जैन, मदन नागपुरे, मनोहर बेलखेडे, तनिष्का नागोसे, दिव्या भोयर, सम्यका हटवार, प्रणाली शनिवारे यांचा सत्कार बळीराजा यांची प्रतिमा देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विशेष उपस्थिती प्रतिभा उटाणे, मीराताई मदनकर, सत्यभामा खोब्रागडे, आशाताई गावंडे, मुकुंद अडेवार,अनुज हलके, अंकिता हलके, निखिल भुते, नामदेव नागोसे. कार्यक्रमाचे संचालन - प्रीती तिरपुडे तर आभार वंदना वनकर विशेष सहयोग -यमुना भोयर, बेबी गिरडकर,कल्पना लक्कावार, ज्योती सहस्त्रबुद्धे, साधना मुरस्कर, सुशिला सातपुते, यशोदा सेलोकर, रजनी मल्लेवार, वंदना गाझीमवर, रेखा चौधरी,अस्मिता चव्हाण, माधुरी वरुडकर, माया बाळापुरे, निर्मला राऊत, वंदना भोयर, नीतू नागोसे, उज्वला येलणे, संजीवनी डांगे, गार्गी गभने, कांचन गभने आदी उपस्थित होते.

# कर्करोग मोफत चाचणी शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) वुमेन्स फोरम, नागपूर, किंग्सवे हॉस्पिटल आणि इन्स्टिट्यूट ऑफ ऑन्को सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने, अत्याधुनिक थ्रीडी डिजिटल मॅमोग्राफी मशीन वापरून संभाव्य स्तनाच्या कर्करोगासाठी निःशुल्क तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी 10 नोव्हेंबर रोजी, सकाळी 10 ते 4 या दरम्यान अयोध्या नगर येथे डॉ. बोथरा क्लिनिकजवळील साई मंदिर कॉम्प्लेक्स येथील आयोजित करण्यात आलेला आहेत.

त्यामुळे महिला वगार्ला विनंती आहे की, त्यांनी स्तनाच्या आजारा संबंधीच्या मोफत तपासणी शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. संख्यांसह आपल्या स्तनाच्या आरोग्याची काळजी घ्या.

या संकल्पित विचारांनी प्रेरित होऊन संस्था आपणास विनंती करत आहे. खालील मोबाईल क्रमांकावर आगाऊ नोंदणी करणे बंधनकारक आहे. जर तुमच्याकडे आधार कार्ड आणि विमा कार्ड असेल तर ते नक्कीच सोबत आणावे. डॉ. विणा फाये- 9403675409, डॉ. ममता रेवतकर- 7020719579, डॉ. वैशाली चराडे- 9881024232, डॉ. बोथरा- 9422101965, विजय तिवारी- 9370167228 40 वर्षांवरील स्त्रिया ज्यांना स्तनाचा कर्करोग झाल्याचे निदान झाले आहे, शस्त्रक्रिया झाली आहे, किंवा स्तनामध्ये गाठी आहेत किंवा कर्करोगाचे निदान होत आहे, तरीही शिबिराचा लाभ घेऊ शकतात.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. कान्होलकर, डॉ. ठाकूर, डॉ. थुल, डॉ. फये, डॉ. रेवतकर, डॉ.चरडे, डॉ.बोथरा, डॉ.डांगोरे, डॉ.मासोदकर, डॉ.सराटकर, डॉ. लुंगे यांनी परिश्रम घेतले. डॉ. पंचभाई, डॉ.जोगड, डॉ. तनमाने, डॉ.याकुब, डॉ.साकीब, डॉ. कोसे, डॉ.अग्रवाल, डॉ. मेश्राम, डॉ.गोंडाणे, डॉ.येवले, डॉ.शर्मा, डॉ.कडू, डॉ. गंभीर आदींनी अथक परिश्रम घेत आहेत.

# सावंगी (पुनर्वसन) येथे मंडईचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ७ :

सावंगी (पुनर्वसन) येथे ग्रामगौरव २०२४ अर्थात 'सावंगीकरांची मंडई' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला ग्रामस्थांसह बाहेरील पाहुणे मंडळीसुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोककला ही ग्रामीण जीवनाचा आत्मा आहे. काळ कितीही पुढे गेला असला तरी मात्र एकेकाळी याचं लोककलेने मनोरंजनाबरोबरच जनजागृती आणि प्रबोधनाचे कार्य करीत गावकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे. काळाच्या ओघात लुप्त होत चाललेली लोककला टिकून रहावी, गावात एकोपा रहावा, आपुलकीच्या नात्यात बंदिस्त होवून मानवतेची बाग फुलत जावी, लोककलेतून जनप्रबोधन व्हावं, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन व्हावे या उद्देशाने सावंगी (पुनर्वसन) येथे मागील तीन वर्षांपासून मंडईचे आयोजन केले जाते.

दुपारी शाहीर मोरेश्वर निकोडे यांच्या कलंगी दंडारचे व भव्य शोभयात्रेचे आयोजन केले होते. तर रात्री ग्रामस्थांचे सांस्कृतिक व गोपाल फेंडर, नोकेश्वर फेंडर यांच्या विनोदी नकलांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सोबतच आकाश टाले सावंगीकर यांच्या सप्तखंजरी प्रबोधनाचे आयोजन केले होते. या प्रसंगी संघटन हेची ग्रामोन्नतीचे सूत्र आहे. असे मत आकाश टाले यांनी व्यक्त केले. सोबतच संस्कार, महिलोन्नती, अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती, युवा जागृती, आदी विषयाला हात घालत रसिकांना मंत्रमुगद्ध केले. त्यांना तबल्यावर गजानन चनोडे, ऑर्गनवर प्रशांत चनोडे, कोरसवर प्रफुल ढोके तर प्रमोद डहाके यांनी सहकार्य केले. नोकेश्वर फेंडर, गुंडेराव मेश्राम, अजय सोनटक्के, श्याम टाले, वेदिका फेंडर, सोहम शास्त्रकार, वेदांत भोयर, यश मेश्राम यांनी विविध वेशभूषा साकार करून कार्यक्रमात अधिकच रंग भरला. सोबतच गावातील सर्व वृद्ध महिलांना लुगडा भेट देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन तारोली गट ग्रामपंचायतचे सरपंच सौ. सुरेखा कवडू राऊत, प्रमुख पाहुणे पोलीस पाटील अभय फेंडर, भोजराज चारमोडे, ग्रा. सदस्य कुनिता खेकारे, योगेश फेंडर, ज्ञानेश्वर बांडेबूचे, गंगाराम मेश्राम, पंचम रामटेके, गोविंदराव फेंडर, ईश्वर बांडेबूचे, भिवाजी वैद्य, राजाराम सातपैसे उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी किशोर बांडेबूचे, अभिषेक खोईया, संदीप खेकारे, अतुल फेंडर, पंकज लाकडे, साहिल फेंडर, कुणाल फेंडर, प्रेमराज रत्नापुरे, हर्षल मेश्राम, बादल टाले, सचिन चारमोडे, अमोल मेश्राम, नोकेश्वर फेंडर, संजय रामटेके, राजहंस मेश्राम, प्रकाश फेंडर, शीतल पुढके, प्रशांत चौधरी, अमोल रेहपाडे, अविनाश सोनटक्के, अनिल मेश्राम, प्रशांत खेकारे, रोशन फेंडर, कुणाल फेंडर आदींनी सहकार्य केले. सूत्रसंचालन सप्तखंजेरीवादक आकाश टाले तर आभार गोपाल फेंडर यांनी मानले.

# विद्यापीठाचा पुरुष व महिला तायकांडो संघ घोषित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा तायकांडो पुरुष व महिला संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक विशाखा जोशी केली आहे. अमृतसर गुरुनानक देव विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायकांडो स्पर्धेत दोन्ही संघ सहभागी होत आहे.

तायकांडो पुरुष संघात हरिभाऊ आदमाने महाविद्यालय सावनेर येथील प्रतीक बोंभारे (५४ वर्ष वजन गटाखालील), श्री बिंझानी सिटी महाविद्यालय नागपूर येथील अभय ठाकूर (५८ वर्ष वजन गटाखालील), नाशिकराव तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा विशाल पूजदेकर (६३ वजन गटा खालील), प्रियदर्शनी बी. अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ओम मोरशेट्टीवार (६८ वर्ष वजन गटाखालील) व मृणाल वानखेडे (८७ वरील वजन गट), भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथील हिमांशू चव्हाण (७४ वर्ष वजन गटाखालील) व अभिषेक मोहिर्ले (८० वर्ष वजन गटाखालील), रामदेवबाबा अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ऋषिकेश पांडे, राखीव खेळाडू म्हणून राजकमल तिडके महाविद्यालय मौदा येथील देवतळे (६० वर्ष वजन गटाखालील), नॅशनल फायर कॉलेज नागपूर येथील खुशाल गोतराणे (८० वर्ष वजन गटाखालील) समावेश आहे.

तर वैयक्तिक प्रकार पुरुष गटात भिवापूर येथील अभिषेक मोहिर्ले तर राखीव म्हणून आदर्श चोपकर यांचा समावेश आहे.

पूमसे सांघिक पुरुष संघात भिवापूर महाविद्यालयातील अभिषेक मोहिर्ले, अल्पेश बावनकर हिमांशू चव्हाण यांचा समावेश पूमसे पुरुष-महिला संघामध्ये कोमल बुराटकर व हिमांशू चव्हाण यांचा समावेश आहे.

तायकांडो महिला संघात गोंदिया येथील शिमन भालाभारे (४६ वर्ष वजन गटाखालील), जी.के. कॉलेज येथील विद्या नागपूरे (४९ वर्ष वजन भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथील कोमल बुरडकर (५३ वर्ष वजन गटाखालील), नागाजी महाराज एस. एस. महाविद्यालय नागपूर येथील विजया (५७ वर्ष वजन गटाखालील), वैनगंगा शारीरिक शिक्षण महाविद्यालय साकोली येथील मुस्कान राठोड (६२ वर्ष वजन गटाखालील), नाशिकराव तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील सायली अहलावाल (६५ वर्ष वजन गटाखालील), सिटी प्रीमियर कॉलेज येथील अंजली कश्यप (७३ वर्ष वजन गटाखालील), सेवादल महिला महाविद्यालयातील वैष्णवी साहू (७३ वर्ष वजन गटा वरील), राखीव खेळाडू एस. एन. मोर महाविद्यालय तुमसर येथील विधी देवनगन (५३ वर्ष वजन गटाखालील), डी.डी. भोयर महाविद्यालय मौदा येथील समीक्षा जंगले (५७ वर्ष वजन गटाखालील) यांचा महिला संघात समावेश आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७२ प्रकरणांची नोंद



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 51 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे.

गुरूवार (07) रोजी शोध पथकाने 72 प्रकरणांची नोंद करून 41,900/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 11 प्रकरणांची नोंद करून 4,400/- रुपयांची वसुली करण्यात आली.



व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 200/-रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 12 प्रकरणांची नोंद करून 4,800/- रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 18 प्रकरणांची नोंद करून 19,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 20 प्रकरणांची नोंद करून 4,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 9 प्रकरणांची नोंद करून 9,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.